https://dainiktarunbharat.com https://epaper.dainiktarunbharat.com

फाल्गुन शु. ५, युगाब्द ५१२७ | रविवार,२२ फेब्रुवारी २०२६



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची गुरूवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी. स्वदेश स्वातंत्र्यास्तव कापराप्रमाणे स्वत:ला जाळून घेणारे कर्पूरगौर महापुरुष स्वा. विनायक दामोदर सावरकर! त्यांनी जे जे अनुभवलं, भोगलं, सहन केलं आणि तरीही जे निर्माण केलं, जे कमावलं, जे प्राप्त केलं... ते मिळवणं सोपं नाही. अशा निस्सीम देशभक्त सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याला उजाळा...!

सोलापूर तरुण भारत

# आसमंत

निमित्त

डॉ. शुभा साठे

# कर्पूरगौर महापुरुष : स्वा. वि. दा. सावरकर

**अनेक फुले फुलती। फुलोनिया सुकोन जाती**
**कोणी त्यांची महती गणती। ठेविली असे?**
**परि जे गजेंद्रशुंडेने उपटिले।**
**श्रीहरीसाठी नेले कमलपुष्प ते अमर ठेले।**
**मोक्षदाते पावन अशीच सर्व फुले खुडावी। श्रीराम चरणी अर्पण व्हावी काही सार्थकता घडावी। या नश्वर देहाची...**

मनुष्यदेह हा नश्वर आहे, हे सत्य मान्य असूनही 'या' देहाचे जन्माला येण्याचे सार्थक व्हावे म्हणून 'बुध्याच' सतीचं वाण स्वीकारणारे क्रांतिकारकांचे कुलपुरुष स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर! स्वदेश स्वातंत्र्यास्तव कापराप्रमाणे स्वत:ला जाळून घेणारे कर्पूरगौर महापुरुष स्वा. विनायक दामोदर सावरकर! त्यांनी जे जे अनुभवलं, भोगलं, सहन केलं आणि तरीही जे निर्माण केलं, जे कमावलं, जे प्राप्त केलं... ते मिळवणं सोपं नाही. तारुण्याची ऊर्मी कोलू फिरवता फिरवता खर्ची पडली. दिव्य प्रतिभा रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत गंजून जाण्याची वेळ आली. पन्नाशीनंतर त्यांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची पुन:प्राप्ती झाली.

स्वतंत्र भारतातही एकदा नाही तर दोनदा कारावास भोगावा लागला. तरीही, आयुष्याचा प्रत्येक क्षण, रक्ताचा प्रत्येक थेंब राष्ट्रोद्धारार्थ वेचला. २८ मे १८८३ ते २६ फेब्रु. १९६६ असा ८३ वर्षांचा स्वा. सावरकरांचा जीवनपट न्याहाळला तर लक्षात येतं की, सावरकरांचं जीवन, त्यांची झुंज काही विशिष्ट ध्येयासाठी होती. विशिष्ट निष्ठांना जोपासण्यासाठी होती. त्यांचं संपूर्ण आयुष्य, त्यांचं जीवितकार्य आणि त्यांची साहित्यसंपदा याचा एकत्रित, एकसंध अभ्यास केला म्हणजे लक्षात येतं की, हिंदुत्वनिष्ठा, स्वातंत्र्यनिष्ठा, विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिनिष्ठा किंवा विवेकनिष्ठा या निष्ठा जोपासण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्याचा होकेला. देशभक्ती आणि हिंदुत्वनिष्ठा ही त्यांच्या सर्व जीवनकार्याची प्रेरणा व कारकशक्ती होती. हिंदुत्वनिष्ठा केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी आपले राजकारण, वाङ्मयकारण, समाजकारण, अर्थकारण, पक्षस्वीकार इत्यादी गोष्टी केल्या. स्वातंत्र्यनिष्ठेची बीजं तर लहानपणापासूनच त्यांच्या मनात रुजलेली होती. बालपणी आपल्या कुलदेवतेसमोर केलेली भीष्मप्रतिज्ञा हेच दर्शवते.

**''मातृभूीच्या रक्षणार्थ मारिता मारिता मरेतो झुंजेन...''** **म्हणजे देशाचे स्वातंत्र्य हेच मूळ ध्येय! मूळ निष्ठा! 'हे मातृभूी तुजला मन वाहियेले। वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले...'** हे शब्द अक्षरश: सत्य आहेत. स्वा. सावरकरांचा प्रत्येक श्वास, प्रत्येक विचार, प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय फक्त आणि फक्त देशहितास्तवच होता. त्यांनी मांडलेले स्त्रीविषयक विचार, त्यांनी मांडलेलं हिंदुत्व, त्यांची विज्ञाननिष्ठा, त्यांचे द्रष्टेपण... सगळे सगळे केवळ 'राष्ट्रहित' या एकाच ध्येयापोटी जन्माला आले. सावरकरांची आयुष्यातली महत्त्वाची १४ वर्षे कारावासात आणि १३ वर्ष स्थानबद्धतेत गेली. शत्रूबरोबरच स्वकीयांचाही विरोध त्यांनी पचवला.


**दीप्तानलात निज मातृ-विमोचनार्थ हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ ही कृतार्थतेची**

भावना केवळ परमप्रिय मातृभूीवरील उत्कट भक्तीमुळेच! तिच्या दास्य विमोचनाचं कार्य म्हणजेच ईश्वरी कार्य ही ठाम धारणा! यातूनच त्यांना प्रचंड मनोबल, श्रद्धाबल, आत्मबलाची प्राप्ती झाली. म्हणूनच, मार्सेलीसच्या उडीनंतर पुन्हा पकडले गेलेले सावरकर स्वत:चे आत्मबल वाढवताना म्हणतात

**अनादि मी, अनंत मी, अवध्य मी**
**भला मारिल रिपू जगती असा कवण जन्मला।**
**अग्नि जाळी मजसी ना खड्ग छेदितो**
**भिऊनी मला भ्याड मृत्यू पळत सुटतो।।**

श्रीमदभगवद्गीतेतील भगवंताचं तत्त्वज्ञान, **'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावक:...'** इतक्या सहजपणे मनात आणि कृतीत उतरवणारा असा हा महापुरुष विरळाच! स्वातंत्र्यवीरांना दोन जन्मठेपांची, ५० वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली गेली. अंदमानला नेण्यापूर्वी त्यांना डोंगरीच्या कारागृहात ठेवलं. तिथे त्यांना समजलं की, काही भारतीय राजकारणी मंडळींनी आपली कातडी बचावण्यासाठी सावरकरांच्या कृत्याचा धिक्कार केला. इतकंच नाही, तर एका इंग्लिश वृत्तपत्राने सावरकरांना 'हरामखोर' म्हटलं. न्यायसंस्थेनी दिलेल्या निकालावर आनंद व्यक्त करीत त्या वृत्तपत्रानी छापलं की, 'त्या हरामखोरास त्याचे नशिबी काय आहे, ते आता कळले असेलच...' सावरकरांच्या जागी क्षणभर स्वत:ला ठेवून पाहा, म्हणजे कळेल काय यातना झाल्या असतील! देशासाठी प्राणार्पण करण्याची तयारी दर्शविणाऱ्या थोर देशभक्ताची अवहेलना त्याच्याच देशबांधवांनी करावी? याउलट युरोपातील वृत्तपत्रांनी सावरकरांची प्रशंसा केली होती. पण, सावरकर म्हणजे कोणी सामान्य मनुष्य नव्हते की, निंदा केल्यावर खचून जावे आणि स्तुतीने हुरळून जावे. ज्या व्यक्तीने या दोन्ही वार्ता त्यांना ऐकवल्या त्याला ते शांतपणे म्हणाले, ''युरोपमधील वृत्तपत्रांनी माझी प्रशंसा 'हुतात्मा' म्हणून केली आहे, तर या वृत्तपत्राने मला 'हरामखोर' असे संबोधून निंदा केली. या दोन्ही परस्परविरोधी विधानांनी एकमेकांना खोडून काढले आहे आणि मी खराखुरा जसा होतो तसाच राहिलो आहे.'' यालाच म्हणायचे ना, 'सुखदु:खे समेकृत्वा...' हेच सावरकरांधील स्थितप्रज्ञाचे दुर्मिळ दर्शन! अंदमानचा प्रवास सुरू झाला, त्या बोटीवर तर सावरकरांना अक्षरश: नरकवास भोगावा लागला. बोटीच्या तळमजल्यावरच्या पिंजऱ्यात, जिथे २०-२५ माणसे जेते बसू शकतील तिथे ५०-६० जन्मठेपीचे कैदी पशूसारखे कोंबलेले. त्यांच्या नैसर्गिक विधीसाठी एक पिंप ठेवलेले. पिंपाशेजारचीच जागा सावरकरांना दिलेली. दुर्गंधी असह्य झाल्यावर नकळत हात नाकाकडे गेला. पण त्याचवेळेस सावरकर विचार करू लागले- 'लोकांच्या विष्ठेपासून तू कितीही दूर पळालास तरी तुझ्या विष्ठेचे पिंप तुला तुझ्या पाठीवरच वाहून न्यावं लागतंय, त्याचं काय? स्वत:च्या मलमूत्राचा उपसर्ग जसा अनिवार्य म्हणून तू सहन करतोस तसाच इतरांचाही का सहन करत नाहीस...?' अशाप्रकारे इंद्रियांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न आणि तेही इतक्या विपरीत मन:स्थितीत, परिस्थितीत केवळ एखादा योगी पुरुषच हे करू शकतो. हेच सावरकरांधील योगी पुरुषाचं दर्शन! स्वा. सावरकर नेहमी म्हणायचे, ''मी जे आज सांगतोय ते दहा वर्षांनंतर लोकांना पटतं. पण, १० वर्षं थांबण्याची माझी सिद्धता आहे.'' खिलाफत चळवळ सुरू झाली तेव्हाच सावरकरांनी सांगितलं, ''ही खिलाफत नसून आफत आहे.'' मुस्लिम लीगच्या वाढत्या मागण्या पाहून सावरकरांनी इशारा दिला की, ''दहा सिंध दिले तरी अकरावा सिंध ते मागतीलच. फाळणीसह स्वातंत्र्याचा स्वीकार करू नका.' स्वा. सावरकरांनी वेळोवेळी दिलेल्या अशा असंख्य इशाऱ्यांकडे आम्ही आणि तत्कालीन राज्यकर्त्यांनीही दुर्लक्ष केले आणि आज...? फाळणी झालीच, पाकिस्तानची निर्मितीही झालीच आणि त्याला आतंकवाद, दहशतवादाची फळे आलीत. आज सावरकरांच्या आत्मार्पणाला ५३ वर्षे पूर्ण होत आहेत. सावरकरांनी केलेली भाकिते या ५३ वर्षांत सत्यात उतरलेली आपण अनुभवतोय. सावरकरांनी भाकीत केल्याप्रमाणे, पाकिस्तानचा जन्म हा हिंदुस्थानच्या शांततेला आणि अभ्युदयाला बाधक ठरला असल्याचंच आता सिद्ध झालंय. प्रजासत्ताक दिनानिमित्त काढलेल्या पत्रकात सावरकरांनी भूदल, नौदल नि वायुदल या तिन्ही लढाऊ दलात लक्षावधींच्या संख्येने भरती होण्याचे हिंदू तरुणांना आवाहन केले होते. इतकेच नाही, तर ही तीनही दले अद्ययावत ठेवण्यावरही त्यांनी भर दिला होता. सावरकर म्हणाले होते, 'राष्ट्राच्या मोक्याच्या सीमा अजूनही आपल्या शत्रूच्या हातात आहेत. दुसरा ज्या तऱ्हेने आपल्याशी वागतो, त्याच तऱ्हेने त्याच्याशी वर्तन ठेवणे हाच आपले अस्तित्व टिकविण्याचा एकमेव मार्ग आहे. आपले राष्ट्र टिकवायचे असेल नि यशस्वी बनायचे असेल तर 'जशास तसे' हेच एकमेव धोरण हवे.'' आज या तत्त्वाची वारंवार आठवण होतेय. चीनच्या बाबतीतही हेच घडलंय. आम्ही 'पंचशील' करारावर आणि 'हिंदी-चिनी भाई भाई'वर विश्वास ठेवून बसलो आणि चीनने तिबेट घशात घातला.

१९६२ मध्ये मॅकमोहन सीमेवर नि लद्दाखमध्ये आत धुसून भारतावर आक्रमण केले. आसाम, नागालॅण्ड, काश्मीर, गोंतक या सगळ्या दीर्घकालीन समस्येची सूचना सावरकरांनी दिली होती, आम्हीच करंटे निघालो.



(पान ४ वर)

लक्ष्यवेध

अनय जोगळेकर

# मॅक्रॉन यांच्या भारतभेटीत संरक्षण आणि तंत्रज्ञान केंद्रस्थानी



**फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन नवी दिल्लीतील 'इंडिया एआय इम्पॅक्ट' परिषदेच्या निमित्ताने तीन दिवसीय भारत दौऱ्यावर असून, यादरम्यान संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील करारही दोन्ही देशांत होण्याची शक्यता आहे. त्यानिमित्ताने मॅक्रॉन यांच्या भारत दौऱ्याचे महत्त्व, 'राफेल' चा करार आणि एकूणच फ्रान्समधील अंतर्गत परिस्थिती यांचा आढावा घेणारा हा लेख...**

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन इंडिया एआय इम्पॅक्ट परिषदेच्या निमित्ताने भारताच्या दौऱ्यावर आहेत. मॅक्रॉन यांचा हा चौथा भारत दौरा. तीन दिवसांच्या या दौऱ्यातील पहिला दिवस त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत मुंबईमध्ये घालवला. दि. १६ फेब्रुवारीच्या रात्री उशिरा त्यांचे मुंबईला आगमन झाले. दि. १७ फेब्रुवारीला दुपारी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी लोकभवन येथे भेट घेतली आणि विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर ते सृजनशील उद्योजकता आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले. आज दि. १८ फेब्रुवारीला ते राजधानी नवी दिल्लीला प्रयाण करणार असून, तिथे इंडिया एआय इम्पॅक्ट परिषदेच्या उद्घाटनासोबतच फ्रान्स आणि भारत यांच्यामध्ये ११४ राफेल विमानांच्या खरेदीचा करार होईल, असा अंदाज आहे. यातील ९० विमाने भारतात बनणार असून, त्यात ५० टक्क्यांहून जास्त मूल्यांची प्रणाली आणि सुटे भाग भारतात तयार झाले असतील. या कराराचे मूल्य सुमारे ३.२५ लाख कोटी रुपये असून, देशाच्या स्वातंत्र्यानंतर होत असलेला हा सर्वात मोठा संरक्षण करार आहे. या विमानांच्या भारतातील निर्मितीसाठी फ्रान्सने भारताला विशेष सवलती देऊ केल्या आहेत. २०१५ साली भारताने आपल्या हवाई दलासाठी ३६, तर २०२५ साली नौदलासाठी २६ राफेल विमानांची नोंदणी केली.

२०२४ साली बांगलादेशमध्ये झालेले सत्तांतर आणि गेल्यावर्षी पार पडलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारताला अडीच आघाड्यांवर युद्धासाठी सज्ज राहावे लागणार आहे. पाचव्या पिढीतील लढाऊ विमानांच्या भारतातील निर्मितीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असले, तरी त्यासाठी २०३५ साल उजाडणार आहे. त्यामुळे पुढील काही वर्षे तरी 'राफेल' विमाने भारताच्या हवाई दलाचा कणा म्हणून काम करतील. भारत आणि फ्रान्स यांच्यामध्ये १९४७ साली द्विपक्षीय संबंध स्थापन झाले. १९९८ साली भारताशी सामरिक भागीदारी करणारा फ्रान्स हा पहिला पाश्चिमात्य देश ठरला. फ्रान्स युरोपीय महासंघातील भारताचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असून, दोन्ही देशांतील व्यापार सुमारे १२.६७ अब्ज युरो इतका आहे. फ्रेंच कंपन्यांनी भारतात ९.७९ अब्ज युरोंची गुंतवणूक केली आहे. भारताप्रमाणेच फ्रान्ससाठीही परराष्ट्र धोरणातील स्वायत्तता महत्त्वाची आहे. फ्रान्स 'नाटो', तसेच युरोपीय महासंघाचा भाग असला, तरी अनेक सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर त्याची स्वतंत्र भूमिका राहिली आहे.

हिंद-प्रशांत क्षेत्रातील आपला प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी फ्रान्सला भारताची गरज आहे. भारत आणि फ्रान्स यांनी एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय सौरऊर्जा सहकार्य संस्था सुरू केली. या संस्थेचे मुख्यालय गुरुग्राम येथे आहे. झपाट्याने विकसित होणाऱ्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' क्षेत्रात एकीकडे अमेरिका, तर दुसरीकडे चीन अशी विभागणी झाली असून, त्यात आपले स्वतंत्र अस्तित्व राखण्यासाठी जगातील मध्यम सत्ता एकत्र आले आहेत. फ्रान्स, ब्राझील, स्पेन, स्वित्झर्लंड यांच्यासह अनेक देशांचे अध्यक्ष, पंतप्रधान किंवा मंत्री आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे नेतृत्व इंडिया एआय इम्पॅक्ट परिषदेसाठी एकत्र आले आहेत.

२०१४ साली पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदींनी युरोपीय महासंघाच्या आपल्या पहिल्या दौऱ्याची सुरुवात फ्रान्सपासून केली. फ्रान्स आणि जर्मनी हे युरोपीय महासंघाचे दोन प्रमुख आधारस्तंभ आहेत. गेल्या तीन दशकांत भारत आणि फ्रान्स यांच्यातील संबंध सातत्याने मजबूत होत आहेत. या काळात फ्रान्समध्ये जॅस शिराक, निकोलस सारकोझी, फ्रान्सवा ओलांद आणि आता इमॅन्युएल मॅक्रॉन असे चार अध्यक्ष बदलले; तर भारतातही अटल बिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग आणि आता नरेंद्र मोदी पंतप्रधान म्हणून लाभले. शीतयुद्धात ज्याप्रमाणे सोव्हिएत रशिया भारताच्या पाठी खंबीरपणे उभा राहिला होता, त्याचप्रमाणे गेल्या ३० वर्षांत फ्रान्स भारताचा ऊन-पावसातील मित्र ठरला आहे. एक वसाहतवादी देश म्हणून फ्रान्सचा पश्चिम आफ्रिका, पश्चिम आशिया आणि आग्नेय आशियावर मोठा प्रभाव असून, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा तो सदस्य आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उच्च दर्जाचे उत्पादन क्षेत्र, अणुऊर्जा, विमाननिर्मिती, संरक्षण ते कला आणि सिनेमा इ. अनेक क्षेत्रांत फ्रान्सचा दबदबा आहे.

रशियापेक्षा फ्रान्सची शस्त्रास्त्रे आधुनिक आणि अधिक विश्वासार्ह असल्याने, तसेच संरक्षणाच्या बाबतीत वैविध्य महत्त्वाचे असल्यामुळे भारतासाठीही फ्रान्स महत्त्वाचा आहे. मॅक्रॉन २०१७ पासून फ्रान्सचे अध्यक्ष असले, तरी सध्या त्यांची खुर्ची डळमळीत झाली आहे.

(पान ४ वर)

# स्थैर्य आणि संतुलनाची दुहेरी परीक्षा

**'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'च्या निर्णायक विजयाने बांगलादेशच्या सत्ताकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे संकेत मिळत आहेत. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाकडे बांगलादेशची जनता अपेक्षेने पाहत असली, तरी गेल्या दोन वर्षांत युनूस यांच्या काळात निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, आर्थिक गतीतील मंदी, तसेच कट्टरतावादी इस्लामिक शक्तींचे वाढते प्राबल्य ही आव्हाने ठोस आणि तातडीची आहेत. भारताशी संबंधांत आलेली दुरावस्था हीही दुर्लक्षून चालणार नाही. नव्या सत्तेसमोर देशांतर्गत संतुलन प्रस्थापित करण्याबरोबरच प्रादेशिक समीकरणे नव्याने आखण्याची गरज उभी ठाकली आहे. या बदलत्या परिदृश्याचा बांगलादेश आणि भारतावर होणाऱ्या परिणामांचा घेतलेला वेध...**




वेध

डॉ. तुषार रायसिंग

बांगलादेशची १३वी सार्वत्रिक निवडणूक, दि. १२ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. ही निवडणूक केवळ एक नियमित राजकीय प्रक्रिया नव्हती, तर बांगलादेशातील लोकशाहीच्या भविष्याला आकार देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पाही होती. या निवडणुका अशा वेळेस पार पडल्या आहेत, जेव्हा जागतिक स्तरावर जगाची विभागणी ही आर्थिक आणि लष्करी सत्ता समतोलाद्वारे निर्माण होणार्या, नव्या विश्व व्यवस्थेकडे जात आहे. बांगलादेशमध्ये वर्ष २०२४ मध्ये, सर्वात गंभीर राजकीय उलथापालथ झाली होती. सत्ता, संस्था आणि समाजाच्या तिन्ही पातळ्यांवर, या देशाच्या पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू होती. जुलै २०२४ मध्ये 'जेन-झी' यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थ चळवळीने, माजी पंतप्रधान शेख हसीनांचे १५ वर्षांचे सरकार उलथवून टाकले. एकेकाळी बांगलादेशी लोकशाहीचे प्रतीक मानल्या जाणार्या हसीना यांच्या राजवटीच्या शेवटच्या वर्षात, अधिकाधिक हुकूमशाही आणि दडपशाही बनल्याचा आरोप त्यांच्यावर होता. शेख हसीना यांच्या पतनानंतरच्या काही काळानंतर, 'नोबेल शांतता पुरस्कार' विजेते मुहम्मद युनूस यांनी अमेरिका आणि इंग्लंड यांच्या मदतीने, देशाचे अंतरिम नेतृत्व स्वीकारले. राजकीय उलथापालथीनंतर शेख हसीना, भारतातात निर्वासित जीवन जगत आहेत. यामुळे भारत-बांगलादेश संबंधांमध्ये निर्माण झालेल्या संवेदनशीलतेचा फायदा, हा भारताचा पारंपरिक शत्रू पाकिस्तानने उचललेला दिसतो.

(पान ७ वर)

# केरळमध्ये मुस्लीम संघटनेचा 'वन्दे मातरम्'ला विरोध





**राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी 'वन्दे मातरम्' हा राष्ट्रचेतनेचा मंत्र म्हणत हसतमुखाने सर्वस्वाचे बलिदान केले. त्यांच्या बलिदानाने मिळालेले स्वातंत्र्य विनासायास उपभोगताना या मंत्राचा उच्चार करणेही देशातील मुस्लीमांच्या जीवावर येत आहे. 'वन्दे मातरम्' म्हणण्याचा कायदा केल्याने त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असून, हा कायदा मागे घेण्याची मागणी वाढली आहे...**

सर्व शासकीय कार्यक्रम, शाळा, महाविद्यालये, अन्य सार्वजनिक कार्यक्रम इत्यादी स्थानी राष्ट्रगीताबरोबरच राष्ट्रीय गीतही संपूर्ण म्हणण्यात यावे, असा आदेश केंद्र सरकारने अलीकडेच जारी केला. या आदेशाचे देशभरात मोठ्या प्रमाणात स्वागत झाले असले; तरी काहींना हा निर्णय रुचला नसल्याचे दिसून येते. यामध्ये काही मुस्लीम संघटनांचा समावेश आहे. केरळमधील समस्त सुन्नी संघटनेचे मुखपत्र असलेल्या 'सुप्रभातम' मध्ये जे संपादकीय प्रसिद्ध करण्यात आले आहे, त्यामध्ये केंद्र सरकारने 'वन्दे मातरम्' या राष्ट्रीय गीतासंदर्भात काढलेल्या आदेशाला विरोध केला आहे. केंद्राने आपला आदेश मागे घ्यावा, अशी मागणी या संपादकीयात करण्यात आली.

'वन्दे मातरम्' या राष्ट्रीय गीतामध्ये जो उल्लेख आहे, त्यामुळे घटनात्मक मूल्ये, धार्मिक संवेदना याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यामध्ये म्हटले आहे. केरळमधील सुन्नी मुस्लिमांच्या संघटनेचे नाव 'समस्त केरल जेम-इय्यातुल उलमा' असे असून, 'सुप्रभातम' हे त्यांच्या मुखपत्राचे नाव आहे. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली, तरी या देशातील मुस्लीमसमाजाची या राष्ट्रीय गीतासंदर्भातील आपली मानसिकता बदलली नसल्याचेच यावरून दिसून येते. 'वन्दे मातरम्'मध्ये मूर्तिपूजेचा उल्लेख असल्याचे नमूद करून, अन्य धर्माचे जे अनुयायी आहेत ते हे राष्ट्रीय गीत म्हणू शकणार नाहीत, असे त्यात म्हटले आहे.

'घटना समिती'ने दि. २४ जानेवारी १९५० रोजी, 'वन्दे मातरम्'चा राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकार केला होता. या राष्ट्रीय गीतामध्ये दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती या देवतांचा उल्लेख आहे. आता केंद्र सरकारने या उल्लेखांसह हे गीत गाण्याची सक्ती केली असल्याने, अशी सक्ती करून देशाची विविधता, घटनात्मक मूल्ये यांना सरकारने आव्हान दिल्याची टीका करण्यात येत आहे. तसेच सरकारचा सदर आदेश फेटाळून लावण्यात आला पाहिजे, धार्मिक आणि देवतांचा उल्लेख असलेले हे गीत म्हणण्याची सक्ती लोकांवर करणे, हे अयोग्य आहे. हा निर्णय घटना आणि लोकशाही मूल्यांशी सुसंगत नाही, असेही 'सुप्रभातम'ने आपल्या संपादकीयात म्हटले आहे. देशातील सलोखा नाहीसा करण्यासाठी या गीताचा वापर करता कामा नये, असे तारेही संपादकीयामध्ये तोडण्यात आले आहेत. आपल्या देशातील ऐक्य विविधतेतून निर्माण झाले आहे. तसेच हा निर्णय घटनेच्या धर्मनिरपेक्ष विचारांशीही सुसंगत नाही. धर्म, वैयक्तिक श्रद्धा आणि संस्कृती यांचा उपयोग राजकीय हेतूंसाठी केला जाता कामा नये, असेही त्या संपादकीयात म्हटले आहे. 'वन्दे मातरम्' हे गीत राष्ट्रीय ऐक्यास धोका असल्याचेही त्यामध्ये म्हटले आहे.

'वन्दे मातरम्' या गीतास नुकतीच १५० वर्षे पूर्ण झाली. हे गीत गात आणि 'वन्दे मातरम्'चा जयघोष करीत, अनेक स्वातंत्र्यवीर हसत- हसत मृत्यूला सामोरे गेले. देशवासीयांना प्रेरणा देणार्या या गीतास त्यावेळीही काही मुस्लीम नेत्यांनी विरोध केला होता. आता देश स्वतंत्र होऊन इतकी वर्षे झाली, तरी या देशातील काही मुस्लीमनेत्यांच्या मनातील 'वन्दे मातरम्' संदर्भातील आकस काही केल्या जात नाही. त्यामुळे 'इस देश में रहना होगा, तो 'वन्दे मातरम्' कहना होगा,' असे सर्वांना ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. केरळमधील मुस्लीम समाजाची 'री' आणखी किती मुस्लीमनेते आणि संघटना ओढतात, ते नजीकच्या काळात दिसून येईलच.

### एका आठवड्यात हिंदूविरोधी ५३ घटना!

हिंदू समाजाविरुद्ध ठरवून गुन्हे करण्याच्या आणि हल्ले करण्याच्या ५३ घटना, फेब्रुवारी महिन्याच्या केवळ पहिल्या आठवड्यात घडल्याचे दिसून आले आहे. या घटना भारत आणि शेजारी देशांसह, जगभरातील अन्य देशांमध्ये घडल्या आहेत. हिंसाचार, भेदभाव, छळ आदी घटनांचा यामध्ये समावेश आहे. बांगलादेशमध्ये मंदिरांची तोडफोड, हिंदू जनतेला ठरवून लक्ष्य करणे, लैंगिक अत्याचार, समाजमाध्यमांद्वारे अन्य लोकांना हिंदू समाजाविरुद्ध भडकाविणे आदी घटना घडल्या आहेत.

तसेच भारतात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटक, उत्तराखंड, गुजरात, महाराष्ट्र, बिहार, प. बंगाल, छत्तीसगढ या राज्यांमध्येही, हिंदू समाजावर अत्याचार होण्याच्या घटना या महिन्यातील एका आठवड्यात घडल्या. बांगलादेशप्रमाणे पाकिस्तान, नेपाळ, नायजेरिया, रशिया या देशांमध्येही हिंदूविरोधी घटना घडल्या आहेत. अत्याचारांच्या या घटनांचे स्वरूप वेगळे असले तरी हिंदूंना लक्ष्य करणे, समाजमाध्यमांमध्ये अपप्रचार करणे, अफवा पसरविणे, प्रशासनाच्या कामाबद्दल शंका उपस्थित करणे, अशा घटनांचा त्यात समावेश आहे.

दि. २ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारीदरम्यान या घटना घडल्या. दि. २ फेब्रुवारीस बांगलादेशमधील राजबरी जिल्ह्यात हिंदू देव- देवतांची विटंबना करण्यात आली; तर बांगलादेशमधील ढाका येथील विद्यापीठातील प्रवेश परीक्षेत प्रथम आल्याबद्दल एका हिंदू विद्यार्थ्यास ठार मारण्यात आले. त्याच दिवशी भारतात मुस्लीमसमुदायाकडून ४० हिंदू कुटुंबांना त्रास देण्याची आणि त्यांच्यावर हल्ले करण्याचीही घडली. उत्तर प्रदेशातील आग्रा शहरात या घटना घडल्या. कर्नाटकमध्ये एक हिंदू तरुण मुस्लीममहिलेसमवेत दिसल्याबद्दल त्यास मारहाण करण्यात आली. कर्नाटकातील कोप्पल जिल्ह्यामध्ये ही घटना घडली असून, चिक्कबल्लापूर येथे एक हिंदू विद्याथ एका मुस्लीमविद्यार्थिनीसमवेत दिसल्याबद्दल, दोन मुस्लीमतरुणांनी त्यास मारहाण केली. कानपूर येथे एका मुस्लीमतरुणाने आपल्या पत्नीची हत्या केली. तीन महिन्यांपूव त्या दोघांचा विवाह झाला होता.

महाराष्ट्रात वसई (पूर्व) येथे साहिल कासीमआणि हुसेन या दोघांनी, एका अल्पवयीन मुलीवर घरात घुसून हल्ला केला. याची तक्रार करूनही कोणतीही कठोर कारवाई करण्यात आली नाही. कर्नाटकमधील यादगीर जिल्ह्यातील एका हिंदू कुटुंबाने महाशिवरात्रीच्या निमित्ताने मंदिरावर फडकविण्यात आलेल्या भगव्या ध्वजाचे चित्र समाजमाध्यमावर टाकल्याबद्दल, त्यांच्यावरही हल्ला करण्यात आला. बिहारमध्ये हिंदूविरोधी चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित करण्यात आली असून, त्यामध्ये औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्यात आले होते.

५३ पैकी काही घटनांचाच उल्लेख येथे करण्यात आला आहे. हिंदू समाजावर विविध ठिकाणी कसे हल्ले होत आहेत, त्याची कल्पना यावरून यावी. या सर्व घटना एका आठवड्यातील आहेत. मग, महिनाभरात आणि वर्षभरात हिंदू समाजावर किती आणि कसे हल्ले होत असतील, याचा विचार करा. केवळ नुसता विचार नको, असे हल्ले होऊ नयेत म्हणून काहीतरी ठोस कृतीही करा.

### 'जैश'कडून महिला सुसाईड बॉम्बर?

पाकिस्तानस्थित 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'लष्कर-ए-तय्यबा' या दहशतवादी संघटनांकडून भारतावर हल्ले करण्यासाठी, नवीन डावपेचांचा वापर केला जात आहे. आता 'सुसाईड बॉम्बर' म्हणून या संघटनांकडून मुस्लीमदहशतवादी महिलांची भरती केली जाऊ लागल्याची माहिती, भारतीय गुप्तचर यंत्रणांच्या हाती लागली आहे. दहशतवादी नेता मसूद अझर आणि हाफिज सईद यांच्याकडून, 'सुसाईड बॉम्बर' म्हणून महिलांचा वापर करण्याची योजना तयार केली जात आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यात 'जैश'ने 'जमात-उल-मुमिनत' या नावाने महिलांची शाखा उघडली आहे.

सुशिक्षित महिलांना आपल्या जाळ्यात ओढणे आणि त्यांना दहशतवादी कृत्ये करण्यासाठी प्रवृत्त करणे, हे कामया महिला शाखेकडे देण्यात आले आहे. तसेच 'लष्कर-ए-तय्यबा' या संघटनेने, आपली महिला शाखा 'तय्यीबत'चा विस्तार केला आहे. या महिला शाखेचा विस्तार पाकिस्तानमध्ये वेगाने होत आहे. भारतावर दहशतवादी हल्ले करण्यासाठी या महिलांना प्रशिक्षित करण्यात येत असल्याची माहिती आहे. यासंदर्भात संयुक्त राष्ट्रांनीही सावध केले आहे.

दहशतवादाची ही 'महिला सेना' सीमाभागात जमा केली जात असल्याने, भारताच्या सुरक्षा आस्थापनांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आपल्या सर्व यंत्रणांनी अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. दहशतवादी महिलांचे आत्मघातकी हल्ले होणारच नाहीत, याची दक्षता घ्यायला हवी.

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

## आम्ही आहोत!




अचानक ती घटना घडून गेली. ध्यानीमनी नसताना अचानक दुःखाचा एवढा मोठा पहाड आमच्या एका मैत्रिणीवर कोसळला. सारे काही कसे सुरळीत सुरू होते. एक अत्यंत सुखी व समाधानी मध्यमवर्गीय परिवार असा उल्लेख करावा, असेच तिचे सारे व्यवस्थित होते. छान टुमदार घर, नवरा मोठ्या कंपनीत चांगल्या नोकरीवर, एक मुलगा आणि एक मुलगी, सोबतीला ही देखील एका कार्यालयात नोकरी करायची. घरी सासू-सासरे, छान भरलेले घर असे सारे छान होते. लग्नानंतर घरच्या सर्वांनी खूप पाठबळ देऊन शिक्षण घ्यायला लावलेले व त्यानंतर आग्रहाने नोकरी करायला लावली.

तिने घरच्या तिच्या कर्तव्यांच्या आड नोकरीचे कारण येऊ दिले नाही. सारे काही नीट सांभाळणे हा तिचा स्थायीभावच होता. नवरा तिला प्रत्येकच बाबतीत आधार द्यायचा. घरासंबंधीच्या बर्‍याचशा गोष्टी तर तो तिला न कळताच करून टाकायचा. त्या झाल्यावरच आपल्या नवर्‍याने हे काळजीने केलेले आहे, याची तिला जाणीव व्हायची. तिच्या लग्नापूर्वीच्या जीवनातील नाती फार छान जपली होती व ती जपण्यामध्ये या घरातील सर्वांचाच तिला पाठिंबा होता. तिच्या मित्र- मैत्रिणींचा म्हणजे आमचा एक छान समूह आहे. त्या समूहामध्येही तिला फार मोकळेपणाने जाण्याची मुभा होती.

नृत्याची प्रचंड आवड होती तिला; घरात बाकी इतर कुणाला कला क्षेत्राची जास्त आवड नव्हती. त्यामुळे तिचे अडत नव्हते. आमच्या समूहातील मित्र- मैत्रिणींसोबत ती छान वेगवेगळ्या नृत्याच्या कार्यक्रमांना जायची व आपली आवड मनापासून जोपासायची. तिने नृत्य शिकावे असाही आग्रह घरच्यांचा होता, पण तिनेच ते नाकारले होते. घरच्यांचे इतके पाठबळ असल्याने ऊस गोड लागतोय म्हणून मुळापासून खाऊ नये या उक्तीप्रमाणे तिने स्वतःला कार्यक्रम बघण्यापर्यंतच मर्यादित ठेवले होते. एकंदरीत अतिशय आनंदी आयुष्य ती घालवत होती... आणि अचानक तिच्या आयुष्यात ते सारे काही हादरवून टाकणारे वळण आले. आयुष्य एका विशिष्ट समाधानी मार्गावरून चालत असताना अचानक रस्ता संपलेला असावा आणि समोर खोल दरी असावी, असेच काहीतरी तिच्या आयुष्यात झाले. ज्या कंपनीमध्ये तिचा नवरा नोकरी करायचा त्या कंपनीमध्ये एके दिवशी एक भयानक अपघात घडला. चूक नेमकी कशी झाली कळले नाही. रात्रीच्या शिफ्टमध्ये तिचा नवरा काम करीत होता. मशीनचे काम सुरू होते. मशीनची दुरुस्ती त्याच्या नेतृत्वात सुरू होती. अतिशय अजस्त्र मशीन होती ती. वेगवेगळे ब्लेडस् त्यामध्ये होते व फार मोठ्या प्रमाणात कटाईचे काम त्यावर व्हायचे. काही तांत्रिक अडचणीमुळे ती मशीन बंद पडली व त्यामुळे उत्पादन थांबले.

कंपनीमधील वरच्या पदांवरील अधिकारी तिच्या नवर्‍याच्या फार मागे लागले होते. त्यामुळे त्याने आपल्या टीमला सोबत घेऊन दिवसरात्र मेहनत सुरू केली होती. केवळ तीन ते चार तास झोप त्याची व्हायची. सारखे काम सुरू होते. हा त्या संपूर्ण कामाचा प्रमुख होता. त्या दिवशी रात्री संपूर्ण मशीन ठीक झाली व त्याची टेस्ट घेण्याचे ठरले. मशीन सुरू करण्यापूर्वी सारे काही ओके आहे व आता ती सुरू करायला हरकत नाही या रजिस्टरवर त्याने सही केली. डोळ्यात झोप होती व तो पूर्ण थकून गेला होता. त्याने अंगठा दाखवून दूरवरच्या ऑपरेटरला मशीन सुरू करण्याचा निर्देश दिला. धाड धाड आवाज करीत ती अजस्त्र मशीन सुरू झाली आणि काही क्षणातच तेथे जे काही झाले ते समजण्यापलीकडले होते. ते तसे का झाले? कसे झाले? याचा विचार करायलाही संधी मिळली नाही अशा प्रकारे ते सारे घडले. त्या घटनेमुळे आमच्या मैत्रिणीचे अवघे आयुष्य बदलून गेले. तिचा त्या घटनेशी थेट संबंध नसला तरी तिचा नवरा संबंधित होता. त्याच्या बाबतीत घडलेली ती घटना तिच्याही बाबत घडलीच. त्या घटनेचे पडसाद त्या संपूर्ण कुटुंबावर पडले.

छान काहीसे अचानक कोलमडून पडावे असाच तो प्रकार झाला. मशीन मोठा आवाज करीत सुरू झाली व त्या कानठळ्या बसविणार्‍या आवाजासोबत आणखी एक हृदयाचा ठाव घेणारा आवाज त्या ठिकाणी निनादला; एका भीषण किंकाळीचा. दूरवरच्या ऑपरेटरलादेखील ती किंकाळी ऐकू आली आणि त्याने ती मशीन बंद केली. तोवर त्या मशीनला असलेल्या मोठमोठ्या ब्लेडवरून रक्ताच्या धारा वाहू लागल्या होत्या. झाले असे की, त्या अजस्त्र मशीनच्या आत एक कर्मचारी अडकून गेला होता व ते कुणाच्याही लक्षात आले नाही. विशेषतः आमच्या मैत्रिणीच्या नवर्‍याची ती जबाबदारी होती की सारे तपासून घेऊन मगच मशीन सुरू करण्याची परवानगी द्यावी. परंतु कामाच्या ताणामुळे तपासणी नीट झाली नाही व तो कामगार मशीनमध्ये कापला गेला. त्यानंतर जे झाले ते वाईटच होते. त्या सार्‍या प्रकरणाचा ठपका तिच्या नवर्‍यावर ठेवण्यात आला. त्याला बडतर्फ करण्यात आले. त्याला कोणतेही आर्थिक फायदे मिळाले नाही.

सगळीकडे निंदानालस्ती झाली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नोकरीवरून काढून टाकल्यावर तो घरी असताना केवळ १५ दिवसात आपल्या हातून एक जीव गेला, असा विचार करत करत त्याच्या मनावर परिणाम झाला. त्याचा नर्वस ब्रेकडाऊन झाला व त्याचा परिपाक म्हणजे अर्धांगवायूचा झटका येऊन तो एका खोलीमध्ये लोळागोळा होऊन पडला. उपचार सुरू झाले, परंतु डॉक्टरांनी सांगितले की, आता हा यामधून सावरायला काही वर्षे लागू शकतात. बरा झाला तरीही कामावर कधीही जाऊ शकणार नाही. एखाद्या सुंदर चित्रावर रंगाचा डबा सांडून ते चित्र एका क्षणात विस्कटून जावे असे सारे काही घडले. पहिल्या पाच-सहा दिवसांची सहानुभूती आटोपल्यावर नातेवाईकदेखील पांगले. त्यानंतर आमच्या मैत्रिणीसमोर प्रश्न उभा झाला चरितार्थाचा. नवर्‍याचा कंपनीतला बर्‍यापैकी मोठा पगार बंद झाला. हिची स्वतःची नोकरी फार जास्त पगाराची नव्हतीच. मुलांची शिक्षणे, घरात सासूसासरे, नवर्‍याची औषधी आणि जगण्यासाठीचा खर्च ही सहजच निभावली जाणारी कार्ये आता तिच्यापुढे भली मोठी आव्हाने बनली. आम्ही सर्वांनी तिला भेटायला जायचे ठरविले. परंतु भेटायला जाणे म्हणजे केवळ सहानुभूती दाखवून परत न येता तिला आम्ही तुझ्या सोबत आहोत, हे कृतीमधून जाणवून देण्याचे ठरले. सुदैवाने आमच्या समूहातील प्रत्येकच जण आर्थिक सुस्थितीत असल्याने सर्वांनी मिळून काहीतरी ठोस करण्याचे ठरले. सर्वांनी मिळून तातडीने चार लक्ष रुपये गोळा करून दोन दोन लक्ष रुपये स्वतंत्रपणे तिच्या दोन्ही मुलांच्या भविष्यातील शिक्षणाकरिता गुंतवून टाकले. एक मित्र एका मोठ्या शाळेच्या संचालक मंडळात चांगल्या पदावर असल्याने तिला त्या शाळेमध्ये त्वरित नोकरी देण्याची व्यवस्था करण्यात आली. सध्या तिला मिळणार्‍या पगाराच्या दुप्पट पगार तिला मिळण्याची व्यवस्था त्यामुळे झाली. (पान ४ वर)

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

## चूडाकर्म आणि विद्यारंभ

अर्धघन आणि नंतर घन आहार घेऊन बाळ बाळसं धरतं. त्याची शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक वाढही भरभर होऊ लागते. ते आता दोन पायांवर आपला तोल सांभाळण्याची धडपड करू लागतं. दिसेल ती वस्तू धरून उभं राहण्याच्या प्रयत्नात अनेकदा धप्पकन बसून जातं; प्रयत्न मात्र सुरूच असतात. कोणत्या तरी एका क्षणी अवचित त्याला त्याच्या गुरुत्वाकर्षण शक्तीचं केंद्रस्थान अर्थात सेंटर ऑफ ग्राव्हिटी उमगतं. ते व्यवस्थित तोल सांभाळून उभं राहतं. हा सगळा प्रवास या तीन वाक्यात सांगता येतो पण चार पायांवर चालणार्‍या पशु विश्वापासून विलग होत पाठीचा कणा जमिनीशी ९० अंशाच्या कोणात ठेवत दोन पायांवर तोल सांभाळणं ही मानवी विकासक्रमात एक मोठी उत्क्रांती होती.

चतुष्पाद ते द्विपाद हा प्रवास माणसाच्या आयुष्यात खूपच सकारात्मक बदल घडवून आणणारा ठरला. त्यानंतर त्याचे पुढचे दोन पंजे विविध रचनात्मक कामांसाठी सुटे झालेत. चालणं, उभं राहणं, धावणं ही कामं पायाकडे आणि इतर सगळी कौशल्याशी कामं हातांकडे अशी सरळ सरळ विभागणीच झाली. पाय नसलेला तो पांगळा आणि हात नसलेला थोटा अशी व्यंगांची वेगळी नावंदेखील ठेवण्यात आली. दोन पायांवर चालण्यानं माणसात काय काय बदल झालेत हा एक स्वतंत्र चिंतनाचा विषय आहे. तरीही येणं, दोन पायांवर चालता, धावता येणं ही एक प्रचंड मोठी उपलब्धी आहे. म्हणून बाळ स्वत:च्या पायावर उभं राहून स्वतंत्रपणे चालायला लागलं की करण्याचा संस्कार म्हणजे चौल किंवा चूडाकर्म. चौर्‍यांशी लक्ष योनीतून फिरताना आत्म्याला चिकटलेले सगळे कर्मदोष, सगळी पापं केसांत साठलेली असतात. त्यापासून बाळाला मुक्ती मिळावी म्हणून ती/तो चतुष्पाद अवस्थेतून द्विपाद अवस्थेत पोहोचल्यानंतर जन्मल्यापासून डोक्यावर असलेले केस काढून, मुंडन करण्यात येतं. त्यात फक्त शिखा म्हणजे शेंडीचे केस सोडून देण्यात येतात. चूडाकर्माच्या विधीमध्ये यज्ञकुंडात 'सभ्य' नावाच्या अग्नीची स्थापना केली जाते. या संस्कारामुळे यापूर्वीच्या जन्मजन्मांतरात पशुजीवन जगलेल्या या आत्म्यानं इथून पुढे मनुष्ययोनीचे नीतिनियम पाळणं अपेक्षित आहे. त्यात सभ्यतेच्या चौकटीत राहून आपला उत्कर्ष करून घेणं सामील आहे. म्हणून 'सभ्य' नावाच्या अग्निदेवतेचं आवाहन करण्यात येतं. ज्या ज्या वेळी पुरुषाच्या आयुष्यात लक्षणीय बदल घडवणारी घटना घडते त्या त्यावेळी डोक्यावरचे केस काढून टाकण्याची परंपरा भारतात सर्वत्र पाळली जात आहेत. त्यातला पहिला विधी म्हणजे चौल किंवा चूडाकर्म अर्थात मनुष्ययोनीप्रमाणे जीवन जगण्याचा आरंभबिंदू. उपनयन विधी हा गुरुकुलात जाऊन औपचारिक शिक्षण घेण्याच्या व्रताची सुरुवात.



चौल संस्कार

त्यावेळीदेखील डोक्यावरचे केस काढण्यात येतात. त्याला वपन किंवा क्षौरकर्म म्हणतात. तीर्थस्थानी जाऊन सगळी पापं धुतली जातात. त्यामुळे केसांतसुद्धा एखादुसरं पाप अडकून राहू नये म्हणून तिथेही क्षौर करण्यास सांगण्यात आलेलं आहे. माता पित्याच्या आणि अनेक कुटुंबात नातेवाईक मृत्युमुखी पडल्यानंतर डोक्यावरचे केस दाढी मिशी काढण्याची पद्धत आहे. त्यामागचा हेतू हाच की, श्राद्धकर्म अतिशय शुद्ध आणि पवित्र होऊन करण्याचा विधी आहे. त्याच बरोबर मृत व्यक्तीच्या नसण्यामुळे आयुष्यात लक्षणीय बदल होणार आहेत. ती व्यक्ती पार पाडत असलेल्या जबाबदार्‍या, कामं आता आपल्या पार पाडायच्या आहेत. म्हणून विकेश होऊन तो बदल स्वीकारायचा असतो. हा नियम स्त्रियांसाठी नाही. कारण स्त्रीच्या शरीरात प्रत्येक दिवशी बदल घडत असतात. त्यातूनच त्या ऋतुमती होत असतात.



विद्यारंभ

एक भारतीय म्हणून अभिमान बाळगण्याचा एक अतिशय महत्त्वाचा बिंदू इथे नमूद करते. भारतीय संस्कृतीत चौर्‍यांशी लक्ष योनीतून आत्म्याचा प्रवास होतो आणि अखेर त्याला मनुष्य योनी प्राप्त होते, अशी मान्यता आहे. त्यामुळे या संधीचा अधिकाधिक लाभ घेण्याविषयी सनातनी साधू-संत सतत प्रबोधन करत असतात. मनुष्य जन्माची थोरवी हीच की त्याचा पाठीचा कणा भूमीला समांतर न रहाता तो ९० अंशांच्या कोणात राहतो. त्यामुळे भ्रूणावस्थेत बाळाची निर्मिती प्रक्रिया पूर्ण झाली की पराशक्ती ति/त्याच्या मेरुदंडाच्या मुळाशी माकडहाडाच्या पोकळीत, मूलाधार चक्रात, सर्पिणीसारखे साडेतीन वेढे घालून सुप्तावस्थेत विसावलेली असते.

आध्यात्मिक गुरूंच्या आशीर्वादानं ती डिवचली जाऊन जागृत होते आणि साधकाच्या यम- नियम आसन प्राणायामादि साधनेनं षट्चक्र भेदन करून सहस्रार चक्राकडे झेपावते. मृत्यू पावतेवेळी ती आत्म्याला आपल्या सोबत घेऊनच कवटी भेदून बाहेर पडते. त्यामुळे आत्म्याला जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते. हा सगळा आध्यामिक उन्नतीचा प्रवास केवळ आणि केवळ मनुष्य जन्मातच होणं शक्य आहे. त्यामुळे पाठीचा कणा ताठ ठेवून उभं राहता


गर्भवती होतात, बाळंत होऊन माता होतात. त्यातला प्रत्येक बदल हा महत्त्वाचाच असतो. त्यामुळे त्यांना केशवपन करण्यास कोणतेही कारण, घटना, प्रसंग शास्त्रात दिलेला नाही. इस्लामी आक्रमणात स्त्रियांची होणारी विटंबना थांबवण्याच्या नानाविध उपायांत पतीच्या निधनानंतर तिला विद्रूप करण्यासाठी तिला केशवपन करण्याची कुप्रथा भारतात सुरू झाली. पण ते शास्त्रसंमत नाही. काही शतकाचा काळ विधवा स्त्रियांनी केस भादरून बोडख्या डोक्यानं वावरण्यात घालवला. काळानं कूस बदलली आणि ती पद्धतदेखील समूळ (पान ६ वर)

पर्यावरण

# नैसर्गिक वारशाचे संरक्षण आवश्यक

मिलिंद बेंडाळे

**पृथ्वीवरील जीवन आपल्या कल्पनेपेक्षा खूपच गुंतागुंतीचे आणि गूढ आहे. सुमारे ३०० वर्षांपूर्वी महान स्वीडिश निसर्गशास्त्रज्ञ कार्ल लिनियस यांनी प्रत्येक सजीव वस्तू ओळखण्याचा आणि त्यांना नावे देण्याचा धाडसी प्रयत्न केला. त्यांना आधुनिक वर्गीकरणाचे जनक मानले जाते. आज शास्त्रज्ञ त्याच शोधाला गती देत आहेत. दरवर्षी सरासरी १६ हजारांहून अधिक नवीन प्रजाती शोधल्या जात आहेत. त्यांचे जतन करणे आवश्यक आहे.**



पृथ्वीवरील जीवनाची विविधता आपल्या कल्पनेपेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे. शास्त्रज्ञ दरवर्षी प्राणी आणि वनस्पतींच्या १६ हजारांहून अधिक नवीन प्रजाती शोधत आहेत. त्यामुळे जीवनाची अनेक अनाकलनीय रहस्ये उलगडत आहेत. हे शोध ज्ञानात वाढ करतातच; संवर्धन आणि विविध व्याधींवरील औषधांसाठीही ते तेवढेच महत्त्वाचे आहेत. प्रगत डीएनए तंत्रज्ञानामुळे अशाच काही लपलेल्या प्रजाती भविष्यात उघडकीस येऊ शकतात. निष्कर्षांवरून असे दिसून येते की, २०१५ ते २०२० या कालावधीमध्ये दरवर्षी सरासरी १६ हजारांहून अधिक नवीन प्रजातींची नोंद झाली. यामध्ये १० हजारांहून अधिक प्राणी (बहुतेक कीटक आणि इतर आर्थ्रोपॉड्स), २,५०० वनस्पती आणि २००० प्रकारच्या बुरशीयांचा समावेश आहे.

शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार भविष्यात माशांच्या १ लाख १५ हजार प्रजाती आणि उभयचरांच्या ४१ हजार प्रजाती उदयास येऊ शकतात. आजपर्यंत फक्त ४२ हजार माशांच्या आणि नऊ हजार उभयचरांच्या प्रजातींचा शोध लागला आहे. समुद्रात एका ठरावीक खोलीपर्यंत मानव पोहोचला असला, तरी अजूनही मानवाला समुद्रातील सर्व सजीव आणि रहस्यांची संपूर्ण माहिती झालेली नाही. त्यामुळे ही संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू शकते. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार वनस्पती प्रजातींची एकूण संख्या पाच लाखांपेक्षा जास्त असू शकते. शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की, नवीन प्रजातींच्या शोधाचा वेग वाढतच जाईल. उदाहरणार्थ शास्त्रज्ञांनी आजवर अंदाजे १.१ दशलक्ष कीटक प्रजाती ओळखल्या आहेत तर अनेक शास्त्रज्ञांच्या मते ही संख्या सहा दशलक्षाच्या जवळ असू शकते. वनस्पती, बुरशी, कोळी, मासे आणि उभयचरांसह अनेक गटांमधील जैवविविधता आपल्या कल्पनेपेक्षा खूपच समृद्ध आहे. या अभ्यासाचे निकाल 'सायन्स ॲडव्हान्सेस' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. मानवी हस्तक्षेपामुळे स्थानिक वनस्पती विविधता कमी होत आहे. निसर्ग आपल्या कल्पनेपेक्षा अधिक रंजक आहे. काही शास्त्रज्ञांचा असा विश्वास होता की, नवीन प्रजातींचा शोध मंदावला आहे आणि आता शोधण्यासाठी कदाचित फारसे काही शिल्लक राहिले नाही; परंतु त्यांनी हाती घेतलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष याउलट माहिती देतात.

आज आपण पूर्वीपेक्षा अधिक वेगाने नवीन प्रजाती शोधत आहोत आणि जीवनाच्या विविधतेची रहस्ये उलगडत आहोत. दररोज हजारो नवीन प्रजाती शोधल्या जातात. शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात जवळजवळ २० लाख ज्ञात प्रजातींचे विश्लेषण करण्यात आले. नवीन प्रजाती शोधण्याचा दर नामशेष होण्याच्या दरापेक्षा खूपच जास्त आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये प्रकाशित अभ्यासानुसार, दरवर्षी सुमारे १० प्रजाती नामशेष होत आहेत तर हजारो नवीन प्रजाती उदयास येत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, या हजारो नवीन प्रजाती केवळ सूक्ष्मजीव नाहीत, तर त्यात कीटक, वनस्पती, बुरशी आणि शेकडो नवीन पृष्ठवंशी प्राण्यांचाही समावेश आहे. सुमारे दोन तृतीयांश वनस्पती आणि प्राणी अनुवांशिक विविधता गमावत आहेत, हा जगण्यासाठी धोक्याचा संकेत आहे का? संशोधकांना असे आढळून आले आहे की, शास्त्रज्ञ दरवर्षी पूर्वीपेक्षा जास्त प्रजातींचे वर्णन करीत आहेत. भविष्यात किती प्रजाती शोधल्या जातील, याचा अंदाज लावण्यासाठी त्यांनी कालांतराने नवीन प्रजाती किती वेगाने उदयास येत आहेत, याचा अभ्यास केला.

शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार भविष्यात माशांच्या १ लाख १५ हजार तर उभयचरांच्या ४१ हजार प्रजाती शोधल्या जाऊ शकतात. यापूर्वीच म्हटल्यानुसार आतापर्यंत माशांच्या केवळ ४२ हजार आणि उभयचरांच्या नऊ हजार प्रजाती सापडल्या आहेत. यावरून आणखी किती प्रजातींचा शोध लागू शकेल, याचा अंदाज येऊ शकेल. शास्त्रज्ञांचा असाही अंदाज आहे की, वनस्पतींच्या प्रजातींची एकूण संख्या पाच लाखांपेक्षा जास्त असू शकते. सध्या आपल्याला सुमारे २.५ दशलक्ष प्रजाती माहीत आहेत, परंतु प्रत्यक्ष संख्या अब्जावधींमध्येही असू शकते. यापुढे नवीन प्रजातींच्या शोधाचा वेग वाढतच जाईल. कीटक प्रजातींची एकूण संख्या सुमारे २० दशलक्ष असू शकते. हवामानबदलाच्या विळख्यात जैवविविधता, आठ हजार प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. सध्या बहुतेक नवीन प्रजाती त्यांच्या बाह्य स्वरूपावरून ओळखल्या जातात, परंतु डीएनए आणि आण्विक तंत्रज्ञानात प्रगती होत असताना गुप्त प्रजाती उघड होतील. अनेक जीव सारखे दिसतात, परंतु अनुवांशिकदृष्ट्या वेगळे असतात. यामुळे विशेषतः जीवाणू आणि बुरशीच्या जगात मोठे शोध लागतील, अशी अपेक्षा आहे. नवीन प्रजातींचा शोध लागल्याने केवळ मानवाच्या ज्ञानात भर पडेल असे नाही, तर मानवाला अनेक फायदेही होऊ शकतात. एखादी प्रजाती वाचविण्यासाठी सर्वप्रथम तिचे वैज्ञानिकदृष्ट्या दस्तावेज तयार करायला हवेत. शिवाय, अनेक नवीन प्रजाती औषध आणि तंत्रज्ञानासाठी खजिना ठरू शकतात. वजन कमी करण्याच्या औषधांमध्ये वापरले जाणारे जीएलपी-१ हे संप्रेरक (हार्मोन) गिला मॉन्स्टर नावाच्या सरड्यापासून प्रेरित होते. त्याचप्रमाणे कोळी आणि सापांचे विष तसेच अनेक वनस्पती आणि बुरशी, वेदना, कर्करोग आणि इतर रोगांवर उपचार करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. ब्रिटिश संशोधकांच्या अभ्यासानुसार १७० वर्षांमध्ये ८० टक्के निलगिरी गवताळ प्रदेश नष्ट झाले; परंतु काही प्राण्यांच्या विशेष क्षमता मानवी तंत्रज्ञानाला प्रेरणा देतात, उदाहरणार्थ, सरडा वंशीय 'गेको' या प्राण्याच्या 'सुपर-ॲधेसिव्ह' पायांचा अभ्यास करून त्यानुसार भिंतीवर चढण्याचे नवीन साहित्य विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. संशोधक आता कोणत्या भागात नवीन प्रजाती शोधण्याची शक्यता अधिक आहे, हे ठरवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना न सापडलेल्या जैवविविधतेचे 'हॉटस्पॉट्स' ओळखता येतील, अशी आशा आहे. ते संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांची पृष्ठभूमी कशी बदलत आहे आणि स्थानिक शास्त्रज्ञ आता त्यांच्या स्वतःच्या देशांमधून अधिक प्रजाती शोधत आहेत का, हे पाहत आहेत.

लिनियसच्या शोधाच्या प्रवासाला सुरुवात होऊन ३०० वर्षे झाली आहेत; परंतु गेल्या दोन दशकांमध्ये सर्व ज्ञात प्रजातींपैकी १५ टक्के प्रजाती सापडल्या आहेत. प्रत्येक नवीन शोध आपल्याला पृथ्वीवरील आश्चर्यकारक जैवविविधतेला समजून घेण्याच्या आणि त्यांचे संरक्षण करण्याच्या जवळ घेऊन जातो. पृथ्वीवरील जीवनाची कहाणी अजूनही अपूर्ण आहे. नवीन प्रजाती शोधणे हा केवळ भूतकाळातील वारसा नाही, तर भविष्यासाठी एक गरज आहे. कारण ज्ञात आहे तेच जतन केले जाऊ शकते. या नवीन शोधांमुळे भारतात आतापर्यंत एकूण ५६ हजार १७७ वनस्पती प्रजातींची नोंद झाली आहे. त्यात फुलांच्या वनस्पती (अँजिओस्पर्म्स), जिम्नोस्पर्म्स, फर्न (टेरिडोफाईट्स), मॉसेस (ब्रायओफाईट्स), लायकेन, बुरशी आणि शैवाल यांचा समावेश आहे. वर्षानुवर्षे करण्यात आलेले हे संशोधन भारताच्या विपुल जैवविविधतेचे स्पष्टपणे प्रदर्शन करते. ते भारतीय प्राणिशास्त्र सर्वेक्षण (झेडएसआय) आणि भारतीय वनस्पती सर्वेक्षण (बीएसआय) यासारख्या संस्थांनी केलेल्या महत्त्वपूर्ण आणि प्रभावी वैज्ञानिक संशोधन आणि सर्वेक्षणांचे महत्त्व अधोरेखित करतात. या नवीन प्रजातींची ओळख, आपण आपल्या नाजूक परिसंस्थांचे संरक्षण करण्यावर गांभीर्याने लक्ष द्यायला हवे, हे शिकवते. नवीन प्रजाती केवळ आपले जैविक ज्ञान समृद्ध करत नाहीत, तर पर्यावरणीय संशोधन, औषधी शक्यता आणि संवर्धन धोरणांसाठी नवीन दारेदेखील उघडतात. भारताची ही जैवविविधता आपल्याला नैसर्गिक वारशाचे संरक्षण करणे, हे केवळ एक कर्तव्य नसून सामूहिक जबाबदारी आहे, याची आठवण करून देते.

(लेखक निसर्ग आणि प्राणिजीवनाचे अभ्यासक आहेत.)

## चिंगारी

जळण्यात जगाला जोर जरासा जरी
का फिरता घेऊन करी भाला तलवारी
धर्माच्या नावे जाळुनी आपली घरे
का शिलगावीत असता अजून द्वेष चिंगारी।।१।।
किती रुग्ण त्यागती प्राण औषधाविना
किती जणू विव्हळती मूठभर अन्नाविना
किती आई-भगिनी अबला होती हरवून कुंकू भाळी
किती दुःख व्यापिले आहे दारोदारी।।२।।
जरी जोर तुम्हा मग दुःख जगाचे जाळा
रक्तावर घालुनी बांध फुलवा मळा
हिंसेवर करूनी मात, पताका करुणेची उभारा
जनसेवेतून देवदर्शना जावे ही ललकारी।।३।।

राजकुमार बडोले

## वेदना आईच्या

आई, तुझ्या डोळ्यांतील
वेदनांचा पाझर कळते गं मला नाही येऊ शकत मी
थांबव आसवांना.....
आई थांबव आसवांना...
कष्ट माझ्यासाठी भोगले अपार तू
परतफेड करण्या आयुष्य मिळाले नाही मला
थांबव आसवांना...
आई थांबव आसवांना....
घास तू भरविला मायेने हात फिरविला
वार्धक्यात सहाऱ्याला नाही मी तुला
थांबव आसवांना....
आई थांबव आसवांना....
दुःख मोठे जगी आई असणे हयात
मुले होणे दिवंगत कळते गं मला म्हणूनच म्हणते
थांबव आसवांना....
आई, थांबव आसवांना....
तुझ्यासाठी तूच संयमी अन् शांत
तुला या जगाची पडली का गं भ्रांत
येणे अन् जाणे जगी नियम ना चुकला कुणाला
विनंती करते आई....
थांबव आसवांना...

मंगला वंजारी

## आठवणी


रेंगाळत राहतात माझ्या आजूला, माझ्या बाजूला....
मी असते माझ्यातच मग्न..
मोकळी होताच येऊन बसतात माझ्या मानगुटीवर,
डोक्यावर, खांद्यावर....
उतरा म्हटलं तरी उतरत नाहीत त्या....
मग खेळत राहते त्यांच्याशी मी.....
कधी सुखावतात कधी छळतात.....
कधी लहान मुलांसारख्या
तर कधी समजूतदार वागतात आठवणी....
कधी रुसतात माझ्यावर
आम्हाला जवळ घेतलं नाहीस म्हणून....
तर कधी जीव नकोसा करतात आठवणी....
चिवट असतात काही मुंगळ्यांसारख्या,
झटकले तर काळजाचा तुकडा तोडूनच होतात
वेगळ्या, आठवणी ...
काही कडू-काही गोड असतात आठवणी ....
पण आयुष्याचा अविभाज्य अंग असतात आठवणी....

शरयु श्रीगडीवार

कोणे एके काळी

# चाणक्य

स्वाती काळे (कोलारकर)



डोळ्यात करारी भाव आणि लांब शेंडी सोडलेला आर्य चाणक्य अर्थसंकल्प जाहीर झाल्यावर नेहमीच आठवतो. खरे तर त्याने लिहिलेला 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ फक्त अर्थसंकल्पाशी संबंधित नाही. या प्राचीन ग्रंथामध्ये राजकारण, अर्थकारण आणि राज्यकारभाराविषयी असंख्य सूत्रे आहेत. पण हजारो वर्षांपूर्वीचा त्याचा ग्रंथ आणि ग्रंथात सांगितलेली राजकर्तव्ये, अर्थकर्तव्ये आणि राज्यकारभाराविषयीची सूत्रे काळाच्या कसोटीवर आजही वास्तववादी वाटतात आणि त्यामुळे या लांब सोडलेल्या शेंडीच्या व करारी नजरेच्या कौटिल्याविषयी अर्थात चाणक्याविषयी नेहमीच कुतूहल वाटते. अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या वेळी त्याचा आठव होतोच. राजाने नेहमीच अर्थकारणात सक्रिय असायला हवे, असे त्याने म्हटले. काही महत्त्वाच्या उद्योगांवरदेखील राजाचे नियंत्रण असले पाहिजे, असे चाणक्य म्हणजे अर्थातच कौटिल्य म्हणतो.

हजारो वर्षांपूर्वी लिहिलेला 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ आजही महत्त्वाचा ठरतो. याला अनेक कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यकारभाराविषयीचे शास्त्र हेच अर्थशास्त्र असा अर्थ कौटिल्याने सांगून या ग्रंथात राजकारण, नीतिसार, अर्थकारण, राज्यव्यवहार सर्व काही सामावून घेतले आहे. यातील अनेक सिद्धांत आजही व्यवहार्य वाटतात. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात १५ खंड, १५० पाठ, १६० प्रकरणे व ६००० सूत्रे आहेत. भारतीय राज्यशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्रात मौलिक भर टाकणारा हा प्राचीन ग्रंथ राष्ट्राच्या आर्थिक नियोजनासाठीसुद्धा आजही अतिशय महत्त्वाचा आहे. कौटिल्य म्हणतो, 'जिशतः चतुः पंचारात्रीना कर्मसंवत्सरः' बुद्धिमान समाहत्याने ३५४ दिवस कामाचे दिवस समजावे. कौटिल्याचे कामाच्या तासांवर बारीक लक्ष होते. अधिक मासासाठी वेगळी व्यवस्था करून कामाचे नियोजन करावे, असे तो म्हणतो. कौटिल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराची नस जाणली होती. कौटिल्य म्हणतो की, परदेशात माल पाठवायचे नियोजन पक्षाध्यक्षाने करावे. हे नियोजन कसे करायचे? नियोजन यासाठी करायचे की ठोस नफा मिळाला पाहिजे.

परदेशात नेणारा माल, तेथून आणला जाणारा माल, मूळ किंमत आणि विक्रीची किंमत याची माहिती मिळवून त्यावर जकात कर, शिपाई खर्च, चौक्यांचा खर्च, अन्नपाणी खर्च, परदेशातील सरकारचा हिस्सा, रस्ता रक्षण कर हे सर्व वगळून नफा किती होईल, याचा विचार केला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेथे नफा होईल तेथे व्यापार करावा हे अतिशय महत्त्वाचे सूत्र कौटिल्याने त्या प्राचीन काळात सांगितले.

कौटिल्य एक कुशल पर्यावरणवादी होता. उत्पादनाचे नियोजन करताना कुप्याअध्यक्षाने वनरक्षक अधिकाऱ्याकडून माल आणावा. कारखान्याची उभारणी करावी. वनातील अयोग्य झाडे तोडल्यास दंड करावा, असे तो सांगतो. व्यापारवृद्धीसाठी कौटिल्याने व्यापाऱ्यांना सोयी देण्यास सांगितले; त्याचबरोबर ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची काळजीही घ्यायला सांगितली. जकात वसुली अधिकाऱ्याने व्यापाराचा माल कोठून आला, हे तपासून व्यापाऱ्याचे ओळखपत्रही तपासले पाहिजे. ओळखपत्र कसे तपासायचे? त्यावर उमटलेली मोहोर खरी आहे की खोटी आहे याबद्दल शहानिशा व्हावी, असे तो म्हणतो.

सूत कापड गिरण्यांसाठी मजुरी दर कसे ठरवायचे याबद्दल कौटिल्याची सूक्ष्म निरीक्षणे आहेत. मजुरी ठरवित असताना सूत बारीक, मध्यम, जाड आहे या गोष्टी लक्षात घ्याव्यात. सूत कमी दिल्यास मजुरीत कपात करावी अशा अनेक व्यवहार्य गोष्टी कौटिल्याने सांगितलेल्या आहेत; आणि म्हणूनच 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' आजही उपयुक्त आहे.

पीक नियोजनासाठी कौटिल्याची दूरदृष्टी वाखाणण्याजोगी आहे. धान्य, मुळे, फळे, भाज्या या उपयुक्त पिकांची 'सीड बँक' करण्याची कल्पना मुळात त्याची आहे. आजही खोट्या नोटा बाजारात येतात. त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेचे अतोनात नुकसान होते. कौटिल्याने या गोष्टी टाळण्यासाठी मुद्रा निर्मिती प्रक्रियेत सावध राहण्याचा इशारा दिला आहे. नैसर्गिक खाणींचे, सोन्याचांदीचे, सरकारी उत्पादनाचे रक्षण करण्यासाठी अचूक व्यवस्थापन करणारे खातेनिहाय प्रमुख पाहिजेत, असा कौटिल्याचा आग्रह होता. जगातला पहिला व्यवस्थापनशास्त्राचा गुरू म्हणून कौटिल्याचे नाव घेता येईल. प्राचीन काळी सोने, नाणे, माणिक, पाचू, हिरे आणि अन्य धातूंचा समृद्ध व्यापार होता. त्या तुलनेत 'काच' क्षुद्र समजल्या जात असे. पण क्षुद्र समजल्या जाणाऱ्या काचेसारख्या गोष्टीबद्दल कौटिल्याच्या अर्थशास्त्रात अनेकदा उल्लेख येतो. त्यावरून समजते, कौटिल्याने छोट्या व्यापारांचादेखील केवढा दुरगामी विचार केलेला आहे. काचेचे मणी कसे करावेत याची पद्धत कौटिल्याने सांगितलेली आहे. काचेचा रस (काचस्य उदके निमज्जत) घेऊन मणी करताना साच्यात बुडवून त्याला छिद्र करण्यासाठी सुई टोचली जाते. अशा बारीक तपशीलवार पद्धती अर्थशास्त्रात येतात आणि म्हणूनच प्राचीन काळात लघु उद्योगधंद्यांना प्रचंड महत्त्व होते हे लक्षात येते.

या ग्रंथाचा एक भाग प्रशासकीय राज्यकारभाराविषयी आहे. शेवटच्या आठ प्रकरणात परराष्ट्रासंबंधी कौटिल्याची मीमांसा आहे. **'षाडगुणस्य प्रकृतिमंडलं योनिः।'** कौटिल्याच्या मते परराष्ट्र धोरणाचे मूळ प्रकृती मंडलात आहे. प्रकृती मंडल म्हणजे राजा, अमात्य, सुऱ्हद, कोष, राष्ट्र, दुर्ग, बल हे सात घटक मिळून तयार झालेले मंडल. शत्रूपेक्षा आपण कमजोर असल्यास संधी करावी, शत्रूपेक्षा बलवान असल्यास विग्रह करावा म्हणजेच युद्ध पुकारावे. जेव्हा शत्रू इजा करू शकत नाही आणि आपणही त्याला इजा करू शकत नाही तेव्हा 'आसन' ग्रहण करावे. म्हणजेच स्वस्थ बसावे. 'द्वैधिभाव' हा प्रकारही कौटिल्याने सांगितलेला आहे. याचा अर्थ एकाशी संधी तर दुसऱ्याशी लढाई करणे. 'यान' म्हणजे शत्रूवर चढाई करून जाणे. या सहाही संकल्पनांची मूलतत्त्वे आजच्या परराष्ट्रीय धोरणात सामावलेली आहेत. यावरूनच निष्कर्ष काढता येतो की, कौटिल्याजवळ अद्‌भुत अशी दूरदृष्टी होती. कौटिल्य अतिशय धूर्त व्यावहारिक बुद्धीचा होता. परराष्ट्र धोरणामध्ये त्याचे म्हणणे आहे की, संधी आणि विग्रह (युद्ध पुकारणे) यापासून सारखाच लाभ होत असेल तर संधी करावी. कारण युद्धात खूप मोठ्या प्रमाणावर हानी होऊ शकते. फुटीचे राजकारण कसे करावे हेही कौटिल्याने खुबीने सांगितले आहे. शत्रू, राजाचे राजद्रोही, रानटी टोळ्या यांना पाठिंबा देऊन फुटीचे राजकारण करण्याची कला कौटिल्याने शिकवली आहे.

जो सामर्थ्यवान राजा आहे त्याने तुल्यबळ राज्याशी संधी करावी आणि हीनबल राज्याशी विग्रह करावा असे व्यावहारिक तत्त्वज्ञान आजही परराष्ट्रीय धोरणामध्ये दिसून येते. कौटिल्य पुढे म्हणतो की, संधी किंवा विग्रह यामुळे शत्रू दुबळा होत नसेल तर सामर्थ्यवान राजानेही स्वस्थ राहिले पाहिजे. कौटिल्याने प्रजेची समृद्धी व आनंद परमोच्च ध्येय मानले आहे. न्यायाने वागणाऱ्या राजावर स्वारी करावी की अन्यायाने वागणाऱ्या राजावर स्वारी करावी, असा प्रश्न निर्माण झाला तर याबाबत कौटिल्य काय म्हणतो हे समजून घेणे फार उद्बोधक आहे. कौटिल्य म्हणतो अशा वेळेस ज्याचे प्रजाजन नाराज असतील अशा राज्यावर स्वारी करावी. कौटिल्याच्या मते संकटाच्या काळात मदत करणारे राष्ट्र आपले खरे मित्र असते.

कौटिल्याची अनेक वचने आजही अतिशय वास्तववादी आहेत. **'वं चाहं च शून्य निवेशयावहे इत्यनसित संधिः।'** 'तू आणि मी' वस्ती नसलेल्या प्रदेशात वसाहत स्थापूया. दोन राष्ट्रांची संधी होते. पण हळूहळू एका राष्ट्राला त्या प्रदेशाचे महत्त्व कळू लागते आणि तो दुसऱ्या राष्ट्रावर मात करू लागतो. अक्साई चीनच्या बाबतीत हेच घडले. कौटिल्याच्या तत्त्वज्ञानानुसार जो राजा तहाच्या अटी मान्य करत नसेल किंवा विनाकारण त्रास देत असेल त्या राजाविरुद्ध साम, दाम, दंड, भेद वापरून त्याला वठणीवर आणावे लागते. आपल्या प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाने कधीही पराभूत मानसिकता स्वीकारली नाही. कौटिल्य सातव्या अध्यायात म्हणतो; **'वृद्धि क्षयंच स्थानंच कर्शनोच्छेदनं तथा। सर्वोपायान् समादध्यादेतान् यश्चार्थशास्त्रवित्।।'** अर्थशास्त्र जाणणाऱ्या राजाने आपल्या बुद्धीचा उपयोग शत्रूला दुर्बल आणि नेस्तनाबूत करण्यासाठी करावा.

प्राचीन नंद घराण्याची सत्ता उलथून चंद्रगुप्त मौर्याला राज्याभिषेक करणारा त्याच्या दरबारातला हा प्रधानमंत्री आपल्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेने आजही आपल्याला विस्मयचकित करतो. नंद राजाने त्याचे कुरूप रूप बघून 'हा ब्राह्मण आहे की चांडाळ?' असे उद्‌गार काढले आणि या अपमानाचा बदला घेण्यासाठी त्याने शेंडीची गाठ सोडली म्हणतात. त्यानंतर नंदराजाच्या मर्जीतल्या चंद्रगुप्ताशी मैत्री करून त्यालाच राजाविरुद्ध फितुरी करायला लावली. चंद्रगुप्ताला राजनीती, अर्थनीती, सैनिकी शिक्षण दिले. संधी आल्यावर पाटलिपुत्र नगरीवर चंद्रगुप्ताने हल्ला केला. नंदराजाचा पराभव झाला. चंद्रगुप्त सिंहासनावर आरूढ झाला आणि चाणक्य अर्थात कौटिल्याने प्रधानमंत्रिपद स्वीकारले. असे म्हणतात की, चाणक्य चंद्रगुप्ताला जेवणातून अतिशय कमी मात्रेत रोज विष देत असे. कारण भविष्यात जर कोणी राजावर विषप्रयोग केला तर त्याचा परिणाम होऊ नये ही या मागची दूरदृष्टी होती.

एके दिवशी चंद्रगुप्ताच्या राणीने चुकून विष घातलेले अन्न खाल्ले. तिचा मृत्यू झाला; तिच्या पोटातले बाळ मात्र सुखरूप जिवंत राहिले. त्याचे नाव बिंदुसार ठेवण्यात आले. याच बिंदुसाराचा मुलगा म्हणजे सम्राट अशोक. चंद्रगुप्ताचा मृत्यू झाला. त्यानंतर राजा झालेल्या बिंदुसाराच्या दरबारात सुबंधू नावाचा एक मंत्री होता. बिंदुसाराच्या आईच्या मृत्यूला चाणक्यच जबाबदार असल्याचे त्याने बिंदुसाराला सांगितले. चाणक्य समजून चुकला की पृथ्वीवरचे आपले दिवस आता मोजकेच शिल्लक आहेत. त्याने अन्नपाणी वर्ज्य केले आणि शेणाच्या गोवऱ्यांवरती तो सुन्न मनाने बसून राहिला. शेवटी बिंदुसाराला सत्य कळले. त्याने सुबंधूला माफी मागण्यास सांगितले. पण असूयेने पछाडलेल्या माणसाला कधीच हात जोडून क्षमा मागता येत नाही. माफी मागणे सोडा; त्याने गोवऱ्यांखाली आग लावली. 'शत्रूला सुगावा लागू न देता भस्मसात करा!' कौटिल्याचे शब्द त्याच्याच बाबतीत खरे ठरले. अखंड राष्ट्र भारताचे निर्माण करणारा कौटिल्य शेणाच्या गोवऱ्यांवर अखेरचे श्वास मोजत निपचित निजला होता.

# अभिजात मराठी संदर्भ आणि भूमिका

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

अभिजात भाषा हा भारत सरकारद्वारे दिला जाणारा मान्यताप्राप्त भाषिक दर्जा आहे. त्यासाठी भाषेतील साहित्य प्राचीन आणि श्रेष्ठ असून, भाषेचे वय दीड हजार वर्षापेक्षा जास्तीचे असावे लागते. ती भाषा स्वयंभू असावी. प्राचीन भाषा आणि तिचा आधुनिक लेखन प्रकार किंवा उच्चारण यात कालानुरूप बदल होत गेला तरी त्यांचा गाभा कायम असावा लागतो. या निकषांमध्ये मराठी भाषा सुरुवातीपासून बसत असली तरी रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या समितीने ५०० पानाचा अहवाल सादर केल्यावर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र शासनाने मराठीला अभिजात हा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. तसे पाहता अभिजात दर्जा मिळण्यासाठी मराठी भाषेला इतका उशीर होण्याचा आणि इतका संघर्ष करण्याची आवश्यकता नव्हती. मात्र, सातत्याने महाराष्ट्राकडे संघर्षाचा वसा चालत आलेला आहे, तो मराठी भाषेच्या नशिबातही कायमच राहिला. अभिजात दर्जा मिळाल्यानंतर त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान मिळते. या विचाराशिवाय मराठीच्या गौरवलेखामध्ये इतर विचार दिसत नाहीत असे प्रकर्षाने जाणवू लागले आहे.

खरे, तर सातवाहन राजांपासून मराठी भाषेचा इतिहास आपल्याला दिसून येतो. मूळ पैठणचे हे घराणे या घराण्याच्या सुरुवातीची नाणी पैठण जवळ तसेच आंध्र प्रदेशामध्ये सापडलेली आहेत. दुसरा सातकर्णी इसवी सन पूर्व १४३ ते ८६ हा होता. त्याच्या काळातील नाणी महाराष्ट्रातच सापडली आहेत. गौतमीपुत्र सातकर्णी या राजाच्या आईचा लेख नाशिकच्या गुफेत सापडला आहे. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, सातवाहन काळात हाल सातवाहन या राजाने निवडक सातशे गाथाचा जो गाथा सप्तशती हा ग्रंथ तयार केला त्या ग्रंथाला दोन ते सव्वा दोन हजार वर्षाचा इतिहास आहे. या ग्रंथाला मराठीतील पहिला आद्यग्रंथ असे म्हटले जाते. या गाथांमधून तत्कालीन मराठी भाषेचा अंदाज येतो. या गाथा सप्तशतीच्या सहाय्याने महाराष्ट्रातील तमाशा आणि लावणी या कलांच्या इतिहासाचा शोध घेता येऊ शकतो. त्याचप्रमाणे महाराष्ट्रीयन संस्कृती जीवनाचा दोन हजार वर्षांपूर्वीचा इतिहास सुद्धा आपल्याला घातास सप्तशतीमधून पाहायला मिळतो. चक्रधराच्या कालखंडात चक्रधराच्या शिष्यपरंपरेने चक्रधरांच्या लीळा मराठीमध्ये लिहिल्या. त्यासुद्धा हजार वर्षांपासूनच्या आहेत. संत ज्ञानेश्वरांनी तर ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्राकृत भाषेचे सहज आणि सोपे मराठीकरण केले असे म्हणता येईल.

संतांचे साहित्य आणि एकंदर महाराष्ट्रातील भाषिक इतिहासाचा आलेख पाहिला असता मराठी भाषा ही अभिजात भाषा आहे हे नव्याने सांगावे लागत नाही. मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळाला आहे, त्या भाषेचा गौरव आणि सन्मान वाढवण्यासाठी आपण काय करतो? याबाबत विचार करण्याची वेळ आलेली आहे. मराठीसाठी नोबेल पुरस्कार हे एक स्वप्न होऊन राहिले आहे. इतर भाषेतील साहित्यकृतींना दरवर्षी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त होत असताना मराठी मात्र आजपर्यंत फक्त चारच ज्ञानपीठ पुरस्कारावर संतुष्ट दिसत असते. ह्याबाबत सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील पराकोटीची गटबाजी आणि जातीयता आहे असे म्हणायला हरकत नाही. जे साहित्य



> **कोणत्याही मानव वस्तीचा म्हणजेच राष्ट्राचा, समाजाचा अभ्यास करायचा असेल तर त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास करणे गरजेचे असते. मानवी संस्कृतीचे प्रतिबिंब म्हणजे त्या समूहाची भाषा होय. मानव आपले सुख दुःख आशा आकांक्षा अभिव्यक्ती प्रकट करण्यासाठी जे महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा होय. भारतीय संविधानामध्ये २२ भाषा अनुसूचित केल्या आहेत. मात्र, भारतात २०० पेक्षा जास्त भाषा आणि ८०० पेक्षा जास्त बोलीभाषा बोलल्या जातात. या भाषांमधून भारतीय संविधानामध्ये अनुसूचित केलेल्या भाषेमध्ये मराठी भाषेचा समावेश आहे तसेच या सर्व भाषांपैकी तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, उडिया, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत आणि आसामी अशा अकरा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा आहे.**

अस्सल आणि दर्जेदार आहेत त्या साहित्याकडे अनेकदा महाराष्ट्रातील समीक्षक आणि वाचक तो आपल्या गटातला, प्रांतातला विभागातला जातीतला धर्मातला नाही म्हणून अनुल्लेखाचे राजकारण करत चांगल्या साहित्यकृती बाजूला ठेवतात. साहित्य अकादमी पुरस्कार दरवर्षी मराठी भाषेला द्यावा लागतो म्हणून तो मिळतो. मात्र, अनेकदा हे पुरस्कार प्राप्त झालेल्या साहित्यकृती खरोखर त्या दर्जाच्या आहेत का? असा प्रश्न निश्चित पडतो. १९५५ पासून २०२५ पर्यंत त्र्यं. ज. शेजवळकरांचे श्री शिवछत्रपती हे एकमेव पुस्तक सोडता सर्व मराठी साहित्य अकादमी प्राप्त पुस्तके आवर्जून वाचल्यामुळे मला जे जाणवले ते मत मी मांडले आहे. निवड समितीतील लोक बहुतांश वेळी वयाच्या आधारे वयोवृद्ध लेखकाच या पुरस्कारासाठी विचार करताना दिसतात.

यंदा विंदाचे गद्यरूप या संग्रहाला ऐन नव्वदीच्या सुधीर रसाळ ह्यांना पुरस्कार देण्यात आला. ती निवड खरोखर योग्यच आहे. मात्र, हाच पुरस्कार सुधीर रसाळ यांना चाळीशी पन्नाशीत मिळाला असता तर कदाचित नव्या हुरूपाने त्यांच्या पुढील लिखाणामध्ये आणखी जबाबदारी आणि आशय घनता यांचा समन्वय साधल्या जाऊन महाराष्ट्राच्या पदरात पाचवा ज्ञानपीठ पुरस्कार पडला असता असे वाटते. अर्थात हा आशावाद अनेकदा पोकळ आहे असेही वाटते. कारण काही लेखकांना त्यांच्या तरुण वयात साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले त्यांच्या पुढील साहित्यकृती ज्ञानपीठ पातळीपर्यंत पोहोचल्या नाहीत. कदाचित लेखकांची आत्मसंतुष्टवृत्ती यासाठी कारणीभूत असेल असही वाटते. मराठी लेखकांची अनुभवकक्षा समजून घ्यायचे असेल तर श्री ना पेंडसे यांचे रथचक्र, आनंद यादव यांची झोंबी, नामदेव कांबळे यांची राघववेळ या तीन कादंबर्यांचा तुलनात्मक विचार करावा त्यात इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण घेताना मुलाने आणि त्याच्या आईने जो संघर्ष केला आहे त्याची कथा या तिन्ही लेखकांनी समांतर पातळीत लिहिल्याचे लक्षात येते.

रथचक्रमधील कुटुंब ब्राह्मण, झोंबीमधील कुटुंब कुणबी आणि राघववेळमधील कुटुंब मातंग समाजाचे असल्याने तसेच या तिन्ही कथानकाचा कालाखंड हा वेगवेगळा असल्यामुळे सामाजिक आणि कालानुरूप पडसाद त्यातील घटना आणि प्रसंग यावर पडलेले दिसतात. मात्र, कथाबीज आणि कथागाभा समान पातळीवर आढळून येतो. उपरा आणि उचल्या या दोन साहित्य अकादमी प्राप्त पुस्तकाचाही तुलनात्मक विचार केला असता कैकाडी आणि पारधी या दोन समाजातील संघर्ष समांतर रेषेत संबंधित लेखकांनी चितारल्याचे दिसून येते अर्थात त्यांच्या दुःखाची, कथेचे, व्यथेचे, भाषिक सौंदर्य आणि घटनास्थळे इत्यादी तफावत लक्षात घेतली असता ह्या सर्व साहित्यकृती स्वतंत्र आणि आपापल्या ठिकाणी उच्च दर्जाच्या आहेत यात शंका नाही. मात्र नाविन्याचा आणि वेगळेपणाचा सोस मराठी लेखकांना कधी प्राप्त होईल हे सांगणे फार कठीण आहे. अगदी फुटकळ पुरस्काराच्या म्हणजे प्रसंगी स्वतः पैसे देऊन पानभर बातम्या करणारे साहित्यिक आज दुर्दैवाने मराठी भाषेत गाजरगवताप्रमाणे वाढले आहेत आणि या अशा दर्जाहीन पुरस्कारामुळे मराठी साहित्यकृती सुद्धा दर्जाहीन होत आहेत असे. तुम्ही अभिजात भाषेचे लेखक आहात म्हटल्यावर आपण त्या अभिजात परंपरेचे पाईक होऊन आपल्या लिखाणामध्ये सकसता आणि जबाबदारी पेरून हकनाकची प्रसिद्धीलोलुपता झटकून टाकणे ही काळाची गरज आहे. जशी लेखकांवर ही जबाबदारी येते अगदी त्याच पद्धतीने वाचकांवर सुद्धा ही जबाबदारी निश्चित होते. आज वर्तमानपत्र सुद्धा स्वतःच्या पैशाने विकत न घेणारे ९० टक्के लोक व्हाट्सअप आणि फेसबुकच्या वापरासाठी इंटरनेटचे हजारो रुपये भरत असतात. प्रवास किंवा हिंदी सिनेमागृहात खर्च करणारे कुटुंब शंभर रुपयाचे पुस्तक दर आठवड्याला विकत घेते का? असा प्रश्न आज ९९% नकारार्थी उत्तर घेऊन आलेला असतो. अनेक मान्यवर कवी वर्तमानपत्राच्या एकाच पानावर असलेल्या आपल्या शेजारच्या कवीची कविता वाचत नाहीत हे सुद्धा एक सत्य आहे. बहुतांश महाराष्ट्रीयन कुटुंब आपल्या कारमध्ये पंजाबी किंवा तामिळ गाण्यांची बेधुंद मैफिल सजवून बसलेले असते अशावेळी मला एक ट्रक शोधायचा असतो ज्यामध्ये एक सरदारजी मराठी गाण ऐकत असेल. तो मला कधीही सापडत नाही. मराठी भाषेमध्ये उत्कृष्ट विनोदाची निर्मिती होतांना दिसत नाही. चला हवा येऊ द्या यासारख्या काही मालिकांनी सुरुवात चांगली केली मात्र तशा मालिका मधील तोच तो पांचटपणा पाहून हाच महाराष्ट्र का? तो जो लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ, राजा गोसावी, शरद तळवळकर यांच्या विनोदावर खळखळून हसत असे असा प्रश्न पडतो. बरं लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ असे मातब्बर कलाकारही हिंदी चित्रपटात फुटकळ भूमिकांवर समाधान मानत राहिले असेही अनेकदा आपण पाहिले आहे. मला वाटतं आजवर जेवढे मराठी हिंदी किंवा भारतीय भाषेतील सिनेमे आले असतील त्यातील सर्वात लक्षणीय मुख्यमंत्र्यांची भूमिका जर कोणी साकारली असेल तर ती वजीर या चित्रपटात अशोक सराफ यांनी, त्या खालोखाल सरकारनामा चित्रपटातील यशवंत दत्त लक्षात राहतात. मात्र, असे चित्रपट मराठी वाहिन्यावर किती प्रमाणात दाखवले जातात? हा ही एक प्रश्न आहे. आभाळमाया, गोट्या अश्या मालिका ज्या महाराष्ट्राने आधी डोक्यावर घेतल्या तो सुवर्णकाळ आठवून आजच्या मराठी मालिकांनी निव्वळ घराघरातील स्त्रीपात्र किती कुटील असते हेच बहुतांश वेळी सिद्ध केले आहे त्यामुळे रसिकांनाही फार जास्त दोष देता येत नाही. मूळात मराठीचा अभिजात दर्जा आपल्याला सिद्ध करायचा असेल तर मराठीतील साहित्य आहे, त्यापेक्षा कितीतरी वरच्या पातळीवर पोहोचणे गरजेचे आहे. मराठी वाचकांनी मराठी साहित्यावर भरभरून प्रेमकरणे अपेक्षित आहे. मराठी वाचक अनेकदा चेहरे पाहून साहित्यकृती विकत घेतात असेही चित्र अनेकदा दिसते. रिंगाणसारखी साहित्य अकादमी प्राप्त साहित्यकृती किती लोकांनी विकत घेतली? आणि प्राजक्ता माळीचा सुंदर चेहरा असलेला प्राजक्त प्रभा हा कवितासंग्रह किती लोकांनी विकत घेतला? असा प्रश्न विचारला तर मिळणारे उत्तर आश्चर्य व्यक्त करायला लावणारे असते. बरे ३० ते ४० वर्षापासून सातत्याने दर्जेदार नियतकालिकात लिहिणार्या कवी लेखकाचे पुस्तक न छापणारे प्रकाशक फेस व्हॅल्यू आहे म्हणून अभिनेत्रींचे पुस्तक मात्र बिनदिक्कत छापतात. तसाही प्रकाशनाचा धंदा हा आजकाल पुस्तकांच्या विक्री पेक्षा लेखकांकडून त्यांचे पुस्तक काढण्यासाठी पैसे उकळण्यातून जास्त होतो हे मी सांगण्याचे कारण नाही.

(पान ६ वर)

पान १ वरून

## कर्पूरगौर महापुरुष : स्वा. वि. दा. सावरकर

या द्रष्ट्या महापुरुषाच्या कळवळून, पोटतिडकीने केलेल्या सूचनांकडे आम्ही दुर्लक्ष केले. 'भारताने अधिकाधिक संहारक शस्त्रास्त्रे निर्माण करायला हवीत. प्रबळ सैन्य नसेल तर तुची लोकशाही ती मग अत्युकृष्ट घटनेची असतानासुद्धा- तुम्हाला पचायची नाही. लोकशाहीच्या मागेसुद्धा शक्ती पाहिजे. शक्ती नाही ते राज्य नाही.' या सावरकरांच्या विचारांचा आज पुरेपूर प्रत्यय येतोय. अन्यथा, आज आपले अस्तित्वच धोक्यात आले असते. 'शत्रूच्या भीत घुसून युद्ध चालविणे हा युद्ध जिंकण्याचा प्रभावी मार्ग आहे.' हे सावरकरवचन लक्षात घेऊन जेव्हा 'सर्जिकल स्ट्राईक' घडते, तेव्हा या द्रष्ट्या क्रांतिकारकाचे ऋण मान्य करावेच लागते. परंतु, केवळ एक साहसी क्रांतिकारक किंवा द्रष्टा महापुरुष एवढीच त्यांची महती वर्णन करणं अन्यायाचं ठरेल. कारण, त्यांचं व्यक्तिमत्त्व सहस्रपैलू होतं. प्र. के. अत्रेंच्या भाषेत सांगायचे तर, ''गेल्या दहा हजार वर्षांत असा युगपुरुष झाला नाही आणि पुढील दहा हजार वर्षांत होणार नाही...'' तळहातावर शिर घेऊन समरांगणात पराक्रम गाजविण्यासाठी निघालेल्या या योद्ध्याच्या अंतरात कविहृदयाचे स्पंदनही नेहमी चालू असे. ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावर 'सागरा, प्राण तळमळला' या अमर काव्याचा जन्म झाला. अंदमानातील कोठडीच्या भिंतीवर घायपात्याच्या काट्याने कोरून लिहिलेले आणि नंतर मुखोद्गत करून ठेवलेले 'कमला' हे महाकाव्य त्यांच्या दुर्दम्य कविमनाचाच साक्षात्कार घडविते. त्यांचे काव्य जसे स्फूर्तिदायक, तेजस्वी तसेच त्यांच्या हळुवार भावनांचे आविष्करण करणारेही आहे. काळ्या पाण्यावरून सुटून येऊन भारतात स्थानबद्ध अवस्थेत काळ कंठीत असता, सावरकरांनी काव्याबरोबरच गद्य लेखनाचाही सपाटा सुरू केला. अस्पृश्यता निवारण चळवळीला त्यांनी वाहून घेतले. रत्नागिरीचे पतितपावन मंदिर हे त्यांच्याच या कामगिरीचे स्मारक आणि प्रतीक आहे. हिंदुसमाज विसकळीत, मागासलेला आणि स्वाभिमानशून्य होण्यास याच गोष्टी कारणीभूत आहेत, असे त्यांचे मत होते. इतर धर्माप्रमाणे आपले दरवाजे सर्व मानवांना खुले न ठेवता हिंदुधर्म बंदिस्तपणातच भूषण मानीत आहे आणि म्हणून हे शुद्धीबंदीचे बंड मोडले पाहिजे व सर्वांना हिंदुधर्मात प्रवेश सुलभ केला पाहिजे, असा विचार आणि त्यानुसार कृती त्यांनी समाजमनात रुजवली. आपल्या विज्ञाननिष्ठ विचारांच्या प्रतिपादनाने विज्ञानधर्म लोकांच्या मनात रुजवला आणि जागृत केला. सावरकरांचे लेखन आणि वक्तृत्वही प्रवाही, आवेशपूर्ण, जाज्वल्य असल्याचा प्रत्यय लोकांना आला. सावरकरांनी लिपीशुद्धी आणि भाषाशुद्धीचीही चळवळ केली. आज प्रचलित असलेले दिग्दर्शक, बोलपट, संकलक, यष्टी, यष्टिरक्षक, महापौर अशासाखे अनेक शब्द ही सावरकरांची मराठी भाषेला देण आहे. हिंदुसमाजाचे पुनरुत्थान हे त्यांनी आपले जीवितकार्य मानले होते. हिंदूंध्ये लढाऊ वृत्ती बाणवून लष्करीदृष्ट्या ते समर्थ झाले पाहिजेत, हा त्यांचा ध्यास होता. त्यांच्या लेखातून, कादंबऱ्यांतून आणि नाटकातून हेच सूत्र आढळते. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून त्यांनी लेखकांना 'लेखण्या मोडा व बंदुका हाती घ्या' असा आदेश दिला, यावरून त्यांची याबाबतची उत्कटता प्रतीत होते. आपल्या ध्येय्याप्रती वाटचाल करताना अनेक आपत्तींचे आघात सहन करतच सावरकरांनी महत्कृत्याची अग्निदिव्ये पार पाडली.

दुसऱ्या कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, स्वदेशावर अशी नितांत भक्ती असलेला इतका अविश्रांत योद्धा क्वचितच निर्माण झाला असेल. केवळ देशभक्तिप्रीत्यर्थ इतकी कल्पनातीत दुःखे भोगणारा, इतका अभूतपूर्व त्याग करण्यास नि इतक्या भयानक संकटांना तोंड देण्यास सदैव तत्पर असलेला हा कर्पूरगौर महापुरुष! जीवनध्येयाला वाहून घेतलेले कृतिशील महापुरुष! सावरकरांना सत्तेची हौस नव्हती. खुर्चीसाठी, सत्तेसाठी वा नावलौकिकासाठी त्यांनी हे कार्य केलेच नाही. त्यांना हौस होती विशिष्ट काजासाठी, विशिष्ट तत्त्वासाठी जीवन व्यतीत करण्याची. हे जीवन झंझावाती वादळाने भरलेले असो, ज्वालामुखीने वेढलेले असो वा फाशीच्या दोराकडे नेणारे असो, त्याची त्यांना भीती नव्हती. लोकसमूहाची मर्जी संपादन करणे, हे त्यांचे ध्येय कधीच नव्हते. 'वरम् जनहितम् ध्येयम् केवला न जनस्तुतिः' हे त्यांचे प्रिय वचन होते. म्हणूनच, जेव्हा सावरकर संपूर्ण बंधमुक्त होऊन हिंदुस्थानच्या राजकारणात पदार्पण करते झाले तेव्हा महाराष्ट्रातच नाही, तर सबंध हिंदुस्थानात- अगदी दिल्लीतही- त्यांचे भव्य स्वागत झाले. ठिकठिकाणी सत्कार समारंभ पार पडले. त्यांची प्रत्येक सभा हजारोंच्या उपस्थितीत गाजली. अनेक ठिकाणी जनतेने त्यांना देवत्व बहाल केले. एक टिळकांचा अपवाद सोडला, तर सावरकरांएवढा सन्मान महाराष्ट्रात कोणालाही मिळाला नव्हता. अगदी सामान्य जनतेनेसुद्धा त्यांच्या देशसेवेचा गौरव केला. अशा या थोर भारतीय नेत्याने २६ फेब्रु. १९६६ रोजी आत्मार्पण केलं. २७ फेब्रु. १९६६ रोजी अंत्ययात्रा निघाली. सुमारे पन्नास हजार लोक उपस्थित होते. भारताच्या या अग्रेसर स्वातंत्र्ययोद्ध्याची महायात्रा निघाली. रस्त्यात लोकांचे जत्थेच्या जत्थे महायात्रेत सामील होत होते. गर्दी लाखाच्या वर पोहोचली. मात्र, दुर्दैव असे की, सावरकरांना श्रद्धांजली वाहण्यास राज्याचा एकही मंत्री उपस्थित नव्हता. अखेरपर्यंत सावरकरांच्या मनात एकच शल्य होते, ते म्हणजे- 'भारताची तीनचतुर्थांश भूमी विमुक्त झाली. परंतु, जिच्या तीरावर पवित्र वेदसूक्ते रचली गेली होती, यज्ञयागातील मंत्रघोष दुदुले हाते, त्या सिंधूचे विमोचन अद्याप व्हायचे आहे. ती सिंधू नसती तर हिंदूही नसते! सिंधूविना हिंदू हा शब्द निरर्थक आहे. हे सूर-सरिते सिंधू, इतर सर्वांना तुझा विसर पडला तरी आम्हाला तुझे विस्मरण कसे होईल? कधी तरी मराठी वीर उठाव करतील आणि तुझे विमोचन निश्चितच घडवून आणतील...!' हीच एक आस अखेरपर्यंत मनात धरली होती. म्हणूनच म्हणावंसं वाटतं की, टिळकोत्तर भारताच्या इतिहासात ज्याने कीर्तीची हाव ठेवली नाही, लक्ष्मीची आराधना केली नाही आणि वैयक्तिक मोठेपणाची हाव बाळगली नाही, ज्याने राष्ट्रीय हिताचीच सदैव चिंता वाहिली, राष्ट्रीय एकतेसाठी संपूर्ण जीवन वेचले, मायभूमीचे विच्छेदन टाळण्यासाठी अखंड संघर्ष केला, असा एकमेव कर्पूरगौर महापुरुष... विनायक दामोदर सावरकर!!!

## मॅक्रॉन यांच्या भारतभेटीत संरक्षण आणि तंत्रज्ञान केंद्रस्थानी

गेल्या तीन वर्षांमध्ये फ्रान्समध्ये पाच पंतप्रधान बदलले आहेत. एलिझाबेथ बोर्न मे २०२२ ते जानेवारी २०२४ पर्यंत पंतप्रधान राहिल्या. त्यांच्या राजीनाम्यानंतर गॅब्रिएल अत्ताल हे अवघ्या ३४ वर्षे वयाचे पंतप्रधान झाले; पण त्यांना आठ महिनेही पूर्ण करता आले नाहीत. दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी पंतप्रधानपदी नेमणूक झालेल्या मिशेल बार्निए यांना अवघ्या तीन महिन्यांमध्ये राजीनामा द्यावा लागला. दि. १३ डिसेंबर २०२४ रोजी फ्रान्सवा बायरू पंतप्रधान झाले. दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी स्वतःच मांडलेला विश्वासदर्शक प्रस्ताव संमत होऊ न शकल्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी आपले सर्वात विश्वासू सहकारी लुकॉर्नु यांना पंतप्रधानपदी नेमले. फ्रान्सचे पंतप्रधान सेबास्टिअन लुकॉर्नु यांनी शपथ घेतल्यापासून अवघ्या २६ दिवसांमध्ये, म्हणजेच दि. ७ ऑटोबर २०२५ रोजी राजीनामा दिला. विशेष म्हणजे, अवघ्या चारच दिवसांनी, म्हणजे दि. ११ ऑटोबर २०२५ रोजी अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पुन्हा त्यांनाच पंतप्रधान म्हणून नेमले आणि मंत्रिमंडळ स्थापण्याचे आदेश दिले. यावेळी लुकॉर्नु नशीबवान ठरले. पुढील वर्षी एप्रिल महिन्यामध्ये फ्रान्समध्ये अध्यक्षीय निवडणुका आहेत. जनमत चाचणीनुसार, 'नॅशनल रॅली पक्षा'च्या मरीन ली पेन यांनी मॅक्रॉन यांच्यावर मोठी आघाडी घेतली आहे. त्यामुळे मॅक्रॉन यांनी धाडसी निर्णय घेण्याचा धडाका लावला असून, महत्त्वाच्या पदांवर आपल्या मर्जीतील लोकांना नेमले आहे. सुदैवाने मरीन ली पेन यांनीही भारत आणि फ्रान्समधील कराराचे स्वागत केले आहे. एकीकडे आक्रमक रशिया आणि दुसरीकडे बेभरोशाचा अमेरिका यांच्या कात्रीत युरोप सापडला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये युरोपमध्ये बाहेरील लोकांचे प्रमाणाबाहेर स्थलांतर, मुस्लीम लोकसंख्येमध्ये झालेली मोठी वाढ, युक्रेन युद्धामुळे वाढलेली महागाई, युरोपीय महासंघाची नोकरशाही आणि आर्थिक सुधारणांना विरोध, यामुळे मॅक्रॉन यांच्या लोकप्रियतेत मोठ्या प्रमाणावर घसरण झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावर डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या सहकार्यांनी उघडपणे युरोपीय महासंघातील उजव्या विचारसरणीच्या पक्षांना पाठिंबा द्यायला सुरुवात केली होती. पण, नंतर अमेरिकेने युरोपीय देशांवर आयात-कर लावल्यामुळे, तसेच बळाचा वापर करून ग्रीनलॅण्ड ताब्यात घेण्याची भाषा सुरू केल्याने हे राजकीय पक्ष अडचणीत आले. त्याचा फायदा घेत मॅक्रॉनसारख्या नेत्यांनी पुन्हा एकदा गमावलेली लोकप्रियता मिळवण्याचे प्रयत्न चालवले आहेत. भारत आणि युरोपीय महासंघामध्ये झालेल्या मुक्त व्यापार करारानंतर मॅक्रॉन भारतामध्ये येत आहेत. त्यांच्यासोबत फ्रेंच कंपन्यांचे एक मोठे शिष्टमंडळ आले आहे. या दौऱ्यामुळे भारत आणि फ्रान्समध्ये उच्च आणि तंत्रशिक्षण, संशोधन, सृजनशीलतेवर आधारित उद्योजकता आणि गुंतवणुकीला चालना मिळणार आहे. अमेरिका आणि युरोपीय महासंघासोबत झालेल्या व्यापारी करारांनंतर संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे वळले आहे.

## बाबा

कथा
डॉ. माधव शोभणे

प्रेमाची माणसं आपल्यातून निघून जातात. तेव्हा त्यांच्या आठवणी पालवी झडून गेलेल्या फांद्यांसारख्या भासतात; अगदी तसंच आयुष्यातल्या मायेच्या, प्रेमाच्या माणसांचं अस्तित्व हरवलं तरी मायेच्या माणसांच्या अस्तित्वाची जाणीव होत राहते... पण मायेच्या सावलीची उणीव सदा जाणवतेच. आई गेली तेव्हा मधुरा आठव्या वर्गात होती. तेव्हापासून बाबा मधुराची काळजी घ्यायचे. तिला अगदी फुलासारखं जपायचे.

सकाळी लवकर उठायचे. पाणी गरम करून आंघोळ, देवपूजा झाली की मग मधुराला उठवायचे. तिची आंघोळ झाली की तिचे केस धुतले असतील तर सुकून द्यायचे. केस विंचरायचे. वेणी घालून द्यायचे आणि मग दोघे मिळून स्वयंपाक करायचे. डबा घेऊन बाबा ऑफिसला जायचे आणि मधुरा शाळेत. बाबा म्हणायचे, ''संध्याकाळी मी येईपर्यंत तू कशालाही हात लावायचा नाही. अगदी चहा करायचा प्रयत्नही करायचा नाही. मी आल्यावर आपण दोघे मिळून सगळं करूया.'' त्यात काळजी होती. बापाचं प्रेम होतं. मधुराला आईची उणीव कधी भासली नाही. असाच एकदा मधुराला ताप आला. बाबांनी हाक मारली, पण तिला उठावसं वाटेना. मग तेच जवळ गेले. ''बाळा उठतेस ना?'' बाबा मधुराच्या मानेला हात घालत म्हणाले. तसा चटका बसून ते मागे सरकले... ''बापरे..! चांगलाच ताप आला तुला तर, मला सांगायचं तरी ना?'' तेव्हा ७ वाजले होते. त्यांचे फॅमिली डॉक्टर १० वाजता क्लिनिकला यायचे. त्यांनी थंड पाण्याच्या पट्ट्या कपाळावर ठेवल्या. वेळोवेळी त्या पट्ट्या बदलत राहिले. पाय दाबून दिले. मायेने गालावर हात फिरवला. मनातल्या मनात म्हणाले, ''देवा! आई असताना पोरं कधी आजारी पडली नाही आणि आज तिला ताप आला.'' मटकन त्यांच्या डोळे भरून आले. हे मधुराच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. ती तापानं फणफणत कशीबशी उठून बसली. तिनं आपल्या हाताने बाबांचे डोळे पुसले आणि म्हणाली, ''बाबा, तुम्ही नुसतेच बाबाच नाहीत तर माझी आईदेखील आहात. किती गोड आहात. हे शब्दात नाही सांगता यायचं मला. पण खरंच खूप खूप छान आहात. मला पुनः पुन्हा तुमच्याच घरात जन्म घ्यायचा आहे. मला दुसरे कुठलेच बाबा नको आहे.'' ''आमच्या पोटीसुद्धा आम्हाला तुझ्यासारखी गोड मुलगी पुनःपुन्हा हवी आहे.'' असं म्हणत बाबांनी मधुराच्या गालावर मायेने हात फिरवला. मग दोन दिवस बाबा ऑफिसला गेले नाहीत. जेव्हा मधुरा पूर्ण बरी झाली. तेव्हा ती शाळेला निघाली आणि बाबा ऑफिसला. आईच्या मागे मायेचा बाप होता. म्हणून मधुराला आईची उणीव जाणवली नाही. पाहता पाहता मधुराचं ग्रॅज्युएशन पूर्ण झालं आणि पोरं लग्नाला आल्याची जाणीव बाबांना झाली. त्यांनी मुलगा शोधायला सुरुवात केली. नागपूरचाच, पण दूरच्या नात्यातील एक इंजिनीअर मुलगा त्यांच्या लक्षात होता.




मुलगा दिसायला सुंदर आणि सर्वगुणसंपन्न होता. मागील एक वर्षापासून मुलांकडच्यांनी मधुराला मागणी घातली होती. पण फायनलचं वर्ष असल्यामुळे मधुराच्या बाबांनी पुढे पाहू म्हणून सांगितले होते. आता पुन्हा तेचं स्थळ सांगून आलं होतं. बाबांना स्थळं पसंत होतं. केवळ मधुराच्या होकाराची गरज होती. मधुराही बाबांच्या शब्दाबाहेर नव्हतीच. त्यामुळे हे लग्न सहजासहजी जुळून आलं. लग्नाचा दिवस उगवला. दोन्ही मावश्या आल्या, आत्या आल्या. मामा- मामी आली. इतरही आप्त स्वकीय मंडळी आली होती. लग्न मंडप पाहुण्यांनी ओसंडून वाहत होता. सगळ्याच महिला नटल्या होत्या. सगळेच आपापल्या बायकोबरोबर सेल्फी काढण्यात दंग होते; मधुराचे बाबा मात्र एकटेच होते. त्यांच्या मागे आई नाही आणि पुढेही नाही, हे पाहून मधुराला गलबलून आले. तिने सगळ्या मैत्रिणींना तिच्या रूममधून बाहेर काढले. बाबांना आत बोलावलं. त्यांच्या गळ्यात पडून म्हणाली, ''बाबा! आईशिवाय तुम्ही किती एकटे एकटे दिसता. मीसुद्धा गेले तर तुमच्याकडे कोण लक्ष देणार? मला नाही लग्न करायचं.'' ''मधुरा बेटा, बाहुल्यावर चढल्यावर असं काही बोलू नये आणि मी एकटा कुठे आहे. ते बघ तुझी आई बघते आहे माझ्याकडे फोटोमधून. तिच्या चेहऱ्यावरसुद्धा हसू आहे आणि खुश आहे ती. तुला अशी नवरीच्या वेशात पाहताना तिलाही खूप आनंद होत असेल. त्यामुळे डोळ्यात पाणी नाही आणायचं.'' मधुराने डोळे पुसले. हुंदका आवरला अन- तशीच बाबाला बिलगून राहिली. ''तू सुखी राहा! मन लावून संसार कर. मी राहीन व्यवस्थित; आणि तसं जावईबापूशी बोललो आहे मी. तुमचा संसार रंगला की मी तुमच्याकडे येणार आहे राहायला.

(पान ६ वर)

# लोकाभिरामं रणरंगधीरं, राजीवनेत्रं रघुवंशनाथ

संत
प्रकाश एदलाबादकर

आज सहजच काही वर्षांपूर्वीचा एक कीर्तनप्रसंग आठवला. चैत्राचे उन्ह ऐन भरात आले आहे. माध्यान्ह काळ झाला आहे. अंगातून घामाच्या धारा वाहताहेत. मंदिरासमोर घातलेल्या मंडपातील गर्दीची उत्सुकता शिगेला पोचलेली आहे. गुलाल-फुलांनी भरलेली ओंजळ आपण केव्हा उधळतोय, याची प्रत्येकाला घाई झालेली आहे. कार्यकर्त्यांची धावपळ सुरू आहे. बुवांचे कीर्तन टिपेला पोचलेले आहे. बुवांच्या समोरच आकर्षक पद्धतीने सजविलेल्या पाळण्यात प्रभुरामचंद्रांची मूर्ती आणि चित्र आहे. मंदिराच्या सभामंडपात तर नुसती रेटारेटी सुरू आहे आणि शेवटी कीर्तनकार बुवा, रामचंद्रांचा जयजयकार करून, प्रभुरामाचा जन्म झाल्याची घोषणा करतात.. ' **मधुमासे सीते पक्षे नवम्यां कर्कटे शुभे। पुनर्वस्त्रृक्षसहिते उच्चस्थे ग्रहपंचके। मेषम पूषणि संप्राप्ते पुष्पवृष्टिसमाकुले। आविरासीज्जगन्नाथः परमात्मा सनातनः।।**' ...आणि रामजन्म झाला.

चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील नवमी तिथीला शुभ असे कर्कलग्न. पुनर्वसू नक्षत्र विराजमान आहे. सूर्य हा मेष राशीत प्रवेश करता झाला आहे. पाचही ग्रह उच्च स्थानी आहेत. सूर्यदेव डोक्यावर आले आहेत. ऐन माध्यान्ह काळ झाला आहे. त्याच क्षणाला सनातन परमात्मा असलेले हे जगन्नाथ पृथ्वीवर आविर्भूत झाले. काय तो आनंद वर्णावा! पुष्पवृष्टीने आकाश भारून गेले सारी अयोध्या नगरी आनंद विभोर झाली... कीर्तनकार बुवांचे शब्द कोलाहलात विरून जातात. रामनामाचा जयजयकार, वाद्ये, गजर, यांचा एकच गलका होतो. उधळलेल्या गुलालाने आणि फुलांनी परिसर कुंद होतो. रामाच्या पाळण्याची दोरी एकदा तरी हलविण्यासाठी महिला वर्गाची झुंबड उडते. बुवांच्या सूचना आणि पुजाऱ्याचा ओरडा कुठल्या कुठे विरून जातो. सुंठवडा खाऊन आणि प्रसाद ग्रहण करून मंडळी हळूहळू पांगतात. दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व शांत होते. मंदिरातील गर्दी तुरळक होते. संध्याकाळी येणाऱ्या दर्शनार्थींची गर्दी सरली की रात्री सर्वत्र सामसूम. माझ्या घराच्या समोरच असलेल्या प्रभुरामचंद्रांच्या मंदिरात दरवर्षी होणार हा रामजन्म सोहळा मी गेली कित्येक वर्षे बघतोय. मला खूपदा जाणवते, विशेषतः अलिकडे तर फारच की, रामजन्माच्या सोहळ्याच्या गर्दीत 'राम' हरवून गेलेला आहे. कार्यक्रमांमागील उत्साह, त्यासाठी घेतलेले परिश्रम, आयोजित होणारे विविध कार्यक्रम, शोभायात्रा यामागे परिश्रम नक्कीच असतात. तरीही गेली कित्येक वर्षे आपण हे कार्यक्रम आयोजित करीत असूनही त्यांचा व्हावा तसा परिणाम समाजावर का दिसत नाही? या सर्वात 'राम' कुठेतरी हरवल्यासारखा वाटत नाही काय? रामचंद्राला आपण परमेश्वराचा अवतार मानतो. का घ्यावा लागला प्रभूंना अवतार? प्रभूंनी स्वतः सांगितलेले आहे की, मानवधर्माचा रक्षणासाठी मी अवतार घेतलेला आहे. वाल्मीकि रामायणाच्या अरण्यकांडात एक श्लोक आहे... '**किन्नुवक्ष्याम्यहं देवी त्वयैवोक्त मिदं वच। क्षत्रियैर्धार्यते चापो नार्तशब्दो भवेदिती। अप्यहं जीवितं जह्यामब त्वां वा सति सलक्ष्मणां। न तुं प्रतिज्ञा संश्रुत्य ब्राह्मणेभ्यो विशेषतः।।**' 'आपण सध्या तापसी वेषात आहोत तेव्हा तापस वेषात शस्त्रे का धारण करता?' असे एका प्रसंगात सीतेने प्रभूंना विचारलेले आहे. त्यावर 'तापसी वेषात असलो तरी मी प्रथमतः क्षत्रीय आहे. क्षात्रधर्म हा माझा प्रथम धर्म आहे. मानव धर्म आणि सज्जनरक्षणासाठीच मी ही शस्त्रे धारण केली आहेत' हे प्रभुरामचंद्रांनी भगवती सीतेला दिलेले उत्तर आहे. प्रभू पुढे असेही म्हणाले की, 'माझ्या वचनांचे मी काटेकोरपणे पालन करीन.' माझ्या मनात, गोस्वामी संत तुलसीदासांच्या रामचरित मानसातील, 'रामगीता' उभी राहिली. श्रीरामचरित मानसाच्या उत्तरकांडात ती समाविष्ट आहे. याद्वारे प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांनी आपल्या प्रजाजनांशी संवाद साधलेला आहे. हा संवाद म्हणजे तत्कालीन 'मन की बात' होती असेच म्हणा ना! वर्णन असे आहे... '**एक बार रघुनाथ बोलाए । गुरु व्दिज पुरबासी सब**



**आए। बैठ गुर मुनि अरु व्दिज सज्जन। बोले बचन भगत भव भंजन। सुनहु सकल पुरजन मम बानी।** आपल्या 'मन की बात'ची भूमिका प्रभूंनी प्रथमतः स्पष्ट केलेली आहे. प्रजाजनांना ते म्हणतात, 'मी जे तुमच्याशी बोलणार आहे, ते तुम्ही राजाज्ञा म्हणून स्वीकारू नका. माझे बोलणे आणि माझे राजा असणे यांचा संबंध नाही. मी प्रसन्न असावे यासाठी माझे म्हणणे मान्य करू नका. ऐका, विचार करा आणि पटत असेल तर स्वीकारा. आपल्या स्वतंत्र बुद्धीनुसार माझ्या अनुशासनाचा विचार करा. असा सेवकच मला प्रिय आहे. माझ्या बोलण्यात नीतितत्त्वांना सोडून काही गोष्टी आल्या आहेत असे जर, तुम्हाला जाणवत असेल तर ते मला निर्भयपणे सांगा. तो अधिकार मी तुम्हाला दिलेला आहे.' आपल्या मृदू आणि आश्वासक वचनांनी प्रभूंनी जनतेला विश्वासात घेतले. याचाच अर्थ असा की, रामराज्यात आचार आणि विचार यांचे स्वातंत्र्य होते. आपल्या पारमार्थिक आणि प्रापंचिक कल्याणासाठी प्रजाजनांना श्रवण, मनन आणि उच्चार यांचे स्वातंत्र्य दिले जात नाही, तोपर्यंत त्यांच्या मनात भय, शंका आणि संकोच कायमस्वरूपी राहील हे प्रभूंना ठाऊक होते. आपले मनोगत निर्भयपणे मांडण्याची प्रजेला मुभा होती. यानंतर प्रभू जे म्हणाले होते त्याकडे आजच्याही प्रजेने गांभीर्याने लक्ष द्यायला हवे, तरच रामराज्य प्रत्यक्षात येईल. प्रभू पुढे म्हणाले...

'**बडे भाग मानुष तनु पावा। सुर दुर्लभ सब ग्रंथन्हि गावा। साधन नाम मोच्छ कर द्वारा। पाई न जेही परलोक संवारा। सो परत्र दुख पावइ सिर धुनि धुनि पछिताई। कालहि कर्मही ईस्वरहि मिथ्या दोस लगाई।।**' रामप्रभूंच्या बोलण्याचा मथितार्थ असा की, आपले भाग्य मोठे की, आपल्याला मानव जन्म प्राप्त झाला आहे. मानवाचा जन्म प्राप्त होणे ही महाभाग्याची बाब आहे. कारण मानव योनी ही साधन योनी आहे. मानव योनीत जन्माला येण्याची देवांचीही इच्छा असते. देवयोनीत कर्मसाधन नसते. तेथे केवळ केलेल्या कर्माचा भोग असतो. मानवी शरीर हे कर्मांचे साधन म्हणून सर्वश्रेष्ठ आहे. या मानव शरीराची प्राप्ती झाली तर, अनेक साधनांनी अनेक कर्मे करता येतील आणि योग्य साधनेने मोक्ष प्राप्त होईल. कारण मनुष्ययोनी हेच मोक्षप्राप्तीचे एकमेव साधन आहे. राम स्वतःच अग्निरूप होते, चंडप्रतापी होते. एकट्या रामाला वंदन करणे म्हणजे पुराणांतरीच्या तीन रामांना वंदन करणे होय, असे गोस्वामी तुलसीदासांनी म्हटलेले आहे...

'**बंदउं नाम राम रघुवरको। हेतू कृसानु भानू हिम करको।**' कृशान म्हणजे अग्नी. अग्निकुळातील परशुराम. भानू म्हणजे सूर्य. सूर्यकुळातील दाशरथी राम आणि हिमकर म्हणजे चंद्र. चंद्रकुळातील बलराम! केवळ राम या एकाच नावाच्या उच्चाराने या तीनाही रामांना वंदन घडते. या तिन्ही रामांनी त्यांच्या त्यांच्या काळात पराक्रमाच इतिहास घडविलेला आहे. क्षात्रधर्माचे ही तीन आदर्श आहेत. कशासाठी त्यांनी हा क्षात्रधर्म स्वीकारला? दुष्टांचा समूळ नाश करून धर्मरक्षण आणि समाजातील सज्जनशक्तींचे रक्षण करायला! 'रामः शस्त्रभृतांमहं' असे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे. मूळ मुद्दा हा की, मानवतेचे आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी ज्या रामाने अवतार घेतला त्या रामाच्या वचनांचे प्रतिपालन आपण कितीसे करीत आहोत? आज समाजाचा बुद्धिभेद करणारे आणि सम ाजाला संभ्रमित करणारे विचारवंत(?) सर्वत्र बोकाळले आहेत. आपल्या प्राचीन विचारविश्वाला तडे पाडण्याचे त्यांचे कार्य जोरात सुरू आहे. अशा वेळेस आपण केवळ उत्सव साजरे करीत राहू नये. या उत्सवाच्या माध्यमातून काही नवे प्रबोधन घडेल आणि बुद्धिवादाचा बुरख्याआडून धर्म-संस्कृतीला तडे देणाऱ्यांचा मुखभंग होईल असे प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. आपण सर्व या ना त्या कारणाने परमेश्वराच्या अवताराची वाट बघत आहोत. तो येईल आणि आपले रक्षण करेल. परंतु तो असा येत नसतो. तो आपल्यातूनच निर्माण व्हावा लागतो आणि नेमके हेच समर्थ रामदास स्वामींनी तत्कालीन जनतेपुढे आदर्श ठेवले. आज गरज आहे ती, नव्या-उगवत्या पिढीला हाताशी धरण्याची. आजच्या पिढीच्या मनात आपल्या परंपरेविषयी, संस्कृतीविषयी अनेक प्रश्न आहेत. नवी पिढी अश्रद्ध आहे असा समज निष्कारण करून घेण्यात हंशील नाही. ही पिढी अश्रद्ध नाही तर चिकित्सक आहे. त्यांच्या मनातील प्रश्नांची योग्य उत्तरे देऊन त्यांच्या श्रद्धा बळकट करणे हाच त्यावर उपाय आहे. त्यासाठी रामप्रभूंचा आदर्श त्यांच्या पुढे नव्याने मांडावा लागेल. आपले ध्येय हे येणाऱ्या पिढीला राष्ट्रधर्मी आणि समाजधर्मी बनविण्याचे आहे. त्यातूनच आगामी पिढ्यांचे सांस्कृतिक भरणपोषण होईल. 'सर्वभूत हिते रतः' अशी आपल्या समाजाची प्रतिमा तयार झाली पाहिजे. प्रभुरामचंद्रांनी त्याकाळी हेच केले. आपल्या आचरणातून समाजाला एक आदर्श घालून दिला. राम हा मनुष्य जन्माला आला आणि स्वकर्तृत्वाने देवत्व पावला, हे समजून घेतले पाहिजे. रामाने उत्तर व दक्षिण भारत जोडला तर श्रीकृष्णाने पश्चिम-पूर्व भारत सांधला. एकात्म आणि एकरस भारतवर्ष असा हा त्रेतायुगापासून द्वापारयुगापर्यंत निर्माण झाला. तो भारतवर्ष आज कितीसा शिल्लक आहे? काळाच्या ओघात अनेक बदल घडले. अनेक मूल्ये काळाच्या उदरात गडप झाली. अनेक आधुनिक समाजमूल्ये प्रस्थापित झाली. परंतु काळाच्या ओघात तीच मूल्ये टिकली जी शाश्वत होती आणि आजही आहेत. ती मूल्ये आहेत राम आणि कृष्ण! हिंदू धर्मातील ही उर्ज्वस्वल मूल्ये आहेत. येणाऱ्या काळातील प्रत्येक उत्सवातून ही मूल्ये जोपासण्याचे आणि संवर्धित कारण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. अंतिमतः हीच मूल्ये मानव धर्माचे रक्षण करणारी ठरतील. '**श्रीरामः शरणं समस्तजगतां रामं विना का गती। रामेण प्रतिहन्यते कलिमलं रामाय कार्यं नमः।। रामात त्रस्यति कालभीमभुजगो रामस्य सर्वं वशे। रामे भक्तिरखंडिता भवतु मे राम त्वमेवाश्रयः।।**' ।। जय श्रीराम ।।



# त्या मुलांच्या 'गंधकोषी'

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

काही वर्षांपूर्वी मी अमरावतीच्या शाश्वत स्कूल या शाळेला भेट देण्यासाठी गेलो होतो. तिथे गेल्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापकांच्या टेबलवर एक बोर्ड होता. त्यावर लिहिले होते Every child r uniqe. 'तारे जमीपर' हा चित्रपट आपल्यापैकी अनेकांनी पाहिला असेल. त्यातील ईशान अवस्थी आठवतो का? त्याला जेव्हा होस्टेलमध्ये दाखल केले जाते तेव्हा तो अतिशय दुःखी होतो आणि कोणाशीही बोलत नाही कारण तो आपल्या घरापासून आणि आईपासून तुटतो. या ईशानला डिस्लेक्सिया नावाची एक व्याधी आहे. तो b आणि व, ६ आणि ९ यासारख्या गोष्टींमध्ये फरक करू शकत नाही. पण ही व्याधी बुद्धिमत्तेशी संबंधित नाही. अशा मुलांना समजून घेणे जरुरीचे असते. या चित्रपटातील शिक्षकाचे काम आमिर खान या गुणी नटाने केले आहे. तो त्या मुलाला समजून घेतो आणि त्याच्यातील सुप्त गुणांना वाव देतो. त्याला असे आढळून येते की ईशान हा चित्रकलेमध्ये अतिशय प्रगती करू शकेल आणि तो त्याच्या त्या गुणांना प्रोत्साहन देतो. आणि होतेही तसेच. पुढे जी चित्रकला स्पर्धा घेतले जाते, त्यात ईशानच्या चित्राला प्रथमपारितोषिक मिळते. या चित्रपटातील हर बच्चा खास होत आहे हे वाक्य म्हणजे वरील Every child r uniqe हीच गोष्ट ध्वनीत करते. पण आम्ही मुलांना शिकवताना नेमकी हीच गोष्ट विसरतो. सगळ्या मुलांना जणू एकाच साच्यात बसवण्याचा प्रयत्न करतो. पण ही मुले वेगवेगळी आहेत, त्यांना प्रत्येकाला वेगळे व्यक्तिमत्व आहे, त्यांची आवड निवड वेगळी असू शकते या गोष्टी आम्ही दुर्लक्षित करतो किंवा सोयीस्कर विसरतो. आम्हाला हवी असते सतत ए ग्रेड किंवा ९०% च्या पुढे परीक्षेतील गुण. आम्ही त्यांना रेसचे घोडे बनवतो. पण या सगळ्या खटाटोपात आम्ही त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहन देत नाही. त्यांचे बालपण या सगळ्यात खुरटते. या फुलांना नीट उमलायला आम्ही वावच देत नाही ही आजची शोकांतिका आहे.

पक्षी छान उडू शकतात, मासे छान पोहू शकतात, हरणे धावू शकतात. पण हरणांना उडायला सांगता येणार नाही, पक्षांना पोहायला सांगता येणार नाही किंवा माशांना धावायला सांगता येणार नाही कारण प्रत्येकाचे गुणवैशिष्ट्य वेगळे आहे. हीच गोष्ट मुलांच्या बाबतीत सुद्धा आपण लक्षात घ्यायला हवी. एखादा मुलगा उत्तम खेळाडू होऊ शकतो, एखादा उत्तमचित्रकार होऊ शकतो, एखाद्याला गाण्याचे अंग असते. अशा विविध प्रकारच्या क्षमता प्रत्येक मुलाच्या अंगी असू शकतात. एकाच मुलाकडून सर्व गोष्टींची अपेक्षा आपण करू शकत नाही. ज्या परमेश्वराने किंवा निसर्गाने आपल्याला घडवले आहे किंवा जन्मदिला आहे त्याची सुद्धा तशी अपेक्षा नाही.

रवींद्रनाथ टागोर हे थोर शिक्षणतज्ज्ञ होते आणि महान कवी, साहित्यिक. पण त्यांना शिक्षणाची पारंपारिक चौकट मान्य नव्हती. त्यांना स्वतःला देखील लहानपणी शिकताना अशा प्रकारच्या शिक्षणात रस वाटत नव्हता. म्हणूनच तर मोठेपणी त्यांनी त्यांच्या स्वप्नातल्या शाळेची म्हणजेच शांतीनिकेतनची निर्मिती केली. या शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या आवडीनुसार शिकण्यासाठी वाव दिला गेला. त्यांच्या मते शिकणं हा आयुष्याचा 'उत्सव' व्हावा. त्यांचे हात सर्जनशील व्हावेत. पु ल देशपांडे यांच्यासारखा महान लेखक आणि अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेली व्यक्ती रवींद्रनाथांच्या या शिक्षण पद्धतीने भारावून गेली. त्यांनी रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनात अनेक दिवस मुक्कामकरून त्यांची शिक्षण पद्धती समजावून घेतली आणि ती वंगचित्रे, रवींद्रनाथ : तीन व्याख्याने यासारख्या पुस्तकातून आपल्या समोर मांडली.

मुलांना केवळ पुस्तकातील किडे न बनवता त्यांना जीवनाचा सर्व बाजूंनी आनंद घेता यावा अशी दृष्टी विकसित करणे आवश्यक आहे. त्यांच्यात प्रेमआणि नैतिक मूल्ये रुजतील असे वातावरण आपण त्यांना उपलब्ध करून द्यायला हवे. त्यासाठी त्यांच्या स्तरावर जाऊन त्यांना समजून घेतील आणि समजून देतील अशा शिक्षकांची आवश्यकता आहे. म्हणून क्रीडांगणे मुलांच्या गजबजाटाने फुलली पाहिजेत, वाचनालयात मुलांची गर्दी हवी, वर्गामध्ये कठोर शिस्तीच्या ऐवजी हसत खेळत शिकता यायला हवे. अनावश्यक विषयांचे आणि पाठीवरील दप्तराचे ओझे कमी व्हायला हवे. मुलांना शाळेत जाणे ही आनंदाची गोष्ट वाटली पाहिजे ती शिक्षा वाटता कामा नये. हे उगवते तारे आहेत, उमलती फुले आहेत ती कोमेजून जाता कामा नये याची दक्षता घ्यायला हवी. ही मुले म्हणजे आपले भविष्य आहे. यात पालकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. (पान ६ वर)



# काल सत्य की काल्पनिक?

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

भूतियोगात भगवंत सांगतात, कालः कलयतामहम्। (१०-३०) मोजणारांत काळ मी. (आचार्य विनोबा) दूरदर्शनवर 'महाभारत' या मालिकेचा निवेदकही सांगतो, 'मैं काल हूँ' आणि मी कसा तर 'अहमेवाक्षयः कालो...' (१०-३३) मी चि अक्षय तो काळ (गीताई). काळाला क्षय नाही. तो आदी आहे, मध्य आहे आणि नंतरही आहे. भूतही आहे आणि भव्यही आहे. येथे मी भूत, वर्तमान आणि भविष्य या तीनही ठिकाणी आहे, असे जे वर्तमानसूचक क्रियापद वापरलेले आहे, ते सहेतूकच आहे हे पुढील चर्चा वाचल्यावर लक्षात येईल. मात्र 'कालाचे अस्तित्व आणि स्वरूप' कसे आहे; किंबहुना असे काही तत्त्व खरोखरच अस्तित्वात आहे की नाही, याबद्दल तत्त्वज्ञ, योगिजन, शास्त्रज्ञ, विचारवंतांत मतभेद आहेत. याच्या इतका वादग्रस्त मुद्दा दुसरा नाही. आपण क्रमशः एकेकाचा परामर्ष घेऊ...

१) न्यूटॉनिक भौतिकशास्त्र म्हणते की, काल हे स्वतंत्र तत्त्व आहे. अनंतकाळापासून त्याचा प्रवाह सुरू आहे. येथेही एक तर्कशास्त्रीय दोष आहे. तो असा की, ज्याविषयी बोलावयाचे त्याच्याकरिता त्याचाच आधार घ्यावा लागतो; पण असे होण्याला प्रत्यवाय नाही. असो. **संथ वाहते कृष्णामाई। तीरांवरच्या सुखदुःखांची।** तीजला जाणीव नाही. याप्रमाणे काळ आणि घटना यांचा काही संबंध नाही. दोघेही स्वतंत्र. घटना घडतात आणि इतिहासाच्या गाठोड्यात जमा होतात.

२) आईनस्टाईनचा सापेक्षतावाद सांगतो की, कालाला स्वतंत्र अस्तित्व नाही. क्ष, य आणि झ म्हणजे लांबी, रुंदी, उंची या तीन परिमाणांप्रमाणेच काल हे चौथे परिमाण असून न्यूटन म्हणतो तसे स्वतंत्र नाही तर ते सापेक्ष आहे. अवकाश आणि गुरुत्व यांचा तो संयुक्त परिणाम आहे. म्हणून प्रत्येकाच्या दृष्टीने कालमापन निराळे असते. येथे भागवतातील एक कथा आठवते. सूर्यवंशी रैवतराजा कन्या रेवतीसाठी वरसंशोधनास थेट ब्रह्मलोकात गेला. ब्रह्मदेव म्हणाला तुझ्या कन्येसाठी मी एक वर नियोजित केला होता, पण तू परत जाईपर्यंतच्या येथील काळात तिकडे पृथ्वीवर ४३,२०,००० वर्षांचे एक याप्रमाणे २७ महायुगे उलटून २८ व्या महायुगातील द्वापार युग सुरू असेल. आता तू यदुकुळातील बलरामाशी रेवतीचा विवाह लाव. सारांश मृत्युलोकातील पृथ्वी आणि ब्रह्मलोक यांच्या कालगतीत फरक असतो. सापेक्षतावाद हेच सांगतो- गती आणि स्थितीप्रमाणे काळ बदलतो.

३) **भौतिकी:** यात काही उलटसुलट विधाने असून सर्वच आपापल्या जागी योग्य आहेत. याप्रमाणे अवकाशासारखा तो मूळ घटक आहे की गणनेचे एक परिमाण आहे, यावर चर्चा आहे.

४) **तत्त्वज्ञान:** यातही पाश्चात्त्य आणि पौर्वात्त्य असे दोनही विचारात घेतले तरी त्यात अनेक मतप्रवाह वाहतात.

**वर्तमानवाद** : आहे तो क्षण तेवढाच खरा. फक्त आता आहे तेच. पूर्वी झाले ते भूत, पुढे भविष्य म्हणून काही असेलच असे नाही. Eternalism- कालाची नित्यता मानणारा विचार. यात काल म्हणजे पसरलेले एक अथांग तलम महावस्त्र अशी कल्पना असून त्यावर भूत, वर्तमान आणि भविष्य हे तिघेही एकाच वेळेस अस्तित्वात आहेत आणि त्यावर विश्व निश्चित गती आणि दिशेने सरपटत आहे. सरपटत म्हणण्याचे कारण त्याच्या अल्प उंचीमुळे त्याला पुढे पसरलेला भविष्यमार्ग दिसत नाही. मागे काय गेले ते आता आपल्या हातात नाही. पुढे काय वाचावयाचे आहे ते माहीत नसले, तरी ठरलेले आहे. थोडक्यात कालपुस्तिकेत भूत- वर्तमान- भविष्याची पाने आधीपासूनच तयार आहेत. अनुक्रमणिकाही ठरलेली आहे. आपण मात्र एकावेळेस एकच पान वाचतो. या वस्त्रवादातून एक प्रश्न उद्भवतो की, जर पुस्तक आधीच लिहिलेले असेल तर प्रवास स्वातंत्र्य आहे का की फक्त नियत मार्गावरूनच विश्वाने चालावयाचे आहे? सापेक्षतावादाप्रमाणे प्रत्येकाचे वर्तमान ज्याच्या त्याच्या स्थितिसापेक्ष भिन्न असते. यालाच 'ब्लॉक युनिव्हर्स' असे म्हणतात. अजून एक मत म्हणजे काळ हा काल्पनिक असून दोन भिन्न घटनांमधील अंतर सांगण्याची एक व्यावहारिक पद्धत. उदा. गांधींचा जन्म (१८६९) झाल्यानंतर २० वर्षांनी नेहरूंचा जन्म झाला (१८८९).

२० वर्षे पृथ्वीची असे सांगायला हवे. कारण शनीवर कोणी निरीक्षक असेल तर त्याला मध्यंतरी फक्त आठच महिने उलटले आहेत असे दिसेल. लेबनित्स हा न्यूटनचा समकालीन जर्मन तत्त्वज्ञ आणि गणिती म्हणतो की, काल हा स्वतंत्र नसून घटनांच्या क्रमाची साखळी आहे. त्यातील एकेक दुवा म्हणजे एकेक विशिष्ट कालखंड. काल व अवकाश या कल्पनाच भिन्न आहेत. कालाला स्वतंत्र अस्तित्व नाही. दोन घटनांमधील संबंध म्हणजे काल. हे बौद्धांचा क्षणिकतावाद, गीतेतील क्षर विचार याच्याशी बऱ्याच अंशी मिळते. जुळते आहे. इतकेच नव्हे, तर गीतेतील अक्षर पुरुष म्हणजे लेबनित्सचा मोनॅड कण. त्याविषयी आता बोलणे हा एक स्वतंत्र विषय होईल.

थोडक्यात म्हणजे न्यूटनने नियम सांगितले, लेबनित्सने त्याची कारणमीमांसा केली. त्याच्या मते विश्व हे यंत्र नसून अर्थपूर्ण सुसंवाद आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रात गतीची जाणीव करून देणारे तत्त्व म्हणजे काल. द्रव्यनिर्मिती होताना एका अणूचे दोन अणू होताना लागणारा अवधी, अर्थात नवीन कण आकारास येण्यासाठी लागणारा अवधी म्हणजे क्षण. कण आणि क्षण म्हणजे स्थिती आणि गतीचे संबंध. वैशेषिक दर्शनाने कण- लव- निमेष-काष्टा कला-मुहूर्त-दिवस-वर्ष-युग-महायुग असे कालगणनेचे कोष्टकच दिले आहे. गॅलिलिओने ठरावीक लांबीच्या लंबकाचा एक झोका होण्यास लागणारा काळ म्हणजे सेकंद असे सांगितले. आधुनिक भौतिकशास्त्राने सेकंदाची नेमकी व्याख्या म्हणजे सिझेनियम १३३ अणूची ९१९२६३१७७० कंपने होण्यास लागणारा काळ अशी सांगितली असून ती सर्वात योग्य आहे. सुरुवातीलाच गीतेतील संदर्भ दिले. वेदान्ताप्रमाणे काल हे अंतिम सत्य नसून तोही मायेचाच एक भाग मानला आहे. आत्मा हा भूत, वर्तमान आणि भविष्य या पलीकडे आहे. गाढ झोप किंवा ध्यानावस्थेत वेळेची जाणीवच लोपते. त्यामुळे वेळ ही मनाशी जोडलेली कल्पना आहे. वेदान्तातील काळाशी संबंधित काही विधाने पुनःपुन्हा हेच सांगतात. श्रीमद् शंकराचार्य विवेकचूडामणीत स्पष्ट सांगतात- '**कालोऽप्यनाद्यन्तमयः प्रपंचो माया मय चित्तविकल्परुपः। मायात्मकेऽस्मिन्सति कालनाशे त्वं नित्यशुद्धः परम स्वरुपः।।**' म्हणजे काळ हा मायेचाच एक भाग असून मनाचा विकल्प आहे. गौडपादाचार्यांच्या मांडूक्यकारिकेप्रमाणे- 'कालो नास्ति इति चेत तत्र त्रिकालातीततां वदेत्। कालस्य कल्पितत्वेन तद्भावे हि दृश्यते।। म्हणजे काळ ही फक्त कल्पना असून आत्मा दिक् आणि कालातीत आहे. दिक् म्हणजे दिशा- पूर्व- पश्चिम म्हणजे लांबी, उत्तर-दक्षिण म्हणजे रुंदी आणि वरखाली म्हणजे उंची. क्ष-य-झ हे तीन अक्ष. ब्रह्मसूत्र शांकरभाष्याप्रमाणे काल सृष्ट्युपलम्भनिमित्तम् न तु परमार्थतः अस्ति। काळ हा सृष्टीच्या अनुभवासाठी आहे. त्याला स्वतंत्र अस्तित्व नाही. गीतेत भगवंत सांगतात- 'कालोऽस्मि लोक क्षयकृत्प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृतः' म्हणजे मी सर्व दृश्यसृष्टीचा संहार करणारा काळ आहे. पूर्वी न्यूटनचे मत सांगताना जे इतिहासाचे गाठोडे म्हटले त्याप्रमाणे. न्यूटनच्या मतानुसार काल प्रत्यक्षात आहे आणि वेदान्ताप्रमाणे काल ही भगवंताची माया आहे. वेदान्ताचे कालविषयक मत सारांशाने सांगावयाचे तर आत्मा हा शाश्वत असून तो वेळेच्या बंधनापलीकडे आहे. वेळ ही फक्त अनुभूतीचे साधन आहे, परमार्थात त्याला अस्तित्व नाही. मग काळ आहे की नाही की तो फक्त मानवी कल्पनाच आहे? थोडक्यात पण व्यामिश्र पद्धतीने बोलावयाचे तर तो आहे पण आणि नाही पण. म्हणजे विविध संकल्पनेनुसार त्याविषयी असे म्हणता येईल. व्यवहाराच्या दृष्टीने काल हा सत्य आहे. तास- मिनीट- सेकंद, दिवस- ऋतू, बालपण-जरा, जन्म- मृत्यू, पंचांग, ग्रहगती.. या दृष्टीने काळ निर्विवादपणे खरा आहे. भौतिकशास्त्राप्रमाणे काळ सापेक्ष आहे. न्यूटनचा काळ सर्वत्र सारखाच, तर आईनस्टाईनचा काळ हा वेग आणि गुरुत्वसापेक्ष बदलतो. तो वस्तूंसारखा स्वतंत्र नसून घटनांशी गुंतलेला आहे. मानसशास्त्राप्रमाणे विचार केला तर निराळीच गंमत आढळते. एकाच स्थानी पण भिन्न प्रसंगात एकाचा काल कापरासारखा कधी उडून गेला ते समजतही नाही तर दुसऱ्याचा मात्र एकेक क्षण संपता संपत नाही. कारण पहिल्या व्यक्तीला आनंदात विहरतांना किती काळ उलटून गेला ते जाणवत नाही. दुसरी व्यक्ती मात्र कशाच्या तरी प्रतीक्षेत असते. ही दुसरी व्यक्ती ममुक्षु असेल तर- '**कै तो स्वामी भेटेल, कै तो बिरडे फिटेल। युगाहूनी वडील निमिष मानी।।**' अशा अवस्थेत असते. एकेक निमिष हे युगापेक्षाही मोठे वाटते. (निमिष म्हणजे पापणी मिटण्यास लागणारा काळ तर युग म्हणजे ४३२००० वर्षे) याप्रमाणे मानसशास्त्रातील काळ हा घड्याळ किंवा कॅलेंडरमध्ये नसून ज्याच्या त्याच्या मनात वसतो. तेव्हा हेच खरे की, कालाला स्वतंत्र अस्तित्व नाही तो सापेक्ष आहे.

# ग्रहसंकेत

## (रविवार, २२ फेब्रुवारी ते शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २२ फेब्रुवारी-** महर्षी याज्ञवल्क्य जयंती, बसवेश्वर रथोत्सव शेडबाळ, श्री लक्ष्मीदेवी पालखी सावळवाडी (ता. मिरज), उघडनाथ महाराज पुण्यतिथी शिगांव (ता. वाळवा) ✻ **सोमवार, २३ फेब्रुवारी-** संत गाडगेबाबा जयंती (तारीखेप्रमाणे), दत्त महाराज समाधीकाल आष्टा, श्री महादेवस्वामी धर्मरमठ यात्रा जनवाड (ता. चिकोडी) व शेडशाळ (ता. शिरोळ), हजरत यात्रा परंडा, कुलस्वामीनी उत्सव अणसुर, वामन बाबा पुण्यतिथी तळोजे ✻ **मंगळवार, २४ फेब्रुवारी-** दुर्गाष्टमी, जागतिक मुद्रण दिन, कैवल्याश्रमस्वामी पुण्यतिथी कणकवली, होलाष्टक प्रारंभ, श्री भैरवनाथ यात्रा नागराळे (ता. पलूस) , श्री अंबाबाई यात्रा बनगे, अष्टान्हिक पर्व प्रारंभ. (जैन) ✻ **बुधवार, २५ फेब्रुवारी-** अवतार मेहेरबाबा जयंती, श्री जनाबाई देवी यात्रा निवकणे, सिद्धेश्वर यात्रा अंकलगी गोकाक ✻ **गुरुवार, २६ फेब्रुवारी-** स्वा. सावरकर पुण्यदिन, दत्त उत्सव कुर्ली, सातेरी देवी वाढदिवस आरवली, श्री कलंकी केशव प्रकट दिन बेलगाव (ता. बार्शी), जानाईदेवी यात्रा दुसाळे ✻ **शुक्रवार, २७ फेब्रुवारी-** आमलकी एकादशी, मराठी भाषा गौरव दिन, बिरदेव यात्रा रेंदाळ (ता.हातकनगले) ✻ **शनिवार, २८ फेब्रुवारी-** राष्ट्रीय विज्ञान दिन, श्री सदगुरु बाळूमामा महाप्रसाद मेतगे, यशवंत महाराज जलनापूर पुण्यतिथी बार्शी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २२ फेब्रुवारी (१८ पर्यंत), २५ फेब्रुवारी ✻ **डोहाळ जेवण -** २२ फेब्रुवारी (१८ पर्यंत), २५ फेब्रुवारी (१४ नंतर), २६ फेब्रुवारी (१२ पर्यंत) ✻ **बारसे-** २२ (११ पर्यंत), २६ फेब्रुवारी (१२ पर्यंत), २८ फेब्रुवारी ✻ **जावळ-** २२ फेब्रुवारी, २६ फेब्रुवारी (१२ पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** २२ फेब्रुवारी, २४ फेब्रुवारी

### मेष :- अपेक्षित संधी लाभतील

चूक केल्याशिवाय अनुभव मिळत नाही आणि अनुभव घेतल्याशिवाय चूक कळत नाही. सप्ताहारंभी शुक्र गुरुचा होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. सोमवारी राशि स्वामी मंगळ लाभात येत आहे. हर्षलशी केंद्रयोग करणार आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. सरकारी कामे मनासारखी होतील. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. २२, २४

### वृषभः- उत्साहवर्धक घटना

सुंदर क्षण तेव्हा सुंदर बनतो, जेव्हा आपल्या मनात सुंदर विचार असतात. राशी स्वामी शुक्राचा गुरुशी त्रिकोण योग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. स्वमताग्रह टाळावा. यांत्रिक क्षेत्रात नव्या संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. क्रर्मस्थ मंगळामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. प्रगती घडेल. शुभ ता. २२, २५

### मिथुनः- नव्या कामांना गती

स्त्रियांच्या चेहऱ्यावरील हास्य सकारात्मक ऊर्जा, निखळ आनंद आणि अलौकिक तेजाचे प्रतीक आहे. गुरु शुक्राचा त्रिकोण योग शारीरिक, मानसिक स्वास्थ्य मिळवून देणार आहे. संतती, कौटुंबिक सौख्य चांगले मिळेल. नव्या कामाला गती मिळेल. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. कलागुणांचा विकास होत जाईल. मंगळ राश्यांतरानंतर प्रकृतीच्या तक्रारी कमी होतील. शुभ ता. २३, २७

### कर्कः- शारीरिक तक्रारी

स्वार्थ साधणारी माणसे, आपली कधीच नसतात. अष्टमातील ग्रहांमुळे शारीरिक तक्रारी राहतील. पूर्वार्धात कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रतिकूलतेतून मार्ग काढावा लागेल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. गुढ विद्येत प्रगती होईल. सरकारी कामे विचारपूर्वक करावीत. सुसंधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. शुभ ता. २२, २४, २५

### सिंहः- अवगुणांचा प्रभाव नको

आयुष्य म्हणजे काही वर्षासाठी भाड्याने घेतलेली मालमत्ता आहे. सप्तमात शुभाशुभ ग्रह जमले आहेत. त्यामुळे योग्य दिशेने वाटचाल करावी. मनावर कोणत्याही अवगुणांचा प्रभाव पडू देऊ नका. उष्णतेपासून त्रास होईल. योजलेली कामे विचारपूर्वक करावीत. प्रकृतीची काळजी घ्यावी. समस्या सुटत जातील. फार चिंता करू नका. शुभ ता. २३, २४

### कन्याः- मनासारखी प्रगती

आयुष्यात आज आपल्या सोबत कोण आहे, हे महत्त्वाचे आहे. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. पूर्वार्धात संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. मानसिक त्रास संभवतो. नोकरी व्यवसायात मनासारखी प्रगती होईल. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्र विशेष लाभदायक आहे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणी कमी होत जातील. शुभ ता. २२, २६

### तुलाः- चिंता नको

मनाचा गाभारा सुंदर विचाराने भरलेला असला की, शब्दातून संस्काराचा सुगंध दरवळतो. सोमवारी चौथा मंगळ पाचवा होत आहे. त्यामुळे अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. प्राप्तीचे विविध मार्ग लाभतील. नव्या संधीचे स्वागत करावे. धार्मिक, सामाजिक कार्य होतील. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. २४, २७

### वृश्चिकः- दगदग करू नका

स्वतःवर विश्वास ठेवावा. एक दिवशी घड्याळ दुसऱ्याचे होईल, पण वेळ आपली असेल. राशी स्वामी मंगळ ही चौथा होणार आहे. त्यामुळे फार दगद करू नका. स्थावर प्रश्न सध्या लांबणीवर टाकावेत. कौटुंबिक जीवनात एक विचाराने रहावे. वादविवाद टाळावेत. यांत्रीक क्षेत्रात प्रगती होईल. शुभ ता. २३, २५

### धनुः- अचानक खर्च

कर्माच्या वहीत काहीही पुसलं जात नाही आणि त्याची परतफेड होते अचूक व कठोर वेळेत. पराक्रमातील ग्रहांमुळे प्रगतीच्या घटना घडतील. पूर्वार्धात एखादा खर्च अचानक पुढे येईल. अनावश्यक बोलणे टाळावे. नवे विचार विचारपूर्वक स्वीकारावेत. कलेत प्रगती होईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २२, २४

### मकरः बेफिकीर राहू नका

कोणाची संगत सोडण्यापूर्वी तो आपल्याबरोबर इतका दिवस का आहे? याचा विचार करावा. राशीतील मंगळ धनस्थानी जात आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत बेफिकी राहू नका. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सर्व मनासारखे घडत जाईल. शुभ ता.२२, २६, २७

### कुंभः- विचाराने रहावे

आज खोटे हळू बोलले तर सर्व सर्वजण ऐकतील, पण खरे ओरडून सांगितले तर कोणी ऐकत नाही. राशीत मंगळ येत आहे. त्यामुळे विचाराने रहावे. कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्यावा, म्हणजे पुढे त्रास होणार नाही. अडचणी सुटत जातील. अनुभव शिक्षणातून मनासारखी प्रगती घडेल. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २२, २३


### मीनः- चिकाटीने रहावे

जीवनात सर्व गोष्टी एकदम मिळत नाहीत. व्ययात शुभाशुभ ग्रह एकत्र येत आहेत. त्यामुळे आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. चिकाटीने रहावे. कार्यसिद्धी होत जाईल. नव्या कामासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. डोळ्यांच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. गुंतवणूक विचाराने करावी. शुभ ता. २३, २६

!! शुभ भवतु !!

---

दुर्ग जिज्ञासा
प्राची पालकर



## महिपत, सुमार, रसाळ

महाबळेश्वर-कोयना डोंगररांगेच्या समांतर एक डोंगररांग थोडी विलग झालेली आहे; त्यावर महिपत, सुमार, रसाळ हे दुर्गत्रिकुट वसलेले आहे. तिन्ही किल्ले पूर्वी बहमणी राजवटीत होते. १६६० मध्ये कोकण मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात सामील करून घेतले. कोकणातील खेड तालुक्याच्या पूर्वेला वसलेल्या या किल्ल्यांवर जाण्यासाठी वाडीजैतापूर मार्ग सोयीचा आहे. जैतापूरवरून वाडी बेलदार गावात पोहोचलात की गडावर जाण्यास मळलेली वाट आहे.

दहिवली मार्गानेदेखील किल्ल्यावर जायचा मार्ग आहे; मात्र वाट लांबची असल्याने प्रचलित नाही. महिपतगडाचा विस्तार रसाळ आणि सुमारपेक्षा मोठा आहे. तीनही किल्ले घनदाट जंगलात असल्याने स्थानिक व्यक्तीला सोबत घेऊनच या परिसरातील भटकंती करावी. महिपतगड पायथ्याच्या वाडी बेलदार गावात पोहोचल्यावर साधारण पाऊण तासात महिपतगडावर पोहोचता येते. किल्ल्याची उंची ३१२० फूट आहे. महिपतगडावर पोहोचल्यावर उजव्या बाजूला बंधारा दिसतो. बंधाऱ्याच्या समोर विहीर आहे. तेथून पुढे चालत गेलात की झाडीतून थोडे खाली उतरल्यावर गडाचा खेड दरवाजा आहे. याठिकाणी प्रवेशद्वाराचे अवशेष आणि पायऱ्या आहेत तसेच या वाटेवर चुन्याच्या घाण्याचे एक चाक दिसते. खेड दरवाजा पाहून परत येताना डाव्या बाजूला थोडं चालल्यावर गडावरील श्री गणेश आणि हनुमान मंदिर आहे. दर्शन घेऊन पुढे गेल्यावर आपल्याला काही वास्तूंचे अवशेष दिसतात. त्यातील एक मोठी वास्तू किल्लेदाराचा वाडा असावा. गडावर पाण्याचा मोठा तलाव आहे. तलावाच्या पुढे गडटोकावर दोन बुरूज दिसतात. त्यातील उजवीकडे पुसाटी बुरूज आहे तर डावीकडे यशवंत बुरूज आहे. येथेच पूर्वी गडाचा पुसाटी आणि यशवंत दरवाजा होता.

गडाचे हे टोक पाहून झाले की परत तलावाच्या दिशेने येऊन श्री पारेश्वर शिवमंदिरात दर्शन घ्यावे. मंदिराच्या बाजूला विहीर आहे. अडचणीच्या वेळी गडावर मुक्काम करायचा असल्यास मंदिराचा आसरा होतो. मंदिराच्या मागे वाड्याचे अवशेष आणि काळकाई मातेचे मंदिर आहे. गडाच्या उत्तरेला कोतवाल दरवाजा आहे. दरवाज्याकडे जाताना वाटेत काही समाध्या आहेत. समाध्या तसेच होळीचा माळ पाहून पुढे गेल्यावर वाढलेल्या झाडीत लपलेल्या अजून काही समाध्या आणि लाल देवडी दरवाजा दिसतो. गडावर चुन्याचा मोठा ढिगारा आहे. येथून खाली दोन बुरूज दिसतात. गडाची ही बाजू पाहून झाली की काळकाई मंदिराच्या दिशेने परत आल्यावर मंदिराच्या बाजूने एक रस्ता दरीत उतरतो. थोडे उतरल्यावर शिव मंदिर आणि शिवगंगा दिसते. खाली गडाचा शिवगंगा दरवाजा आहे. किल्ल्याला एकूण सहा दरवाजे होते. खेड दरवाजा, पुसाटी दरवाजा, यशवंत दरवाजा, कोतवाल दरवाजा, शिवगंगा दरवाजा आणि लालदेवडी दरवाजा! आता मात्र दरवाज्यांच्या खुणाही शिल्लक नाही. इथे दरवाजा होता, असा अंदाजच बांधावा लागतो. गडाचा विस्तार मोठा असल्याने गड फिरण्यास दिवस लागतोच. महिपतगडाचा उल्लेख शिवकालीन कागदपत्रात आहे. १६७६ मध्ये महिपतगड स्वराज्यात असताना दसमाजी नरसाळा हे गडाचे किल्लेदार होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे मोरोपंत पिंगळे यांनी दसमाजी नरसाळा यांना एक पत्र लिहिले होते. हे पत्र 'श्री समर्थ संप्रदायाची कागदपत्रे' यात प्रसिद्ध आहे. समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील नात्याचे महत्त्व दर्शविणारे हे पत्र असून यावरून महिपतगड शिवकाळातील महत्त्वाचा किल्ला होता, हे लक्षात येते. सुमारगड सुमारगडावर जाण्यासाठीदेखील महिपतगडाच्या पायथ्याशी असलेल्या वाडी बेलदार गावातूनच वाट आहे. किल्ल्याची उंची साधारण २९५० फूट आहे. सुमारगड महिपतगडापेक्षा उंचीने कमी आणि रसाळगडापेक्षा उंचीने जास्त आहे. किल्ल्याच्या दिशेने चालताना ओढा पार केलात की समोर डोंगर दिसतो. तेथून समोर गुरुखिंडीपर्यंत जावे. अर्धा तास चालत गेल्यावर आपण सुमारगडाच्या पायथ्याशी पोहोचतो. गड चढायला सुरुवात केल्यावर एक बुरूज दिसतो; मात्र बुरुजापर्यंत जाणारी वाट कठीण आहे.

गडाला चारही बाजूने अभेद्य कड्यांचे नैसर्गिक संरक्षण असल्याने आणि वाटा अरुंद असल्याने जपून पार कराव्या लागतात. वाटेत आपल्याला दोन भुयारी टाके दिसतात. तेथून समोर गड चढायला सुविधा व्हावी म्हणून एक शिडी लावली आहे. शिडीने वर गेल्यावर गुहेत सतिशिळा ठेवली आहे. तेथून पुढे अजून एक गुहा दिसते. त्यात शिवलिंगाची स्थापना केली आहे. गडावर भोलाई देवीचे मंदिर आहे. मंदिरात देवीची मूर्ती, शिवलिंग आणि शाळुंका आहेत. दर्शन घेऊन पुढे गेल्यावर दोन टाकी आहेत आणि थोडे उंचावर खांब टाके आहे. पुढे गणपतीचे शिल्प असलेले टाके आहे आणि एक भुयारी तळघर आहे. गडाची ही बाजू पाहून परत आलात की, गडाच्या सर्वोच्च टोकावरील बालेकिल्ला पाहून घ्यावा. बालेकिल्ल्यावर वास्तूंचे अवशेष आणि ध्वजस्तंभ आहे. गडमाथ्यावरून महाबळेश्वरची डोंगररांग, हातलोट घाट, चकदेव, जगबुडी नदीचे खोरे तसेच मधुमकरंदगड, वासोटा, महिपतगड, रसाळगड असा आसपासचा संपूर्ण प्रदेश दिसतो. गडाचा विस्तार कमी असल्याने आपली गडफेरी लवकर पूर्ण होते. येथूनच रसाळगडावर जाण्यासाठी रस्ता आहे. स्थानिक व्यक्तीच्या साथीने गिर्यारोहक महिपत, सुमार आणि रसाळ हे दुर्गत्रयी एकत्रित सर करण्याची दोन ते तीन दिवसांची मोहीम आखतात. गडावरील वास्तूंचे अवशेष, पाण्याचे टाके प्राचीन काळापासून असलेले किल्ल्याचे अस्तित्व दर्शवितात. महिपतगडासोबतच सुमार आणि रसाळ हे देखील स्वराज्यात सामील झाले. सातारच्या शाहू महाराजांच्या काळात केलेल्या गडकिल्ल्याच्या यादीत सुमेरुगड असा सुमारगडाचा उल्लेख केला आहे. पेशव्यांनी या किल्ल्याच्या दुर्गमतेमुळे कैदखाना म्हणून याचा वापर केला. ब्रिटिशकाळापर्यंत गडावर १४ ते १५ तोफा असल्याची नोंद आढळते; मात्र आता एकही तोफ दिसत नाही. रसाळगड त्रिकोणी आकाराचा रसाळगड १८०० फूट उंच आहे. गडावर जाण्यासाठी खेडवरून वाडी पेठ आणि पुढे रसाळवाडीला पोहोचावे. गावातून किल्ल्याच्या दिशेने जाताना वाटेत एक शिवलिंग आहे. पहिल्या दरवाज्याच्या बाजूला पाण्याची तीन टाकी आहेत. दरवाज्यातून आत गेल्यावर तटावरील मारुतीरायाचे दर्शन घ्यावे. पुढे गडाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दरवाज्यातून आपला गडप्रवेश होतो. किल्ल्याच्या तटावर एक तोफ ठेवलेली आहे. पुढे गेल्यावर अजून एक भली मोठी तोफ लक्ष वेधून घेते. रसाळगडावर लहान मोठ्या मिळून एकूण १६ तोफा आहेत. किल्ल्यावरील वास्तू मात्र सुस्थितीत नाही. गडावर श्री वाघजाई, भैरी आणि झोलाई देवीचे मंदिर आहे. मंदिराच्या समोर दीपमाळ आणि वृंदावन आहे, मंदिरात अनेक पुरातन मूर्ती ठेवलेल्या आहेत. विशेष म्हणजे मंदिराच्या ओट्यावर सहा तोफा एका रांगेत ठेवलेल्या दिसतात. जवळच देव टाके आहे. त्याच्या बाजूला गणपती मंदिर आहे. गडाच्या बालेकिल्ल्यावर चार बुरूज बांधले असून त्यावर तोफा ठेवलेल्या आहेत. बालेकिल्यात तुळशी वृंदावन, चुन्याचा घाणा तसेच वाड्याचे अवशेष दिसतात. पश्चिमेला चोर दरवाजा आहे. येथून रसाळगडाचे दक्षिण टोक आणि निशाण बुरूज दिसतो. किल्ल्यावर तलाव आणि पाण्याची टाकी आहेत तसेच एक धान्यकोठार आहे, ज्याच्या दरवाज्यावर श्री गणपती आणि उंबरठ्यावर कीर्तिमुख आहे. तटबंदीच्या खाली श्री काळकाई देवीचे मंदिर आहे. मंदिरात देवीची मूर्ती आणि शिवलिंग आहे. मंदिराच्या बाहेर नंदी आणि गजलक्ष्मीची मूर्ती आहे. गडावरील समाध्या, टाकी, तलाव, खांब टाके, भुयारी टाके, वास्तूंचे अवशेष इतिहास जिवंत करतात. घनदाट जंगलात बांधलेले स्वराज्याचे पहारेकरी महिपत, सुमार, रसाळ या दुर्गत्रयीचे एकत्रित दर्शन घेणे, ही गिर्यारोहकांची आवडती मोहीम आहे.

---

पान २ वरून

## आम्ही आहोत!

त्या गावातील कोचिंग क्लासवाले काही मंडळी ओळखीचे असल्याने तिच्या मुलांना त्यामध्ये विनामूल्य प्रवेश मिळवून देण्यात आले. एका मोठ्या औषधी कंपनीत एरिया मॅनेजर असलेल्या आमच्या एका मित्राने तिच्या नवऱ्यासाठी होलसेल रेटमध्ये औषधी मिळवून देण्याची तसेच औषधांची सॅम्पल्स विनामूल्य मिळण्याची व्यवस्था लावून दिली. आमच्या समूहातील प्रत्येकाने संपूर्ण मदत केली. आम्हाला तिच्याकरिता ही मदत करण्याची मनापासून इच्छा यासाठी झाली की, आमच्यापैकी प्रत्येकाशी ती मैत्रीच्या सुंदर भावनेने जोडली गेली होती. ते तिचे वैशिष्ट्य होते. प्रत्येकाशी संवाद ठेवून तिने नाते जपले होते. ही सारी मदत कार्यान्वित करून आम्ही सारे निघालो तेव्हा आम्हा सर्वांचे हात धरून अनेक दिवसांनंतर ती पहिल्यांदा हसली. आमच्यापैकी कुणीही काहीही बोलू शकत नव्हता. कुणाच्याही आयुष्याची यशस्विता किती संपत्ती मिळविली, किती प्रसिद्धी लाभली, किती मानमरातब मिळाले यापेक्षा आपल्याला खांद्यावर विश्वासाने हात ठेवून मी आहे हे सांगणारे लोक आपल्यासोबत किती आहेत, यावर जास्त अवलंबून असते. असे किती लोक आपल्या आयुष्यात आपल्याला जोडता आले आणि अशा किती लोकांच्या आयुष्यात आपणदेखील मी आहे असे म्हणतो आहे, यावरच खरे माणूसपण ठरते. आम्ही सारे मिळून तिचे हात हातात धरून तिला केवळ एकच सांगत होतो, आम्ही आहोत...!

पान २ वरून

## चूडाकर्म आणि विद्यारंभ

नष्ट झाली. तर, चौल किंवा चूडाकर्म हा बाळ चालू लागल्यानंतरचा संस्कार पार पडल्यानंतर बाळाला खऱ्या अर्थानं संस्कारित करण्याची प्रक्रिया सुरू होते. बाळ किंवा बाळीचं वय तीन वर्षं झालं की त्यानंतर लगेचच येणाऱ्या विजया दशमीच्या दिवशी करायचा संस्कार असतो विद्यारंभ! आश्विन शुद्ध सप्तमीला पाटी, पुस्तक, लेखणी, शाईची दौत इत्यादी विद्याभ्यासाच्या साधनांच्या माध्यमातून देवी सरस्वतीचं आवाहन करतात. अष्टमीच्या दिवशी सरस्वती पूजन करण्यात येतं. नवमीला विसर्जन करतात. दसऱ्याच्या दिवशी बाळाची आई ति/त्याला मांडीवर बसवते आणि धूळपाटीवर किंवा साध्या पाटीवर श्री गणेशाय नमः गिरवून घेते. आईचं बोट धरून ते अबोध बालक अज्ञानाच्या सीमा ओलांडून ज्ञानाच्या जगतात प्रवेश करतं.

पान ५ वरून

## त्या मुलांच्या 'गंधकोषी'

आज मुलांना खेळण्यासाठी घरामध्ये भावंडं नाहीत, आजीआजोबा नाहीत. अशा वेळी आई वडिलांनी मुलांसाठी वेळ काढणे आणि त्यांना समजून घेणे, प्रसंगी त्यांच्यामध्ये खेळणे आवश्यक आहे. वर्षातून केवळ एक दिवस बालदिन साजरा करून भागणार नाही. मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य, त्यांच्या जीवनातील आनंद कायमराहायला हवा. त्या कळ्या आपल्या पूर्ण शक्तीनिशी उमलायला हव्या. त्या फुलांच्या गंधकोषी असे एक सुंदर गाणे आहे. त्यात कवीला फुलांच्या गंधकोषात परमेश्वराचाच वास आहे असे सुचवायचे आहे. त्यात एका अक्षराचा बदल करून त्या मुलांच्या गंधकोषी असे म्हणता येईल. त्यातही त्या परमेश्वराचा वास आहे. फक्त ही फुले आम्हाला नीट फुलवता आली पाहिजेत. म्हणजे त्यांचा सुगंध दूरवर पोहोचू शकेल.

पान ५ वरून

## बाबा

''मधुराला बरं वाटावं म्हणून शेवटचं वाक्य बाबांनी आपल्या मनाने जोडलं. लग्न लागलं. मधुराने बाबाच्या चेहऱ्याकडे पाहिलं. त्यांनी कोणता मुखवटा धारण केला होता कोणास ठाऊक?. पण त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. मधुरा सासरी रुळली. तिचा नवरा मंगेश प्रेमळ स्वभावाचा होता. मंगेशचे आई-वडील चंद्रपूरला त्याच्या भावाकडे राहत होते. लग्न झाल्यावर मधुराची सासू तिच्याजवळ महिनाभर राहिली. त्यानंतर दोन-चार वेळा येऊन गेली. बाबांना इकडे आणण्याविषयी ते काय म्हणतील, याची मधुराला खूप भीती वाटत होती. नाही म्हणाले तर काय करायचे? हा मोठा प्रश्न तिच्या समोर उभा होता. एक दिवस मंगेशने आपल्या आई-वडिलांकडे मधुराच्या वडिलांना आपल्याकडे आणण्याचा विषय काढला आणि त्यांनीही त्याला आपली सहमती दर्शवली. ते म्हणाले, ''अरे त्यात विचारण्यासारखं काय आहे? त्यांचं तुमच्या घराकडे लक्ष राहील आणि आमचं आश्विनच्या घराकडे...'' हे ऐकून मधुराला खूप आनंद झाला. लगेच दुसऱ्या दिवशी मधुरा आपल्या बाबाकडे गेली; आणि म्हणाली, ''बाबा, आता सहा महिने होत आले आहेत. तुम्हाला आता आमच्याकडे यायचं आहे.'' त्यावर तिचे बाबा म्हणाले, ''मधुरा बेटी, इथे मी अगदी मजेत आहे. इथे तुझ्या आईच्या आठवणी आहेत आणि म्हणून नाही सोडून जावं असं वाटत गं हे घर.'' ''बाबा! आईवर तुमचं किती प्रेम होतं. ते मला माहीत आहे. त्या आधारावर तर आईशिवाय आजपर्यंतचा प्रवास सुखकर झाला. आई गेल्यानंतर संपूर्ण घर सांभाळलं तुम्ही. पण दुसरं लग्न नाही केलं, पण आता मी तुम्हाला एकटं नाही राहू देणार. त्यासाठीच तर मी लग्न करायला नको म्हणत होते, पण तुम्ही माझ्याकडे येऊन राहील, असं प्रॉमिस केलं होते मला.'' ''ठीक आहे. बाबा आपल्याकडेच येऊन राहणार, या विचाराने मधुरा हरखून गेली होती. शनिवारी बाबांचा फोन आला... ''उद्या रविवार आहे. तू आणि मंगेश घरीच आहात ना की कुठे बाहेर जाणार आहात? उद्या येतो आहे मी तुमच्याकडे. स्वागताला तयार राहा.'' रविवारी सकाळी मधुराने बाबांची खोली नीटनेटकी करून घेतली. बेड व्यवस्थित केला. बाबांच्या डोळ्यासमोर राहील अशा बेताने आईचा एक फोटो लावला. बाबांना टीव्ही बघायला आवडते म्हणून एक टीव्ही खरेदी केला. बाबा आल्यावर किती छान दिवस जातील या स्वप्नात मधुरा रंगून गेली. दुपारचे १२ वाजले होते. मधुराचा फोन खणखणला. तिने फोन उचलला. ''हॅलोऽऽ'' ''मधुरा, मी अनंत कोहळे बोलतो आहे.'' ''हाँऽऽ! बोला काका...'' ''अगं, श्री साईनाथ मल्टिपेशालिटी हॉस्पिटलमध्ये ये.'' ''का बरं...? काय झालं काका? सर्व ठीक आहे ना?'' मधुरा थरथरत्या आवाजात म्हणाली. मधुराला कोहळे काकांचं म्हणणं पटलं नव्हतं. काहीतरी अनपेक्षित घडलेलं आहे, असं तिला वाटलं आणि तिचे डोळे भरून आले. ती मंगेशच्या गळ्यात पडून रडू लागली.

मधुराला जसं वाटलं तसंच होतं. बाबांना अटॅक आला होता. व्हेंटिलेटर लावलं होतं. मधुरा पोचली, तसं त्यांनी हसून तिच्याकडे पाहिलं. श्वास रोखून मधुराचा हात हातात घेत म्हणाले, ''बाळा माफ कर मला, मी तुझ्याकडे येऊन राहावं अशी तुझी फार इच्छा होती. पण तुझी एवढी इच्छा मात्र मी नाही करू पूर्ण शकलो.'' थोड्या शीन आवाजात बाबा म्हणाले. ''बाबा तुम्ही काळजी करू नका. आम्ही हवं ते करू. पण तुम्ही धीर सोडू नका. बरे व्हाल तुम्ही. माझ्या घरी याल; आणि पुन्हा मला आशीर्वाद द्याल.'' बाबांनी कष्टाने हात उचलला. मधुराच्या डोक्यावर ठेवला. म्हणाले, ''मधुरा, तुझ्या आईचा आशीर्वाद पाठीशी होता म्हणून आजवर सगळं व्यवस्थितपणे पार पडलं.'' ''लहानपणी सोडून गेली, पण तुमची तरी सोबत असू द्या ना मला. धीर धरा. बरे व्हाल तुम्ही.'' आपण हॉस्पिटलमध्ये आहोत. ओठातला हुंदका बाहेर पडता कामा नये. याचं मधुराला भान होतं. ''बाळाश तुझी आई मला धीर धरायला सांगते आहे. पण माझा काळ मला खुणावतो आहे. तेव्हा तुम्ही दोघेही सुखी राहा.'' बाबा मंगेशकडे पाहत म्हणाले. मंगेश बाबांच्या जवळ सरकला. बाबांनी मधुराच्या डोक्यावरचा हात काढला. मंगेशचा हात हातात घेतला आणि म्हणाले, ''माझा श्वास तुमच्या मुठीत आहे, सांभाळा तिला...'' मंगेशने बाबांचा हात हळुवार दाबला. डोळ्यांनी होकार दर्शविला... आणि बाबांनी डोळे मिटले. त्यांची प्राणज्योत मालवली. बाबा गेले या धक्क्यातून मधुरा कितीतरी दिवस सावरली नाही. आई गेली, तेव्हा मधुराच्या आयुष्यातला गोडवा हरवला होता आणि बाबा गेले तेव्हा तिचं आयुष्य आळणीला आलं होतं. आता दोघांच्या आठवणींशिवाय तिच्या हातात काही उरलं नव्हतं.

पान ५ वरून


## अभिजात मराठी संदर्भ आणि भूमिका

आपले बहुतांश व्यवहार मराठीमधून कसे होतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे शिक्षण प्रणालीमध्ये सुद्धा मराठीचा वापर जास्तीत जास्त होईल याचा सुद्धा विचार करणे गरजेचे आहे. आज गणित शिकवायला बीएससी झालेला शिक्षक लागतो तसे मराठी मराठी शिकवण्यासाठी प्राथमिक शाळापासूनच मराठीतील पदवीधर शिक्षक असला पाहिज ह्याचा विचार केला पाहिजे. मराठी साहित्यातून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या शिक्षकापेक्षा आज ग्रॅज्युएट झालेल्या विज्ञान किंवा गणित शिक्षकाची किंमत आज आपल्या शिक्षण प्रणालीला महत्त्वाची ठरत आहे.आणि म्हणूनच इयत्ता ६ वी ८ वीसाठी गणित विज्ञानसाठी इ. bsc bed झालेला शिक्षक पाहिजे. मात्र भाषा विषयासाठी मराठी साहित्यातील पदवीधर शिक्षक आपल्या शिक्षण प्रणालीला आवश्यक वाटत नाही. माध्यमिक शिक्षण प्रणालीमध्ये सुद्धा विज्ञान पदवी असलेला शिक्षक हा मुख्याध्यापक या पदावर बसण्यासाठी सक्षम समजून मराठी पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षकाला या पदासाठी विचारणा जात नाही. हे अनेक मराठीचे शिक्षकही कबूल करतील. मराठी भाषेचा अभ्यास ठरवत असताना अनेक विद्यापीठातील निवड समित्या आपल्यासाठी कोण जवळचा आणि कोण सोयीचा? याचा विचार करूनच अभ्यासक्रम ठरवत असल्याचे चित्र अनेकदा दिसते. अशाने दर्जेदार साहित्य अभ्यासक्रमात कसे येईल? याचा विचार करायला कुणाला वेळ नाही. या सर्व विचारात बदल झाला पाहिजे, त्याचवेळी मोठ्या संघर्षातून मिळालेला हा अभिजात दर्जा आपण सन्मानाने सांगू शकू अभिमानाने मिरवू शकू असे मला वाटते.

प्रासंगिक

उर्मिला राजोपाध्ये

# गाडगेबाबांचे स्मरण करताना...



**२३ फेब्रुवारी रोजी असणाऱ्या संत गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्त स्मरण करताना संत गाडगेबाबा यांच्या विचारांची उजळणी करणे गरजेचे ठरते. त्यांनी आयुष्यभर समाजातील अंधश्रद्धा, जातिपाती, अस्पृश्यता आणि कुपोषणाच्या विरोधात काम केले. त्यांच्या शिकवणीमुळे लाखो लोक जागरूक झाले. गाडगेबाबांनी समाजाला स्वच्छता पाळण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश दिला. त्यांचे समाजसुधारणेचे कार्य आजही महत्त्व राखून आहे.**

भारत हा अनेक मान्यता मानणारा आणि जपणारा देश होता आणि आहे. इथे अनेक धर्म, पंथ असून जनमानसावर त्याचा प्रचंड पगडा आहे. कोणताही धर्म माणसाला वाममार्गाला नेत नाही, तशी शिकवण देत नाही. मात्र पाखंडी वा सामान्यांना कर्मकांडां ध्ये गुंतवणारे, त्यांचा विविध मार्गाने गैरफायदा घेणारे तथाकथित साधू, बाबा, गुरू समाजाला भटकवतात. अशांच्या नादी लागणारा समाज नेहमीच आधुनिक दृष्टिकोन, ज्ञान- विज्ञानाच्या वाटा, विद्याभ्यास यापासून कित्येक योजने लांब राहतो.

बुवाबाजीमध्ये गुरफटलेला आणि घाबरलेला समाज दांभिकांच्या नादी लागून आणखी अधोगतीला लागतो. म्हणूनच त्याला जागेवर आणणाऱ्या, शहाणपणाच्या चार गोष्टी सांगणाऱ्या, सामान्यांना समजणाऱ्या भाषेत बोलून उपदेश करणाऱ्या लोकांची समाजाला नेहमीच गरज असते. आपल्याकडील संतांनी नेहमीच हे काम केले आहे. गाडगे महाराज हे याच पंक्तीतील एक मोठे नाव. संत गाडगेबाबांनी आयुष्यभर जनांना चुकीच्या म र्गापासून दूर करण्याचे काम केले. म्हणूनच जयंती साजरी करताना त्यांच्या बहु ेल शिकवणीचे आणि कामाचे अवलोकन करायला हवे. संत गाडगेबाबा यांचे कार्य समाज सुधारणा, शिक्षण आणि आ-चारधर्म यामध्ये फार मोठे होते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी सर्वसमावेशक आणि समतेच्या आधारे समाजातील चुकीच्या परंपरांचा आणि अंधश्रद्धांचा सातत्याने विरोध केला. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने समाजाला एक नवी दिशा दिली. म्हणूनच गाडगेबाबांचे जीवन आणि कार्य आजही प्रगल्भतेची प्रेरणा देणारे आहे, असे म्हणावे लागेल.

गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेडगाव येथे झाला. गाडगेबाबांचे खरं नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. पण ते गाडगेबाबा म्हणूनच ओळखले जायचे. अतिशय साधे जीवन जगणाऱ्या गाडगेबाबांना आधीपासूनच दीन- दुबळ्यांची, अनाथांची आणि गरिबांची काळजी घेणे आवडत असे. संत गाडगेबाबा यांनी समजातील अंधश्रद्धा, जातिपाती, अस्पृश्यता आणि कुपोषणाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर काम केले. त्यांच्या शिकवणीमुळे लाखो लोक जागरूक झाले आणि त्यांनी जीवनातील चुकीच्या परंपरा सोडून दिल्या. गाडगेबाबांनी समाजाला स्वच्छता पाळण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश दिला. त्यांनी स्वत: इतरांच्या भल्यासाठी काम केले आणि तेच करण्याचा सल्ला इतरांनाही दिला. त्यांचे समाजसुधारक कार्य प्रामुख्याने काही प्रमुख बाबींवर आधारित होते. त्यांनी नेहमीच मानवतेचे आणि शुद्धतेचे, स्वच्छतेचे महत्त्व मांडले. समाजासमोरील अनेक समस्या आणि अडचणींचे निराकरण करण्याची क्षमता आणि इच्छा असल्यामुळेच त्यांना सर्वसामान्य जनतेमध्ये मोठा आदर प्राप्त झाला होता. आजही त्यांच्या नावाचा उल्लेख करताना या बहु ेल कामाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते. आपल्या जीवित कार्यामध्ये त्यांनी केलेल्या अंधश्रद्धेविरुद्ध संघर्षाचे महत्त्व वादातीत आहे. गाडगेबाबांनी अंधश्रद्धा आणि धार्मिक पाखंडाचा तीव्र विरोध केला. पाखंडी लोकांवर कठोर प्रहार केले. त्यांचे पितळ उघडे पाडले. अशा प्रथांचा विरोध करणे हेच गाडगेबाबा यांचे ध्येय होते. लोकां ध्ये अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्या वृत्ती आणि प्रवृत्तींवर त्यांनी कठोर टीका केली. सर्वसामान्यांना त्याप्रती सजग केले. ते आपल्या प्रवचनां ध्ये योग्य विचारांवर जोर देत असत. समाजसुधारणे धील त्यांचे हे योगदान फार मोठे होते. ते एक सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत होते. जातिपातीचे वर्चस्व आणि समाजात अस्पृश्यता टिकवून ठेवण्याच्या परंपरेला त्यांचा तीव्र विरोध होता. ते सर्वधर्मसमभावावर विश्वास ठेवणारे संतपुरुष होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्वही ने के ओळखले होते. म्हणूनच त्यांनी सर्वांना शिक्षण देण्याचा विचार मांडला आणि त्या दृष्टीने कार्यही केले. शाळांमध्ये आणि आश्रमांमध्ये शिक्षणाची महती वाढविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी केलेले प्रयत्न आपण जाणतो. गाडगेबाबांनी स्वच्छतेला अत्यंत महत्त्व दिले. त्यांनी आपल्या उपदेशात त्यावर विशेष प्रकाश टाकलेला दिसतो. त्यांच्या मते, स्वच्छता हा व्यक्तीच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. स्वच्छतेची आवश्यकता केवळ शारीरिक आरोग्याकरिता नव्हे तर मानसिक आणि आत्मिक शुद्धतेसाठीही असते, असे ते सांगायचे. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितलेच; पण त्या आधी स्वत: झाडू हाती घेत आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात पुढाकारही घेतला. लोकांसमोर बोलायला उभे राहण्यापूर्वी आधी ते स्वत:च्या हाताने सगळा परिसर स्वच्छ करत असत. या कृतीतूनही स्वच्छतेच्या बाबतीत लोकांना जागरूक करण्याचे मोठे काम त्यांच्या हातून घडले. खेरीज गाडगेबाबांनी धर्माची खरी भावना लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी धर्माच्या नावावर होणाऱ्या अन्यायाचा तीव्र विरोध केला. त्यांच्या उपदेशात प्रत्येक व्यक्तीला न्याय देण्याचे आणि शुद्धतेच्या पथावर चालण्याचे निर्देश दिले. संत गाडगेबाबांचा विचार आणि कार्य आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे ठरते. आजही समाजाला जातिपाती, अंधश्रद्धा, महिलांची दुर्दशा, अन्याय आदी समस्या भेडसावताना दिसतात. आजही लोक अंधश्रद्धेच्या आहारी जात अघोरी कृत्ये करताना दिसतात. अशांना शहाणे करण्यासाठी गाडगेबाबांच्या विचारांची साथ घेणे गरजेचे ठरते. अशांना बाबांची शिकवण उत्तम मार्गदर्शन करणारी आहे. त्याचबरोबर आजच्या छानछौकीच्या काळात त्यांच्या जीवनातील साधेपण आणि त्यांच्या कार्याची गोडीदेखील आत्मसात करावी अशीच आहे. आज त्यांच्या शिकवणीच्या प्रभावाने अनेक संस्था, समाजसेवी संघटना कार्यरत असून मोलाचे काम करत आहेत. अशा प्रकारे गाडगेबाबांच्या कार्यामुळे समाजसुधारणा घडवून आणण्यात मदत झाली आहे आणि त्यांचे कार्य अजूनही समाजात परिवर्तन घडवण्याचे प्रेरणा देत आहे.

इथे लक्षात घ्यायला हवे की, गाडगेबाबा यांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते, तर संपूर्ण भारतभर सुधारणा घडविण्याचे उद्दिष्ट ठेवून केलेले होते. खरे पाहता गरीब कुटुंबात जन्मलेल्या या व्यक्तीने लहानपणीच अनेक प्रकारचे दु:ख पचवले होते. त्यांना विपरीत परिस्थितीचा सामना करावा लागला होता. मात्र त्यापुढे हात न टेकता गाडगेबाबांनी वैयक्तिक आयुष्यातील समस्यांच्या बरोबरीने समाजाच्या समस्यांचाही खंबीरपणे सामना केला. ते कधीही मोह, माया किंवा ऐश्वर्याच्या मागे धावले नाहीत. आजच्या पिढीने या गुणांचेही महत्त्व जाणून घ्यायला हवे. त्या काळात अनेक धार्मिक, सामाजिक आणि पारंपरिक रूढींचे वर्चस्व होते. या चुकीच्या गोष्टींना समाजमान्यता होती. त्याची भीती होती, दडपण होते. मात्र यात अडकलेल्यांना बाहेर काढत त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम संत गाडगेबाबांनी केले. प्रत्येक व्यक्तीला न्याय आणि संधी मिळायला हवी, असे म्हणत त्यांनी आपले काळापुढे नेणारे विचार खंबीरपणे मांडण्याचे काम आयुष्यभर केले. अंधश्रद्धेबरोबरच त्यांनी असत्य परंपरांवरही प्रहार केला. त्याग, तप, योग इत्यादी गोष्टींवर अधिक लक्ष दिले.

थोडक्यात, त्यांनी आपल्या आचारधर्माची कल्पना दाखवून दिली. एक साधे जीवन जगण्यामध्येच खरी समृद्धी असल्याचे सोदाहरण स्पष्ट केले. ते लोकांना भेटत असत. उपदेश करत गावोगाव फिरत असत. आजही गाडगेबाबा संप्रदाय या माध्यमातून त्यांनी दिलेला उपदेश आणि केलेली लोकसेवा स्मरताना आणि त्याचा अनुनय करताना दिसतो. गाडगेबाबांचे कार्य आणि विचार नेहमीच प्रेरणादायक राहतील. त्यांनी जीवनातील अडचणींचा सामना करत एक साधेपणाचे आणि समाजसुधारक व्यक्तिमत्त्व निर्माण केले. ते विचार आणि कार्य काळाच्या पुढे ठेवणारे संत होते. आजही गाडगेबाबांच्या जीवन आणि कार्याचा प्रभाव समाजावर आहे आणि तो तसाच राहील याची खात्री आहे.

मुक्तचित्र

डॉ. संतोष पाठारे

## स्वीकाराच्या वाटेवर...

(२२ व्या आशियाई चित्रपट महोत्सवात पुरस्कार मिळालेल्या चित्रपटांचा आस्वादक आढावा)




प्रेम ही एक उदात्त भावना आहे. दोन व्यक्ती जेव्हा प्रेमभावनेतून जवळ येतात त्यावेळी त्यांच्यामध्ये भावनिक आणि शारीरिक बंध तयार होतो. या दोन व्यक्ती भिन्नलिंगी असतील तर त्यांच्यातील संबंधाना समाजमान्यता मिळते. समलिंगी व्यक्तींमधील प्रेमाला पूर्णपणे स्वीकारण्याइतका आपला समाज मात्र अजूनही पूर्णपणे प्रगल्भ झालेला नाही. त्यामुळेच अशा प्रकारचा लैंगिक कल असणाऱ्या व्यक्तींची म नसिक घुसमट होत असते आणि जगासमोर हे संबंध उघड झाले तर त्या संपूर्ण कुटुंबाचीदेखील ससेहोलपट होते.

आज अनेक पालक आपल्या समलिंगी मुलांना स्वीकारतात, त्यांची मानसिकता समजून घेतात, त्याचवेळी काही पालकांना आपल्या मुलाचा हा लैंगिक कल स्वीकारणं कठीण जातं. आशियाई महोत्सवात मराठी स्पर्धा विभागात सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार मिळवणारा 'साबर बोंड' आणि भारतीय चित्रपट स्पर्धा विभागात सर्वोत्तम ठरलेल्या 'बलाड टू द विंड' या आसामी चित्रपटातून समलिंगी संबंध ठेवणारे तरुण, त्यांचे पालक आणि त्यांच्या सभोवतालचा समाज यांचं अतिशय संवेदनशील चित्रण पाहायला मिळालं. भारतीय चित्रपटकर्ते आता समलिंगी संबंधासारख्या उपेक्षित पण महत्त्वाच्या विषयावर चित्रपट निर्माण करू लागले आहेत. अशा नाजूक विषयावर चित्रपट बनवताना त्यात भडक चित्रण न करता आपलं म्हणणं प्रभावीपणे मांडण्याच्या दिग्दर्शकांच्या कौशल्यामुळे हे दोन्ही चित्रपट प्रेक्षक आणि परीक्षक यांच्या पसंतीस उतरत आहेत. या निमित्ताने या विषयावर कलावंत आणि प्रेक्षक यांच्यात मोकळा संवाद होऊन समाजमनात खोलवर रुतलेले अनेक गैरसमज दूर होण्यासही मदत होते आहे. 'साबर बोंड' म्हणजे निवडुंगाच्या झाडावर येणार लालचुटुक फळ. हे फळ वरून काटेरी असलं, तरीही त्यातील लालसर गर चवदार असतो. 'साबर बोंड'चा प्रतीकात्मक वापर करत दिग्दर्शक रोहन कनावडे याने त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील काही घटनांचे संदर्भ घेऊन चित्रपटाचे कथानक रचले आहे. कथानायक आनंदा त्याच्या वडिलांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी आईसोबत वडिलांच्या गावी येतो. तेरा दिवसाचा सुतकाचा काळ त्याच्या संयमाची परीक्षा घेणारा असतो. आनंदाने वर्षभरात लग्न उरकून घ्यावे यासाठी त्याचे सगेसोयरे आग्रह धरतात. आनंदा समलैंगिक आहे हे त्याच्या आईला ठाऊक असते. त्यामुळे ती याबाबतीत मौन धरते. याच काळात आनंदाचा बालपणीचा मित्र बाळ्या त्याच्या सोबतीस येतो. आनंदा बाळ्याबरोबर माळरानावर गुरं चरण्यास जाऊ लागतो. त्या दोघांमध्ये प्रेमाची भावना फुलू लागते. दोघं एकम `कांमध्ये भावनिक आणि शारीरिकरीत्या गुंततात. समलैंगिक संबंधाचे चित्रण करणाऱ्या भारतीय आणि परदेशी चित्रपटांकडे दृष्टिक्षेप टाकला तर असं लक्षात येतं की, त्यातील बहुतांश चित्रपट या नात्यातील विफलता अधोरेखित करतात आणि नकारात्मक नोटवर संपतात.

'साबर बोंड'चं वैशिष्ट्य म्हणजे हा चित्रपट दोन पुरुषामधील नातेसंबंधांना मिळालेल्या एका सकारात्मक वळणाचे चित्रण करतो. ग्रामीण पृष्ठभूमीवर ही प्रेमकथा आकाराला येते, परंतु त्यात अवतीभवतीच्या समाजाच्या हस्तक्षेपाचे बटबटीत चित्रण नाही.

नायकांमधील लैंगिक दृश्ये दिग्दर्शकाने संयमितरीत्या हाताळली आहेत. मुलाच्या भावना समजून घेणारी, त्याला मानसिक आधार देणारी आई या प्रेमकथेत महत्वाचा भाग बनते. गावातील रितीभाती आणि परंपरा यांची जाण असलेली, सगेसोयऱ्यांची मानसिकता ओळखून असणारी ही आई खऱ्या अर्थाने पुरोगामी विचारांची ठरते. रोहन कनावडेने लिहिलेल्या पटकथेला पडद्यावर आकार देण्यामध्ये विकास उर्स या प्रकाशचित्रणकाराचे योगदान महत्त्वाचे आहे. प्रत्येक प्रसंगाची त्यांनी केलेली मांडणी आणि प्रकाशयोजना लक्षणीय आहे. हे प्रसंग अधिक प्रभावी करण्याचे काम अनिर्बन बोरठाकूर यांनी ध्वनी संयोजनातून प्रभावीरीत्या साधले आहे. सुतकाच्या काळात करण्यात येणारे विधी, कुटुंबात होणाऱ्या चर्चा, गावकीत चालणाऱ्या गजाली याचं तपशीलवार आणि अस्सल चित्रण 'साबर बोंड'मध्ये पाहायला मिळते. शहरातून आलेला, गावच्या वातावरणाशी समरस होऊ न शकलेला आनंदा आणि आयुष्यभर गावात वडिलांच्या धाकात वाढलेला बाळा यांच्या स्वभावातील कंगोरे भूषण मनोज आणि सुराज सुमन या दोन अभिनेत्यांनी त्यांच्या नैसर्गिक अभिनयातून दाखवले आहेत. जयश्री जगतापने आईची भूमिका करताना सांभाळलेलं बेअरिंग दाद देण्याजोगं आहे. 'साबर बोंड'मधील प्रेमकथा वैयक्तिक पातळीवर सुरू राहते, मात्र संजीब सभापंडित दिग्दर्शित 'बलाड टू द विंड' मधील नायकांना त्यांच्या कुटुंबाच्या बरोबरीने समाजाच्या रोषाला सामोर जावं लागतं.

आसाममध्ये नदी किनाऱ्यावर वसलेल्या एका संपन्न गावात 'बलाड टू द विंड'चे कथानक घडते. काकांच्या मृत्यूनंतर जयंता त्याच्या आईबाबांना भेटायला येतो. त्यावेळी त्याच्यासोबत त्याचा मित्र असतो. जयंताचे बाबा आसाममधील लुप्त होत चाललेल्या ब्रजवाली भाषेच्या संवर्धनाचे काम करीत असतात. गावातील विद्वान म्हणून त्यांना मानाचे स्थान असते. जयंता त्याच्या मि त्रासोबत गावात हिंडतो, नदीकाठी रम तो. जयंताच्या लग्नाची बोलणी घरात सुरू होतात तेव्हा त्याचा मित्र अस्वस्थ होतो. जयंताच्या आईबाबांच्या आणि नंतर गावकऱ्यांच्या त्यांच्यातील निव्वळ मैत्रीपलीकडे असलेले संबंध लक्षात येतात. जयंताची आई या धक्क्याने हादरून जाते.

गावकऱ्यांमध्ये कुजबूज वाढते. जयंता सुरुवातीस याकडे दुर्लक्ष करतो, पण आईच्या बरोबरीने जेव्हा वडिलांची अस्वस्थता वाढते तेव्हा त्याला एका निर्णयापर्यंत येणं भाग पडतं. राज्यातील लोप पावत असलेल्या एका आदिम भाषेला आणि पर्यायाने संस्कृतीला जतन करू पाहणाऱ्या जयंताच्या वडिलांसाठी त्याच्या लैंगिक कलाचा स्वीकार करणे हा कसोटीचा क्षण असतो. 'साबर बोंड' आणि 'बलाड टू द विंड' हे दोन्ही चित्रपट भारतातील वेगवेगळ्या प्रदेशात साधारण एकाच कालखंडात निर्माण झालेले आहेत आणि त्यात काही घटनांच्या संदर्भात साम्यदेखील आहे. दोन्ही चित्रपटांच्या दिग्दर्शकांचा मुख्य पात्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभावाचा आहे. 'साबर बोंड' मध्ये आनंदा आणि बाळ्यामध्ये निर्माण होणारं प्रेम केंद्रस्थानी आहे तर 'बलाड टू द विंड'मध्ये कुटुंब आणि समाज या घटकांचा सम लैंगिक संबंधाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक टोकदारपणे चित्रित केला आहे. 'साबर बोंड'म धील मुलाच्या लैंगिकतेचा स्वीकार करणारी आई आणि 'बलाड टू द विंड'मधील मुलाबद्दल सत्य समजल्यानंतर त्रागा करून घेणारी आई या दोन्ही व्यक्तिरेखा आपल्या समाजातील दोन टोकाच्या मानसिकतेचं प्रतिनिधित्व करतात.

आपली संस्कृती जशी सर्वसमावेशक होती तसंच पुढच्या पिढीला, त्यांच्या जीवनशैलीला आपण समजून आणि सामावून घ्यायला हवं अशा निष्कर्षापर्यंत येणारे जयंताचे बाबा येतात. आपल्या मनातील किंतु दूर सारून समलैंगिक व्यक्तींचा स्वीकार करण्याचा मार्ग हे दोन चित्रपट संवेदनशीलपणे दाखवतात, हेच या चित्रपटांचे यश आहे. (लेखक प्रसिद्ध चित्रपट समीक्षक आहेत.)

पान १ वरून

## स्थैर्य आणि संतुलनाची दुहेरी परीक्षा

बांगलादेशची संसदीय व्यवस्था एकसदनी असून, तिला राष्ट्रीय संसद म्हणतात. संसदेत एकूण ३५० सदस्य असतात, त्यापैकी ३०० थेट निवडणुकीद्वारे निवडले जातात, तर उर्वरित ५० जागा महिलांसाठी राखीव आहेत. बांगलादेशचा मुख्य विरोधी पक्ष 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी' अर्थात 'बीएनपी' या निवडणुकीत, सर्वात मजबूत शक्ती म्हणून उदयास आला आहे. पक्षाचे कार्यवाहक अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान, १७ वर्षांच्या निर्वासनानंतर ते बांगलादेशचे पंतप्रधान होणार आहेत. 'बीएनपी'ने ३०० सदस्यीय संसदेत, तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील २०९ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. तसेच कट्टरपंथी 'जमात-ए-इस्लामी' आणि त्यांच्या ११ मित्रपक्षांना केवळ ७६ जागाच मिळाल्या आहेत. त्यासोबतच माजी राष्ट्रपती शेख हसीना यांची 'अवामी लीग' या निवडणूक प्रक्रियेतून पूर्णपणे बाहेर राहिली. 'क्राऊन प्रिन्स' तारिक रहमान यांनी स्वतःला उदारमतवादी-केंद्रित, राष्ट्रवादी आणि लोकशाही पर्याय म्हणून सादर केले असले, तरी अस्थिरतेच्या गर्तेतून देशाला बाहेर काढण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. 'बीएनपी'ची पार्श्वभूमी बघता, जवळजवळ दोन दशकांनंतर 'बीएनपी' सत्तेत परत येत आहेत. तारिक रहमान यांचे राजकीय जीवन १९८०च्या दशकात सुरू झाले आणि २००१च्या निवडणुकीत 'बीएनपी'ला दोन तृतीयांश बहुमत मिळवून देण्यात त्यांची निर्णायक भूमिका होती. भ्रष्टाचार आणि 'मनी लॉण्ड्रिंग'सारख्या आरोपांमुळे, २००८ पासून ते लंडनमध्ये विजनवासात होते. २०२४-२५ मध्ये न्यायालयाने त्यांची ८४ प्रकरणांमध्ये निर्दोष मुक्तता केली.

### 'बीएनपी'समोर पुढील आव्हाने

बांगलादेशाचे यापुढील परराष्ट्र धोरण बांगलादेश आणि बांगलादेशातील लोकांचे हित लक्षात घेऊनच ठरवले जाईल, असे तारिक रहमान सांगत आहेत. मात्र, तीन महत्त्वाची आव्हाने ही त्यांच्या समोर असतील; पहिले म्हणजे या निवडणुकीचा एक महत्त्वाचा पैलू हा इस्लामी राजकारणाची पुनर्रचना आणि त्यातून पुढे आलेल्या 'जमात-ए-इस्लामी'च्या नेतृत्वातील युतीशी संदर्भात आहे. तसेच विद्याथ, ग्रामीण भाग आणि धार्मिक मतदारांसह उदारमतवादी विरुद्ध इस्लामी या ध्रुवीकरणाचा परिणाम, हा भविष्यातील बांगलादेशाच्या परराष्ट्र धोरण, दिशा आणि सामाजिक रचनेवर नक्कीच करेल. 'जमात'ला पाठिंबा देणार्या ११ पक्षांमध्ये 'नॅशनल सिटीझन्स पाट'चा समावेश असून, जी शेख हसीनाविरोधी निदर्शनांम धून उदयास आलेली युवा संघटना आहे. 'जमात'च्या नेतृत्वाखालील युतीने या निवडणुकीत आतापर्यंत ७६ जागा जिंकल्या आहेत. एक मजबूत कट्टर इस्लामी पक्ष आणि 'जेन-झी'प्रेरित युवा ब्रिगेड जी सोशल मीडिया, विद्यापीठ चळवळी आणि नागरी मंचांद्वारे सक्रिय असलेली ही पिढी पारंपरिक पक्षआधारित राजकारणावर असमाधानी दिसते. तसेच माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मानणारे समर्थक या सर्वांना सोबत घेऊन, तारिक रहमान यांना समतोल साधून पुढे जाण्याचे आव्हान नक्कीच असेल.

दुसरा मुद्दा हा बांगलादेशच्या अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. वस्त्रोद्योग हा बांगलादेशच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, एकूण 'जीडीपी'च्या दहा टक्क्यांपेक्षा जास्त हिस्सेदारी आणि जवळजवळ चार दशलक्ष लोकांना या क्षेत्रातून रोजगार मिळतो. त्यांपैकी बहुतेक लाभाथ या महिला आहेत. गुंतवणूकदारांचा विश्वास आणि जागतिक व्यापाराचा प्रवाह सुरळीत करण्याचे कार्य करण्यासाठी, तारिक रहमान यांना जगातील प्रगतिशील अर्थव्यवस्थांशी नव्याने बोलणी सुरू करावी लागतील. यामध्ये भारत ही बांगलादेशची सर्वात मोठी गरज आणि बाजारपेठ आहे. भारतासोबत परस्पर आदर आणि समजुतीवर आधारित राजकीय संबंध निर्माण करण्याचे कार्य, तारिक रहमान यांना करावे लागेल. तिसरा मुद्दा हा तरुणांसाठी रोजगार आणि आर्थिक संधी, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, मानवी हक्क आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लिंग समानता आणि सामाजिक न्याय स्थापित करणे यासंदर्भात आहे.

बांगलादेशची २०२६ची सार्वत्रिक निवडणूक केवळ देशांतर्गत राजकारणापुरती मर्यादित नाही, तर त्याचे व्यापक असे प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय परिणामदेखील आहेत. भारत, चीन, अमेरिका आणि युरोपीय देश यांची सामरिक गणितेही याच भागात आहेत. १९७१ मध्ये बांगलादेशने जगासमोर आपले सार्वभौमत्व सिद्ध केले. परंतु, आजपर्यंत आपली लोकशाही वाचविण्यासाठी बांगलादेशाला परीक्षा द्यावी लागत आहे. भारताच्या दृष्टिकोनातून ढाक्यातील राजकीय निकालांचे बाह्य मूल्यांकन कितीही सावध असले, तरी प्रादेशिक संतुलन आणि भारताच्या स्वतःच्या सुरक्षा धोरणांवर तेथील परिस्थितीचे अपरिहार्यपणे परिणाम पडतात. ढाक्यातील स्थिरता ही भारताच्या पूर्वेकडील सुरक्षा व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे.

### भारतावर परिणाम:-

भारताने 'बीएनपी'च्या विजयाचे स्वागत केले असून, सतर्क आशावाद बाळगून पंतप्रधान मोदी यांनी तारिक रहमान यांना शुभेच्छा दिल्या आहेत. बांगलादेश हे दक्षिण आशियाच्या धोरणात्मक, आर्थिक आणि भू-राजकीय रचनेत महत्त्वाचे स्थान राखतो. ही निवडणूक भारतासाठी विशेषतः संवेदनशील ठरली आहे. बांगलादेशचे सामरिक महत्त्व हे त्याच्या भौगोलिक स्थानामुळे असून, भारताची सर्वात मोठी चार हजार, ०९६ किमी लांबीच्या भूसीमा या देशासोबत आहे. भारताच्या प. बंगाल, आसाम, मेघालय, त्रिपुरा या चार राज्यांच्या सीमा, भारताशी जोडल्या जातात. एकांगवादी 'बीएनपी' सरकार 'बांगलादेश फर्स्ट' या धोरणावर भर देईल, ज्यामध्ये आर्थिक संबंध दोन्ही बाजूंसाठी महत्त्वाचे आहेत. व्यापार, सुरक्षा आणि सांस्कृतिक सहकार्य वाढवण्यावरच त्यांचा जोर असेल. बांगलादेश हा दक्षिण आशियातील भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे, ज्यामध्ये कापड आणि ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांचा समावेश आहे आणि भारताला स्थिर बांगलादेशच्या हितासाठी व्यापार वाढताना पाहायचे आहे. बांगलादेशने एका महत्त्वपूर्ण व्यापारी भागीदाराशी संबंध राखणेदेखील शहाणपणाचेच ठरेल. मात्र, शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासारख्या मुद्द्यांवर भारतासोबत मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण होईल, अशी शक्यताही नाकारता येत नाही. बांगलादेशातील 'आयएसआय'चे ऐतिहासिक नेटवर्क, मागील दोन वर्षांत झपाट्याने वाढलेले आहे. 'जमात-ए-इस्लामी'ने ७० सभासद मिळवले असले, तरी ते सरकारमध्ये थेट सामील होणार नाहीत. पण, संसदीय प्रभावामुळे 'बीएनपी'वर दबाव नक्कीच येईल. 'जमात'च्या भारताविरोधी आणि मुख्यतः हिंदू समुदायविरोधी विचारसरणीमुळे आणि पाकिस्तानशी जवळीक असल्याने, द्विपक्षीय संबंधात अडचणी निर्माण होतील. पुढच्या टप्प्यात तिस्ता पाणीवाटप, सीमा सुरक्षितता आणि कनेक्टिव्हिटी प्रकल्पांवर अडथळे येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. भारतासाठी या संक्रमणाची धोरणात्मक वास्तववादावर आधारित रणनीती ही संयमआणि लक्ष ठेवण्यावरच असेल. बांगलादेशातील जनादेशाचे शाश्वत, सहभागी आणि जबाबदार लोकशाहीमध्ये किती यशस्वीरीत्या रूपांतर होते, हे काळच सांगेल.

राष्ट्ररक्षा

हेमंत महाजन

# संघर्षरत बलुचिस्तान आणि पाकिस्तानपुढील वाढता पेच!



बलुचिस्तान आज अशा ज्वालामुखीवर उभा आहे, ज्याचा स्फोट झाल्यास त्याचा हादरा संपूर्ण पाकिस्तानलाच हादरवून सोडेल. 'बलुच लिबरेशन आम' अर्थात, 'बीएलए'ने सुरू केलेले 'ऑपरेशन हेरोफ' अर्थात, 'ब्लॅक स्टॉर्म फेज-२' हे केवळ काही बंडखोरीचे कृत्य नसून ती एका पद्धतशीरपणे आखलेल्या छुप्या युद्धाची प्रगत पायरी आहे.

'ऑपरेशन हेरोफ फेज-२'ची रणनीती आणि बदलाचे वारे गेल्या दोन दशकांपासून बलुच बंडखोर डोंगराळ भागातून पाकिस्तानी सैन्यावर लहानलहान हल्ले करत होते. मात्र, 'ऑपरेशन हेरोफ'च्या दुसऱ्या टप्प्याने या युद्धाचे स्वरूपच पूर्णपणे बदलून टाकले आहे.

**अ) शहरी युद्धाचा उदय :** पूव बलुच बंडखोर केवळ दुर्गमभागातच सक्रिय होते. मात्र, 'फेज-२' मध्ये 'बीएलए'ने क्वेट्टा, ग्वादर, मस्तुंग आणि कलात यांसारख्या शहरी केंद्रांना लक्ष्य केल्याचे दिसते. पाकिस्तानच्या शहरीभागाला लक्ष्य केल्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी तर मिळालीच, त्याचबरोबर पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेचे अपयशही जागतिक समुदायाच्या नजरेत आले. एकाच वेळी दहापेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये समन्वित हल्ले करणे, हे 'बीएलए'च्या लष्करी क्षमतेचे द्योतक आहे.

**ब) महिलांच्या आत्मघाती पथकांचा प्रभावी वापर:** बलुच संघर्षात महिलांचा सहभाग हा सर्वात मोठा 'गेमचेंजर' ठरला आहे. 'बीएलए'च्या 'मजीद ब्रिगेड'ने आत्मघाती मोहिमांमध्ये 'फियादीन' म्हणून मोठ्या प्रमाणात महिलांना सामील करून घेतले. शारी बलुच या सुशिक्षित महिलेने केलेल्या पहिल्या आत्मघाती हल्ल्यानंतर हा ट्रेंड वाढताच राहिला. परिणामी, पाकिस्तानी लष्करासमोर एक वेगळाच पेच निर्माण झाला. पाकिस्तानात महिलांची शारीरिक तपासणी, ही बाब लष्करासाठी संवेदनशील असल्याने त्याचाच फायदा घेत, या फियादीन महिला सुरक्षा कडे भेदून हल्ले करत आहेत.

**क) तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांचा वापर:** 'बीएलए'ने बंदुकांबरोबरच ड्रोन तंत्रज्ञान, अत्याधुनिक दळणवळण यंत्रणा आणि प्रपोगंडा वॉरफेअरमध्येही प्रगती साधली आहे. त्यांच्या कारवायांचे व्हिडिओ अवघ्या काही तासांतच इंटरनेटवर प्रसारित होतात. त्यामुळे तरुण पिढीमध्ये या चळवळीबद्दल एक वेगळेच आकर्षण निर्माण होत आहे.

### 'सेपेक'- संघर्षाचा केंद्रबिंदू

**चिनी नागरिक लक्ष्य:** 'ऑपरेशन हेरोफ'अंतर्गत चिनी अभियंते आणि प्रकल्पांवर 'बीएलए'च्या थेट हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, या हल्ल्यांमुळे चीनमध्ये कमालीची असुरक्षितता निर्माण झाली असून, चीनने आता उघडपणे पाकिस्तानला जाब विचारला आहे की, जर तुमचे सैन्य आमच्या नागरिकांना सुरक्षा देऊ शकत नसेल, तर आम्ही आमचे सैन्य का आणू नये? हा प्रश्न पाकिस्तानी लष्करासाठी अपमानजनकच आहे. 'बीएलए'च्या 'ऑपरेशन हेरोफ फेज-२'मुळे, चीन-पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडॉर अर्थात, 'सेपेक' आणि पाकिस्तानातील अन्य चिनी गुंतवणुकीवर अत्यंत गंभीर परिणामहोण्याचीही शक्यता वाढली आहे. गुंतवणुकीचा वेग मंदावणे आणि प्रकल्पांना स्थगिती चीनने 'सेपेक'अंतर्गत सुमारे ६२ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक पाकिस्तानात करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, बलुचिस्तानातील वाढत्या हिंसाचारामुळे अनेक प्रकल्पांचे कामआज संथगतीने सुरू आहे. सातत्याने होणार्या हल्ल्यामुळे चिनी कंपन्या नवीन प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यास कचरत असून, काही महत्त्वाचे ऊर्जा आणि पायाभूत सुविधा प्रकल्प आधीच रखडले आहेत.

### ग्वादर बंदराची उपयुक्तता धोक्यात

'सेपेक' प्रकल्पाचे केंद्रबिंदू असलेले 'ग्वादर बंदर' हे बलुचिस्तानमध्येच आहे. चीनला या बंदराद्वारे अरबी समुद्रापर्यंत थेट पोहोचणे शक्य होणार असून, चीनची तीच इच्छाही आहे.

**परिणाम:** बलुच बंडखोरांनी ग्वादरला जवळपास घेराव घातला असून, स्थानिक मच्छीमार आणि नागरिकांची आंदोलने आणि बंडखोरांच्या हल्ल्यांमुळे हे बंदर आजही पूर्णक्षमतेने कार्यरत झालेले नाही. जर हे बंदर सुरक्षित झाले नाही, तर चीनची अब्जावधींची गुंतवणूक पाण्यात जाणार आहे.

### विमा आणि सुरक्षेचा वाढता खर्च

बलुचिस्तानमध्ये कामकरणार्या चिनी कंपन्यांना आता कर्मचारी आणि प्रकल्पाच्या सुरक्षेसाठीही प्रचंड खर्च करावा लागत आहे.

**आर्थिक फटका:** चीनच्या मदतीने सुरू असलेल्या प्रकल्पांच्या सुरक्षेसाठी पाकिस्तानला आपल्या सैन्याची विशेष तुकडी तैनात करावी लागली आहे. त्यामुळे त्याचा आर्थिक भार पाकिस्तानच्या आधीच डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेवर पडत आहे. तसेच या वाढत्या धोक्यामुळे प्रकल्पांच्या विमा हप्त्यात वाढ झाली असून, त्यामुळे प्रकल्पांचा एकूण खर्च आवाक्याबाहेर जात आहे.

### कर्जाचा विळखा अधिक घट्ट होणे

पाकिस्तानने 'सेपेक'साठी चीनकडून मोठ्या प्रमाणात कर्जे घेतली आहेत. जर बलुचिस्तानमधील अस्थिरतेमुळे हे प्रकल्प नफा कमवू शकले नाहीत, तर पाकिस्तानला कर्जाचे हप्ते फेडणेही अशक्य होणार आहे.

**बलुचिस्तानातील बंडखोर गटांनी 'ऑपरेशन हेरोफ – फेज २'च्या नावाखाली पाकिस्तानातील शहरी केंद्रे, लष्करी स्थळे आणि चीनच्या सहकार्याने उभारल्या जाणाऱ्या पायाभूत प्रकल्पांना लक्ष्य करणाऱ्या हल्ल्यांची एक मालिकाच सुरू केली आहे. यातून पाकिस्तानच्या सुरक्षाव्यवस्थेतील उणिवा उघड झाल्या असून, लष्कर व गुप्तचर यंत्रणांची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर मलिन होत आहे. 'सेपेक'सारख्या चीनच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांवरही याचा प्रत्यक्ष परिणामदिसू लागला आहे. परिणामी, हा संघर्ष केवळ प्रादेशिक असंतोषापुरता मर्यादित न राहता, पाकिस्तानच्या अंतर्गत स्थैर्य, अर्थकारण आणि परराष्ट्र धोरणावर दूरगामी परिणामकरणारा ठरत आहे. या परिणामांचा आणि पाकिस्तानसमोरील आव्हानांचा घेतलेला आढावा...**

**परिणाम:** चीनकडून घेतलेले कर्ज पाकिस्तान फेडू शकला नाही, तर यामुळे तो अधिकच चीनच्या अधिपत्याखाली येईल किंवा त्याला आपल्या महत्त्वाच्या मालमत्ता (उदा. बंदरे किंवा खाणी) चीनच्या ताब्यात द्याव्या लागतील. यामुळे स्थानिक बलुच जनतेच्या रोषामध्ये आणखीच वाढ होईल.

चीनच्या 'बेल्ट ण्ड रोड' अर्थात, 'बीआरआय'च्या प्रतिमेला धक्का 'सेपेक' हा चीनच्या जागतिक 'बेल्ट ण्ड रोड इनिशिएटिव्ह' अर्थात, 'बीआरआय' प्रकल्पाचा सर्वात महत्त्वाचा भाग मानला जातो. जर पाकिस्तानसारख्या जवळचा मित्र असलेल्या देशात चीन आपले प्रकल्प सुरक्षित ठेवू शकला नाही, तर इतर देशही चीनच्या गुंतवणुकीबाबत साशंक होतील. असे झाल्यास हा चीनसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठाच राजनैतिक धक्का असेल.

### पाकिस्तानी लष्कराच्या अपयशाची कारणे एक सखोल विलेषण-

इस्लामिक बंधुत्वाची संकल्पना वापरणारे पाकिस्तानी सैन्य आता बलुचिस्तानमध्ये बॅकफूटवर आले आहे.

**भौगोलिक आव्हाने:** बलुचिस्तानचे क्षेत्रफळ इतके अफाट आणि भूप्रदेश इतका दुर्गमआहे की, तिथे प्रत्येक कोपर्यावर सैन्य तैनात करणे निव्वळ अशक्य आहे. त्यातच हे बलुच बंडखोर भौगोलिक संसाधनांचा वापर करून हल्ले करतात आणि डोंगरात दिसेनासे होतात.

**स्थानिक जनतेचा वाढता पाठिंबा:** कोणतेही बंड तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा त्याला जनतेचा पाठिंबा असतो. पाकिस्तानी लष्कराने लोकांचे अपहरण करणे आणि मारून फेकून देण्याचे धोरण राबवल्याने स्थानिकांचा त्यांच्यावरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. आज बलुच घराघरांत पाकिस्तानी लष्कराप्रती शुद्ध तिरस्काराचीच भावना आहे.

**राजकीय नेतृत्वाचा अभाव:** पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीममुनीर आणि राजकीय नेतृत्व केवळ इमरान खान यांना रोखण्यातच व्यस्त आहेत. बलुचिस्तानमध्ये लष्करी कारवाई करण्याशिवाय त्यांच्याकडे आजमितीला कोणताही राजकीय किंवा विकासाचा आराखडा नाही.

### 'मिसिंग पर्सन्स' आणि नागरी उठाव

बलुचिस्तानमधील वाढत्या असंतोषाचे एक मोठे कारण म्हणजे मानवी हक्कांचे उल्लंघन. हजारो बलुच तरुण वर्षानुवर्षे बेपत्ता झाले आहेत. त्यांच्या कुटुंबीयांनी काढलेला 'लॉन्ग मार्च' आणि माहंग बलोच यांच्यासारख्या तरुण नेतृत्वाचा झालेला उदय हेच दर्शवते की, आता हा लढा केवळ शस्त्रांनी नाही, तर नागरी हक्कांच्या माध्यमातूनही लढला जात आहे. जेव्हा एखादे राष्ट्र आपल्याच नागरिकांना शत्रूसारखी वागणूक देते, तेव्हाच तिथे फुटीरतावादाची बीजे अधिक खोलवर रुजण्यास सुरुवात होते.

### अफगाणिस्तान आणि प्रादेशिक प्रभाव

पाकिस्तानचा आरोप असतो की, 'बीएलए'ला अफगाणिस्तानमधून रसद पुरवली जाते. यात काही अंशी तथ्य असूही शकते. कारण तालिबान आणि पाकिस्तानचे संबंध आता पूवसारखे मधुर राहिलेले नाहीत. 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' अर्थात, 'टीटीपी' आणि 'बीएलए'सारख्या गटांना अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करणे अधिक सुलभ जात आहे. यामुळेच पाकिस्तानवर आता पूर्व आणि पश्चिमअशा दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी सुरक्षा आव्हानांना तोंड देण्याची वेळ आली आहे.

### आर्थिक दिवाळखोरीचा धोका

जर 'सेपेक' प्रकल्पातील चिनी गुंतवणूक सुरक्षेच्या कारणास्तव थांबल्यास पाकिस्तानची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडण्याची भीती त्यांना वाटते. बलुचिस्तानमधील अस्थिरता ही पाकिस्तानला एक अयशस्वी राष्ट्र बनवण्याच्या दिशेने नेणारा सर्वात मोठा घटक ठरत आहे.

### भविष्यातील शक्यतांचा अंदाज...

एका विशिष्ट टप्प्यावर गुप्तचर माहितीच्या आधारे (चीन किंवा अमेरिकेसह) एक संयुक्त हवाई आणि जमिनी मोहिमेची सुरुवात केली जाईल. यामध्ये मोठ्या संख्येने 'स्वातंत्र्यसैनिक' मारले गेल्याचे चित्र रंगवण्यात येईल. यामध्ये सुरुवातीला 'टीटीपी' आणि 'बीएलए'कडून बचावात्मक पावले उचलली जातील. ते हल्ल्याच्या प्रभाव क्षेत्राबाहेर सुरक्षित ठिकाणी स्थलांतरही करतील. परंतु, त्यानंतर त्यांच्या हल्ल्यांचे प्रभाव क्षेत्र पंजाब आणि कराचीपर्यंत पसरवतील. जर 'तालिबान'ने मागे न हटता त्यांना आश्रय आणि शस्त्रे-दारुगोळा पुरवला, तर पाकिस्तान करता हा लढा अत्यंत प्राणघातक ठरेल.

### निष्कर्ष

थोडक्यात सांगायचे, तर बलुचिस्तानमधील अस्थिरता 'सेपेक'साठी 'डेथ वॉरंट' ठरू शकते. चीन सध्या 'वेट ण्ड वॉच'च्या भूमिकेत आहे. जर पाकिस्तानने लष्करी दडपशाहीऐवजी राजकीय तोडगा काढून सुरक्षा प्रदान केली नाही, तर चीन आपली गुंतवणूक मर्यादित करेल किंवा पूर्णपणे थांबवेल. असे झाल्यास याचा थेट परिणाम पाकिस्तानच्या विस्कळीत झालेल्या अर्थव्यवस्थेवर आणि भविष्यावर होईल, हे निश्चित.

'ऑपरेशन हेरोफ फेज-२' हे पाकिस्तानसाठी धोक्याची घंटा आहे. हा केवळ एका गटाचा हल्ला नसून तो शासन यंत्रणेच्या विरुद्ध केलेला उद्रेक आहे. जर पाकिस्तानने आपल्या धोरणात मूलगामी बदल केले नाहीत, तर बलुचिस्तानमधील ही 'काळी वादळे' पाकिस्तानच्या अखंडतेला कायमचा तडा देऊ शकतात.

इतिहासात १९७१ मध्ये जे पूर्व पाकिस्तानच्या (बांगलादेश) बाबतीत घडले, त्याची पुनरावृत्ती बलुचिस्तानमध्ये होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शेवटी, कोणत्याही राष्ट्राचे अस्तित्व तिथल्या शस्त्रास्त्रांवर नाही, तर तिथल्या नागरिकांच्या समाधानावर अवलंबून असते. पाकिस्तानच्या हातातील वेळ वेगाने निघून जात आहे.

# सत्ताकेंद्र नव्हे सेवाकेंद्र!




भारतीय राज्यकारभाराची नाडी अनेक दशके वसाहतवादी मानसिकतेच्या सावलीतच अडकून राहिली. स्वतःच्या परंपरा, ज्ञान आणि सामर्थ्यावर विश्वास न ठेवता, परकीय चौकटीत विकास मोजण्याची सवय लागली. आता 'सेवातीर्था'च्या रूपाने उभ्या राहिलेल्या नव्या प्रशासनिक पर्वातून त्या मानसिक गुलामगिरीवर अंतिमप्रहार करण्याची वेळ आली आहे. स्वातंत्र्य मिळून सात दशके उलटली; पण स्वातंत्र्याच्या भावनेचा आत्मविश्वास मात्र उशिरा आला. राजकीय स्वातंत्र्य १९४७ मध्ये मिळाले; पण मानसिक स्वातंत्र्य मात्र अनेक स्तरांवर प्रलंबित राहिले. ब्रिटिशांनी उभारलेली प्रशासकीय रचना, कायदे, शिक्षण व्यवस्था आणि शासनाची कार्यपद्धती तशीच टिकून राहिली. वसाहतवादी मानसिकतेचे दुष्परिणाम खोलवर रुजले. आपल्याच मातीतील भारतीय ज्ञानपरंपरेला दुय्यम मानण्याची सवय लागली. आयुर्वेद, योग, भारतीय गणित, तत्त्वज्ञान, कृषी पद्धती, वस्त्रपरंपरा यांना 'पारंपरिक' म्हणून कमी लेखले गेले, तर पाश्चात्त्य मॉडेल 'आधुनिक' म्हणून स्वीकारले गेले. स्वतःच्या क्षमतांबद्दल न्यूनगंड निर्माण झाला.

**ब्रिटिशकालीन 'साऊथ ब्लॉक'मधील पंतप्रधानांच्या कार्यालयाचे 'सेंट्रल व्हिस्टा' प्रकल्पांतर्गत उभारलेल्या आधुनिक 'सेवातीर्थ' इमारतीचे काल उद्घाटन नवी दिल्लीत संपन्न झाले. पण, हा केवळ प्रशासकीय पातळीवरील बदल नसून, ब्रिटिशांच्या वसाहतवादी जोखडातून मुक्तीचा, भारतीय सेवासंस्कृतीच्या पुनर्जागरणाचा एक ऐतिहासिक क्षण आहे.**

इंग्रजी हीच प्रगतीची भाषा, इंग्रजी शिक्षण हाच दर्जा, असा समज पक्का झाला. भारतीय भाषांमधील संशोधन, प्रशासन आणि उच्चशिक्षण मागे पडले. स्थानिक उद्योगांची पायाभरणी दुर्लक्षित झाली. स्वदेशी उद्योग, हस्तकला, खादी, लघु-उद्योग यांना दुय्यमवागणूक मिळाली. ब्रिटिश काळातील कायदे, पोलीस व्यवस्था, नोकरशाहीचे ढाचे मोठ्या प्रमाणावर कायमराहिले. नागरिक-प्रशासन संबंधात समन्वयापेक्षा दुरावा दिसत राहिला. शैक्षणिक धोरणांतही तशीच विसंगती राहिली. संशोधन आणि नवकल्पनांना स्वतंत्र भारतीय दिशा मिळाली नाही. सामाजिक असमानतेला काही प्रमाणात संस्थात्मक बळ मिळाले. ही मानसिकता केवळ धोरणांत नव्हे, तर प्रतीकांतही दिसून येत होती. राजधानीतील वास्तू, रस्त्यांची नावे, सत्ताकेंद्रांचे स्वरूप अशा सगळ्या ठिकाणी वसाहतवादाची काळी छाया स्वातंत्र्यानंतरही 'जैसे थे' होती. 'राजपथ' ही संज्ञा राजसत्तेची आठवण करून देणारी; नागरिकांचा सहभाग गौण भासवणारी. 'इंडिया गेट' परिसरात स्वातंत्र्याच्या इतिहासाचा भारतीय आत्मभानाशी थेट संबंध कमी जाणवत होता. या प्रतीकांमधूनच मानसिकतेचा मागोवा लागत असतो. या पार्श्वभूमीवर गेल्या दशकात बदलाची दिशा ठरवण्यात आली.

वसाहतवादी विचारांच्या पगड्यातून बाहेर पडल्याशिवाय सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास शक्य नाही, ही जाणीव शासन पातळीवर स्पष्ट झाली. स्वदेशी विचार, स्थानिक गरजा आणि भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित विकास मॉडेल स्वीकारण्याचा प्रयत्न सुरू झाला. शिक्षण क्षेत्रात नव्या धोरणाने भारतीय भाषांना, कौशल्याधारित शिक्षणाला आणि स्थानिक संदर्भांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला. योगाला जागतिक मान्यता मिळवून देणे, आयुर्वेद आणि पारंपरिक औषधशास्त्राला संस्थात्मक बळ देणे, खादी आणि हस्तकला उद्योगांना नवसंजीवनी देणे, कृषी क्षेत्रात स्थानिक गरजांनुसार तंत्रज्ञान वापरणे, हे सर्व प्रयत्न मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडण्याचेच टप्पे आहेत. आत्मनिर्भरतेवर भर देत संरक्षण, उत्पादन, तंत्रज्ञान या क्षेत्रांत स्वदेशी क्षमतेला चालना देण्यात आली. ब्रिटिशकालीन अनेक कायद्यांमध्ये बदल करून भारतीय परिस्थितीशी सुसंगत कायदे आणले गेले.

प्रतीकात्मक पातळीवरही बदल असेच लक्षणीय आहेत. 'इंडिया गेट' परिसरात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारण्यात आला. राजपथाचे 'कर्तव्यपथ' 'राजभवन'चे 'लोकभवन'असे नामांतर करण्यात आले. सत्ता नव्हे, कर्तव्य हा केंद्रबिंदू असल्याचा संदेश देत; अनेक रस्ते, स्थानके, बेटांची नावे भारतीय इतिहासाशी निगडित करण्यात आली. अंदमान-निकोबार बेटांवरील बेटांना भारतीय आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नावाने ओळख मिळाली. याच मालिकेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे, 'सेवातीर्थ' या नव्या केंद्रीय प्रशासकीय संकुलाची उभारणी. पूर्वी मंत्रालये विविध इमारतींमध्ये विखुरलेली होती. समन्वयासाठी वेळ आणि साधनांचा अपव्यय होत होता. नव्या संकुलात प्रशासनाचा मोठा भाग एका छताखाली येत आहे. 'सेवातीर्था'ची गरज जागेअभावी नव्हती; तर ती कार्यक्षमता वाढवण्याची आवश्यकता होती. यातून सरकारी बैठका, आंतरमंत्रालयीन संवाद आणि धोरणनिर्मिती अधिक परिणामकारक होईल. 'सेवातीर्थ' ही संज्ञाच सांगते की, प्रशासन हे सेवा करण्यासाठी आहे. सत्ताकेंद्र नव्हे, तर सेवेचे तीर्थक्षेत्र अशी मानसिकता निर्माण करणे, हा उद्देश आहे. ब्रिटिशकालीन 'रूलर' संस्कृतीपासून 'सेवक' संस्कृतीकडे वाटचाल, हा बदल शब्दांपुरता न राहता संरचनेतून दिसावा, ही अपेक्षा आहे. स्वतंत्र भारतातही ब्रिटिशकालीन दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि पुरावा कायदा दशके जसाच्या तसा चालू राहिला. १८६०, १८९८ आणि १८७२ मधील कायदे २१व्या शतकातील भारताचे सामाजिक वास्तव पूर्णपणे प्रतिबिंबित करत नव्हते.

२०२३ मध्ये भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य कायदा लागू करण्यात आले. हा केवळ कायदेबदल नव्हता; तर न्याय व्यवस्थेच्या तत्त्वज्ञानात भारतीय संदर्भ अधोरेखित करण्याचा प्रयत्न होता. आर्थिक व्यवस्थेतही औपनिवेशिक अवशेष होते. रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प ही ब्रिटिश काळापासून चालत आलेली परंपरा. दि. २५ फेब्रुवारी २०१६ रोजी शेवटचा स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प सादर झाला आणि २०१७ पासून तो मुख्य अर्थसंकल्पात विलीन करण्यात आला. या निर्णयामागे रेल्वेच्या आर्थिक नियोजनाला व्यापक पायाभूत धोरणांशी एकात्मकरण्याचा विचार होता. १९९९ मध्ये संध्याकाळी ५ वाजताची परंपरा बदलून सकाळी ११ वाजता अर्थसंकल्प मांडण्यास सुरुवात झाली. ब्रिटिश संसदेच्या वेळेनुसार ठरवलेली पद्धत बदलून भारतीय जनतेसाठी सोयीची व्यवस्था करण्यात आली. २०१७ पासून १ फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर होऊ लागल्याने आर्थिक वर्ष सुरू होण्यापूव मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करणे शक्य झाले. २०१९ पासून 'वही-खाता' स्वरूप आणि डिजिटल सादरीकरण स्वीकारण्यात आले. या बदलांतून आर्थिक सार्वभौमत्वाची प्रतिमा बळकट करण्याचा प्रयत्न दिसतो.

आज देश एका नव्या टप्प्यावर उभा आहे. आत्मनिर्भरतेचा ध्यास, भारतीय भाषांना आणि परंपरांना दिलेले स्थान, कायद्यांतील सुधारणा, लष्करी परंपरांचे भारतीयीकरण, शिक्षणातील बदल या सर्व प्रयत्नांचा केंद्रबिंदू मानसिक गुलामगिरीतून मुक्ती हाच आहे. 'सेवातीर्थ' हे त्याचे ठोस प्रतीक. वसाहतवादी मानसिकतेतून मुक्त झालेला समाजच सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास साधू शकतो. स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवणारे राष्ट्रच जागतिक स्तरावर आत्मविश्वासाने उभे राहते. 'सेवातीर्था'तून चालणारा देशाचा कारभार हा केवळ प्रशासनिक पुनर्रचनेचा विषय नाही; तो मानसिक स्वातंत्र्याच्या प्रवासातील निर्णायक टप्पा आहे. भारतीयत्वाच्या भक्कमपायावर उभा राहून आधुनिकतेकडे झेपावणाऱ्या राष्ट्राची ही नवी ओळख ठरावी, हीच अपेक्षा!